सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शिक्षक मार्गदर्शिका
# पूरक साहित्य : २०२०
## इयत्ता : पहिली

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम
संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२० (इयत्ता : पहिली)


- **प्रवर्तक :**
  शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शन :**
  **वन्दना कृष्णा,** (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
  **विशाल सोळंकी,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक :**
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक :**
  **दिनकर पाटील**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक :**
  **विकास गरड,** प्र. प्राचार्य (समन्वय)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **मनिषा यादव,** वरिष्ठ अधिव्याख्याता,
  आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **मुख्य समन्वयक (अभ्यासगट) :**
  **डॉ. चंद्रशेखर मुरुमकर,**
  अध्यक्ष, विषय समिती, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.
- **संपादन साहाय्य :**
  **विवेक गोसावी**
  संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.
  **राजीव पाटोळे,** समन्वयक,
  विद्या विभाग, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.
  **वर्षाराणी भोपळे,**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, समग्र शिक्षा विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती :** सप्टेंबर २०२०
- **प्रती :** -
- **मुद्रक :** रुना ग्राफिक्स, पुणे.
- **आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

# प्रास्ताविक



शिक्षक मित्रांनो,

राज्यातील महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळात विलीन करण्यात आल्याने राज्यातील ८१ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळांतील विद्यार्थ्यांना आता शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून समग्र शिक्षा अभियान अंतर्गत एकात्मिक व द्विभाषिक पाठ्यपुस्तके पथदर्शी प्रकल्पांन्वये पुरविण्यात आलेली आहेत. या ८१ शाळांमधील इयत्ता पहिली ते पाचवीसाठीच्या शिक्षकांसाठी सदर पाठ्यपुस्तके साधन म्हणून वापरताना राज्यस्तरावरून प्रचलित अभ्यासक्रमावर आधारित आपणांस उपयुक्त अशी शिक्षक मार्गदर्शिका – पूरक साहित्य : २०२० आपल्या हाती देत असताना आम्हांला आनंद होत आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या ६६०३३ शाळा आहेत. या शाळांसाठीचा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने आंतरराष्ट्रीय दर्जाचा करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे यांच्या समन्वयाने प्रचलित अभ्यासक्रमविषयक पूरक साहित्य तयार करण्यात आलेले आहे.

एकविसाव्या शतकातील कौशल्ये विद्यार्थ्यांना आत्मसात होणे तसेच दैनंदिन जीवनात येणाऱ्या विविध आव्हानांना आत्मविश्वासाने, समर्थपणे सामोरे जाणे हे अभ्यासक्रमाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांसाठीची अध्ययन–अध्यापन प्रक्रिया तणावरहित, आनंददायी व प्रभावी होण्यासाठी आणि शिकणे अधिक समृद्ध करण्यासाठी, समाविष्ट करावयाच्या वैविध्यपूर्ण अध्यापनशास्त्रीय ज्ञानाच्या संदर्भात चांगले आकलन होण्यासाठी विविध अध्ययन अनुभव तसेच विविध उपक्रम व कृती सदर पूरक साहित्यामध्ये सुचविण्यात आलेल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना स्वयं–अध्ययनाला प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने आपणांस अधिकाधिक मार्गदर्शन होण्यासाठी सदर पूरक साहित्य समृद्ध करण्यात आले आहे. आपल्या विषयातील ज्ञान आणि कौशल्ये यांमध्ये वाढ करण्यासाठी सदर साहित्याचा निश्चितच उपयोग होईल याची आम्हांला खात्री आहे.

सदर पूरक साहित्याचा दैनंदिन अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये प्रभावी वापर करण्यासाठी संबंधित पूरक साहित्याच्या अनुषंगाने इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गास अध्यापन करणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. अभ्यासक्रमातील उद्दिष्टे साध्य करण्याच्या अनुषंगाने अध्ययन– अध्यापन प्रक्रिया सहजसुलभ व आनंददायी होण्यासाठी सदर पूरक साहित्याचा व प्रशिक्षणाचा निश्चितच उपयोग होईल.

**दिनकर पाटील**
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र.

# पूरक साहित्याचा वापर - मार्गदर्शक सूचना

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये सर्वांचे स्वागत. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्यास गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. तसेच येणाऱ्या काळात समाजात आणि जागतिक अर्थव्यवस्थेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक मुलाला तयार करणे, हा सार्वत्रिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्देश आहे. हे साध्य करीत असताना शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

दैनंदिन अध्ययन–अध्यापनात येणाऱ्या समस्या सोडवून गुणवत्ता वाढविण्यासाठी नवनवीन प्रयोग करणे आवश्यक असते. तसेच विद्यार्थ्यांना स्वयं–अध्ययनाला प्रवृत्त करण्यासाठी व त्यांच्यातील सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी शिक्षकांनी नेहमीच नाविन्याचा शोध घेणे व आवर्जून अध्ययनपूरक साहित्याचा वापर करणे आवश्यक आहे. आपण करीत असलेल्या ज्ञानदानाच्या या प्रयत्नांना अधिक बळ प्राप्त व्हावे म्हणून ही शिक्षक मार्गदर्शिका – पूरक साहित्य : २०२० निर्मिती करण्यात आली आहे. आपणा सर्वांना ज्ञात आहेच की माहितीचे रूपांतर कृतीत होते तेव्हाच ज्ञाननिर्मिती होत असते. तद्नुषंगिक माहितीचे रूपांतर कृतीत कसे करावे याचे मार्गदर्शन करणारी ही मार्गदर्शिका तुम्हांला उपयुक्त ठरेल याची आम्हांस खात्री आहे.

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ नुसार ही शिक्षक मार्गदर्शिका – पूरक साहित्य : २०२० इयत्तानिहाय तयार करण्यात आलेली आहे.

**या मार्गदर्शिकेची उद्दिष्टे :**

१) सुलभक आणि शिक्षक यांना प्रचलित अभ्यासक्रमाच्या अध्ययन निष्पत्तीप्रमाणे पूरक अनुभव देण्यासाठी व विद्यार्थ्यांची अधिक प्रगती करण्यासाठी नवीन अध्यापनशास्त्रीय ज्ञानाच्या संदर्भात योग्य आकलन आणि आवश्यक कौशल्ये निर्माण करणे.

२) मुख्य विषयातील प्रत्येक इयत्तेसाठी निश्चित करण्यात आलेल्या अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी शिक्षकांच्या क्षमता विकसित करणे.

३) मुख्य विषय म्हणून इयत्ता पहिली ते पाचवीसाठी अध्यापन करणाऱ्या अध्यापकांना त्या संबंधित विषयाचे स्वरूप व व्याप्ती समजून घेण्यास मदत करणे.

४) पाठ्यपुस्तक हे साध्य नसून साधन आहे, यास्तव पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या घटकाप्रमाणे परिसरीय कृतीपूर्ण व सर्वांगीण सहभाग विकासाचे अध्ययन अनुभव देणे.

५) पाठ्यपुस्तकातील उपक्रमांव्यतिरिक्त अध्यापनतंत्रासह अध्ययन अनुभवाला पूरक असे उपक्रम विद्यार्थ्यांना देणे आणि ते त्यांच्याकडून करून घेणे.

६) आशयाच्या विश्लेषणानंतर शिक्षकाला विद्यार्थ्यांकडून जे वर्तनबदल अपेक्षित असतात, त्या अध्ययन निष्पत्तीची ओळख करून देऊन समर्पक मूल्यमापन तंत्राची माहिती करून देणे.

७) वरील सर्व घटकांचे परिपूर्ण ज्ञान प्राप्त होण्यासाठी अपेक्षित व घटकांना अनुसरून संदर्भ साहित्य व संदर्भ स्रोत यांची माहिती देणे. या उद्देशास अनुसरून मार्गदर्शिकेची निर्मिती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ व राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० तसेच प्राथमिक शिक्षण

अभ्यासक्रम २०१२ समोर ठेवून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे निर्मित पाठ्यपुस्तकांचे अध्यापन करताना आपणांस मार्गदर्शक ठरेल अशी पुस्तिका तयार करण्यात आली आहे. सदर पुस्तिका इयत्तानिहाय सर्व विषय समाविष्ट असलेली तयार करण्यात आली आहे, यास्तव आपणांस सर्व विषयांचा समवाय साधता येईल. प्रत्येक विषयाचे पाठ्यपुस्तक एकमेकांस कसे पूरक आहे याची ओळख आपणास होईल.

मार्गदर्शिकेमधील प्रत्येक घटकाची रचना विशिष्ट क्रमाने करण्यात आली आहे. प्रत्येक विषयाच्या सुरुवातीला प्राथमिक शिक्षण धोरण २०१२ ची उद्‌दिष्टे दिली आहेत, विषयाच्या व्याप्तीचे आकलन होण्यास त्याची मदत होईल. त्यानंतर **घटक, उपघटक, तासिका, उपघटकाच्या अंतर्गत स्पष्ट करावयाच्या संकल्पना व संबोध, संबंधित घटकांची उद्‌दिष्टे, परिसरीय कृतीपूर्ण व सर्वांगीण सहभागाचे अध्ययन–अनुभव, अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम, मूल्यमापन, विषय समवाय, संदर्भ व स्रोत, अध्ययन निष्पत्ती** या क्रमाने आपले अध्यापन आणि विद्यार्थ्यांचे अध्ययन ज्या क्रमाने पुढे जात असते त्या क्रमाने सदर पुस्तिकेत प्रस्तुत घटक समाविष्ट केलेले आहेत.

उपरोक्त क्रमाने केलेली रचना देखील विशिष्ट हेतूने केलेली आहे. उपघटकामध्ये पाठाचे शीर्षक असेल परंतु त्याचबरोबर प्रस्तुत पाठातून स्पष्ट करावयाचा संबोध निदर्शनास येईल. आपण मनात निश्चित केल्याप्रमाणे संबोध आहे की नाही हे पुढच्या टप्प्यात पहावयास मिळेल, काय संबोध स्पष्ट करावयाचे हे ज्ञात होत असतानाच संबंधित घटकाविषयीची उद्‌दिष्टे पुढे आलेली असतील, जी उद्‌दिष्टे रुजवायची आहेत त्यासाठी पूरक असे अध्ययन–अनुभव द्यावे लागतील, ते फक्त पूरक असतील असे नाही तर ते विद्यार्थ्यांच्या परिसरातून उपलब्ध होतील आणि विशेष करून ते कृतिपूर्ण आणि सहाध्यायी यांना सामावून घेणारे असतील यासाठी तो अध्ययन–अनुभव देताना ज्ञानरचनावादाचे कोणते तंत्र वापरावे हेही नमूद करण्यात आले आहे. अर्थात आपणांस ते वापरण्याचे निश्चितच स्वातंत्र्य असेल. पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटक हे आपणांस संबोध स्पष्ट करण्यासाठी पूरक असले तरी ते अधिक स्पष्ट होण्यासाठी पूरक उपक्रम कोणते घ्यावे याची माहिती प्रस्तुत पुस्तिकेत दिली आहे.

**उद्‌दिष्टे → पूर्वज्ञान → अध्ययन–अध्यापन प्रक्रिया → अपेक्षित वर्तन मूल्यमापन = अध्ययन निष्पत्ती.**
याप्रमाणे प्रत्येक विषयाची रचना केलेली आहे.

एका विषयाचे अध्यापन करताना आपणांस ज्ञात आहे की, इतर विषयही संबंधित विषयाच्या अनुषंगाने येत असतात. भाषा विषयाचे अध्यापन करताना फक्त तो विषयच अध्यापन केला जातो असे नाही, तर इतर विषयांशीही समवाय कसा साधला जातो याचेही मार्गदर्शन प्रस्तुत मार्गदर्शिकेत होणार आहे. विद्यार्थी ज्ञानी करायचा असेल तर फक्त पाठ्यपुस्तकातील माहितीवर अवलंबून राहता येणार नाही, त्यास पूरक असे संदर्भ आपणांस द्यावे लागतील, विद्यार्थ्यांची वाटचालही त्या दिशेने होईल, यासाठी प्रत्येक विषयात संबंधित घटकाला अपेक्षित कोणते संदर्भ आहेत याची माहिती मार्गदर्शिकेतून प्राप्त होईल.

ज्ञानग्रही, नवनिर्माणशील, विकसित, चिकित्सक तसेच दुर्दम्य आत्मविश्वास असणारा विद्यार्थी तयार करण्यासाठी ही मार्गदर्शिका आपणांस नक्कीच उपयुक्त ठरेल.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पाठ्यक्रमाचे घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | मराठी | • संवाद शिक्षक मित्रांशी | १ |
| | | • विषयाची उद्‌दिष्टे | ३ |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती | ४ |
| २. | इंग्रजी | • Talk with Teachers | ५१ |
| | | • Teaching of Rhymes/Action Songs | ५३ |
| ३. | गणित | • संवाद शिक्षक मित्रांशी | ६३ |
| | | • विषयाची उद्‌दिष्टे | ६६ |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती | ६७ |
| ४. | आरोग्य व शा. शिक्षण (खेळू) | • संवाद शिक्षक मित्रांशी | ८६ |
| | | • अभ्यासक्रमाची ध्येय व उद्‌दिष्टे | ९० |
| | | • अभ्यासक्रमाची क्षेत्रे | ९१ |
| | | • आरोग्य व शारीरिक शिक्षणाचा इतर विषयांशी समवाय | ९२ |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती | ९४ |
| | | • पूरक उपक्रम | १०५ |
| | | • विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी | १०६ |
| | | • नियोजन/मूल्यमापन/संदर्भ सूची | १०८ |
| ५. | कार्यानुभव (करू) | • संवाद शिक्षक मित्रांशी | ११२ |
| | | • कार्यानुभव विषयाची ठळक उद्‌दिष्टे | ११४ |
| | | • कार्यानुभव उपक्रमांचे स्वरूप व आराखडा | ११५ |
| | | • पाठ्यक्रमातील अनिवार्य उपक्रम | ११६ |
| | | • मूल्यमापन निर्देश/संदर्भ सूची | १२७ |
| ६. | कलाशिक्षण (शिकू) | • संवाद शिक्षक मित्रांशी | १३० |
| | | • अभ्यासक्रमाची ध्येय व उद्‌दिष्टे | १३१ |
| | | • पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती, अध्ययन अनुभव, मुक्त अभिव्यक्ती व इतर विषयांशी समवाय | १३२ |
| | | • मूल्यमापन निर्देश/संदर्भ सूची/महत्त्वाच्या सूचना | १४३ |
| | | • पूरक साहित्य विकसन निर्मिती गट : यादी | १४५ |

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

### इयत्ता – पहिली : विषय – मराठी

## संवाद शिक्षक मित्रांशी

इयत्ता पहिलीच्या पाठ्यपुस्तकात आपण डोकावून पाहिले असता, विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील अनेक गोष्टी सहजपणे आपल्याला दिसून येतील. मूलतः विद्यार्थी घरातून प्रथमच औपचारिक शिक्षणाच्या प्रक्रियेत दाखल होताना शाळेत प्रवेशित झालेला असतो. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील आशयदेखील विद्यार्थी भावविश्वाला अनुरूप असावा लागतो. विद्यार्थी चित्रवाचनापासून सुरुवात करतो. आपल्या परिसरात दिसणाऱ्या गोष्टी पाठ्यपुस्तकात दिसत आहेत. त्यात प्राणी, पक्षी, वनस्पती अशी त्यांची काही नाती आहेत. त्यामुळे पाठ्यपुस्तकातील आरंभीच्या पानापासून नाते जुळवत जातो. पाठ्यपुस्तकाच्या आशयाशी जोडून जशी चित्र देण्यात आली आहेत, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना वाचनासाठी स्वतंत्र चित्रे देण्यात आली आहेत. चित्रवाचन भाषिक कौशल्य साध्य करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची प्रक्रिया आहे. विद्यार्थी अनौपचारिक वातावरणात चित्रातील पात्र वाचत असतो. हळूहळू चित्रातील पात्रांचे वर्णन करतो. नंतर चित्रांशी संवाद साधत असतो. भाषिक प्रक्रिया श्रवणापासून सुरुवात होते. त्यानंतर भाषण, वाचन व लेखन सुरू होते. चित्रात वाचनासाठी लिपी नसली तरी वाचनासाठी आवश्यक असलेली तयारी या निमित्ताने होत असते. भाषण कौशल्यही त्यातून समृद्ध होत असते. मुलांच्या सर्जनशीलतेला, कल्पकतेला संधी मिळत असते.

विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी वर्णमालेतील अक्षरे देण्यात आली आहेत, मात्र ती तोडून गट करून देण्यात आले आहेत. ती अक्षरे शिकविण्यासाठी ध्वनीचा विचार करण्यात आलेला आहे. अक्षरात ध्वनी असतो आणि प्रत्येक शब्दात वेगवेगळे ध्वनी दडलेले असतात. या ध्वनींच्या परिचयासाठी शाळा पूर्वतयारीच्या दृष्टीने वेगवेगळ्या कृती आपण सूचित केलेल्या आहेत. त्या कृती करून अक्षर गटातील अक्षरांचा परिचय विद्यार्थ्यांना करून द्यायचा आहे. त्यासाठी चित्र देण्यात आलेली आहेत. पुस्तकातील चित्रांच्या सोबत परिसरातील चित्रांच्या वस्तूंचा उपयोग अध्यापनात करावा लागणार आहे. त्यासोबतच भाषापेटीतील साहित्याचा पुरेपूर वापर होणे आवश्यक आहे. अक्षरगटाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, त्या अक्षरांपासून तयार झालेले शब्द, तसेच स्वरचिन्ह जोडून तयार होणारे शब्द या कृती विद्यार्थ्यांना करू द्यावयाच्या आहेत. पाठ्यपुस्तकात असे अक्षराचे गट विद्यार्थी शिकत असतानाच, प्रत्येक गटासोबत काही स्वरचिन्ह शिकणार आहे, त्यामुळे प्रत्येक गटासोबतच विद्यार्थी शब्द, वाचनपाठ वाचन व लेखन करायला शिकणार आहेत. विद्यार्थी शिकतो आहे ते परिसराला जोडून पाहिले जावे. त्यातून विद्यार्थी परिसरातील मजकूर वाचण्यासाठी तयार होईल. पाठ्यपुस्तकात देण्यात आलेले वाचनपाठ हे अक्षरगटातील अक्षरे आणि स्वरचिन्हे यांना जोडून देण्यात आले आहेत.

त्याचबरोबर वाचनपाठाचे निर्धारित निकष पूर्ण करणारे आहेत. केवळ अक्षरांच्या समूहातून ते वाचनपाठ तयार झालेले नाहीत. त्यात पात्र आहेत, प्रसंग आहेत. विद्यार्थ्यांशी वाचनपाठातील आशय नाते सांगणारा आहे. त्याचबरोबर पाठ्यपुस्तकात देण्यात आलेल्या कविता, पाठ हे इयत्ता पहिलीसाठीची विशेष उद्दिष्टे पूर्ण करणारे आहेत. अभ्यासक्रमातील उद्दिष्टांची साध्यता करण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकातील पाठ व कवितांचा उपयोग होणार आहे. मुलांना आनंद मिळण्यासाठी आरंभी गाणीही देण्यात आली आहेत. गाणे, कविता यांना विद्यार्थी चाली लावून शिकतील. कधी वैयक्तिक तर कधी सामूहिक स्वरूपात त्यांचे शिकणे सुरू असेल. पाठातील शब्दांच्या मर्यादा या विद्यार्थ्यांची वयोमर्यादा, विकासाची प्रक्रिया लक्षात घेऊन निर्धारित करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर एकूण पाठाचा आशय मर्यादित असला, तरी पाठ्यपुस्तकाचे अध्यापन करताना परिसरातील विद्यार्थ्यांचे पूर्वानुभव, परिसरातील उपलब्ध असलेले साहित्य यांच्याशी जोडून द्यायला शिक्षकांनी अध्ययन अनुभवाची रचना करायला हवी. त्या दृष्टीने विकसित करण्यात आलेल्या घटक संचात पूरक अनुभवाची मांडणी करण्यात आली आहे. प्रत्येक ठिकाणचा अनुभव हा विद्यार्थ्यांना शिकण्यास मदत करेल.

पाठ्यपुस्तकात देण्यात आलेले स्वाध्याय हे कृतियुक्त आहेत. यादृष्टीने सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची वापरावयाची विविध साधनतंत्रे मदत करणारी आहेत. प्रश्नांची संख्या अधिक असली, तरी त्या प्रत्येक प्रश्नातून मूल्यमापनाची वेगवेगळी उद्दिष्टे साध्य होताना पहावयास मिळेल. प्रत्येक स्वाध्याय म्हणजे केवळ माहिती देणे नव्हे. निरीक्षण करणे, विचार करणे, स्वतःचे मत प्रकट करणे या दृष्टीने त्याकडे पहायला हवे. विद्यार्थ्यांच्या समग्र विकासासाठी मूल्यमापनाच्या साधनांचा विचार पाठ्यपुस्तकात अधोरेखित करण्यात आला आहे.

एकूणच पाठ्यपुस्तक हे परिसराशी नाते सांगणारे, पाठ्यपुस्तकातील आशय विद्यार्थ्यांच्या वयोगटाला अनुरूप राखण्यात आला आहे. अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी पाठ्यपुस्तकातील संकल्पना, अध्ययन अनुभव व मूल्यमापनाची साधन तंत्रे यांचा एकत्रित विचार करून चढत्या श्रेणीने वर्गात अध्ययन अनुभव दिले आणि विद्यार्थ्याला शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली, तर मुलाचे शिकणे गतिमान होण्यासाठी पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांना मदत करणारे ठरेल असे वाटते.

■■■

## विषयाची उद्‌दिष्टे : प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ प्रमाणे

१) घरातील आणि परिसरातील संभाषण, चर्चा, संवाद इ. लक्षपूर्वक ऐकणे. त्यांतील विषय, आशय वर्गात थोडक्यात सांगणे.

२) वर्गमित्राशी भाषिक देवाणघेवाण करताना परस्परांच्या भाषेचा आणि भावभावनांचा स्वीकार करणे.

३) खेळासाठी सूचना ऐकून त्यानुसार कृती करणे.

४) बडबडगीते, गाणी एकट्याने तसेच समूहाने म्हणणे.

५) शाळेतील अनुभव प्रात्यक्षिकासह घरातील आणि परिसरातील व्यक्तीपुढे सादर करणे.

६) श्रवण, भाषण तसेच दृक् शब्दसंपत्तीचा संग्रह करणे.

७) ध्वनिभेद आणि आकारभेद ओळखण्याची क्षमता वाढविणे.

८) दृक्‌शब्दाच्या साहाय्याने वाचन साहित्य वाचण्याची क्षमता वाढविणे.

९) दृक्‌शब्दाच्या पृथक्करणातून अक्षरे आणि स्वरचिन्हे शोधून काढणे.

१०) हस्तनेत्र समन्वयातून सफाई आणण्याचे प्रयत्न करणे.

११) पाठ्यपुस्तकाच्या आणि अपरिचित वाचन साहित्याच्या वाचनाचा आनंद घेणे.

१२) वाचन शब्दसंपत्तीत सुमारे १५०० शब्दांची मर्यादा गाठणे.

१३) स्पष्ट शब्दोच्चारांसह समजून प्रकट वाचन करणे. ऐकलेल्या, वाचलेल्या, मजकुरातील तपशीलावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे व लिहिणे.

१४) अक्षरध्वनी जाणणे.

१५) ध्वनीचे चिन्ह वाचता व लिहिता येणे.

१६) अक्षराचे उच्चारण करता येणे.

१७) अक्षरध्वनी ओळखता येणे.

■■■

## पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती

**घटक :** चित्रवाचन **उपघटक :** १) माझे पान

**पाठ आशय :** चित्र रेखाटन, रंगभरण, प्राण्यांची नावे व त्यांची ओळख

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • नकला • संवाद • चर्चा

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. चित्राचे निरीक्षण करणे.<br>२. चित्रातील माहितीच्या संबंधाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे.<br>३. परिसरातील प्राण्यांची नावे सांगता येणे.<br>४. पक्षी, प्राण्यांची माहिती जाणण्याकरिता प्रश्न विचारणे. | • चित्रातील दिसत असलेले प्राणी, पक्षी यांची माहिति सांगावी.<br>• चित्रातील प्राणी, पक्षी कोठे पाहिले हे विचारावे.<br>• विद्यार्थ्यांकडून रंगभरण ही कृती करून घ्यावी. | • पक्षी, प्राणी यांच्यासंबंधी घरातील सदस्य व शिक्षकांकडून माहिती मिळविण्यास सांगणे.<br>• प्राणी, पक्षी यांच्यासंबंधी शिक्षकांकडून अधिकची माहिती मिळविण्यास सांगणे.<br>• चित्रातील प्राण्यांच्या आवाजाच्या नकलांचे सादरीकरण करण्यास सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास, कला | ध्वनी-चित्रफीती, मोबाईल ॲप | ०१.०१.०५, २, ६ |

**घटक :** काव्य **उपघटक :** २) अग्गोबाई ढग्गोबाई

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • गाणी • चर्चा

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. गाणे चालीवर म्हणणे.<br>२. गीत साभिनय सादर करणे.<br>३. संबंधित आशयाची परिसरातील गाणी वर्गात म्हणून घेणे. | • ध्वनीचित्रफीतीद्वारे गाणी ऐकवावीत.<br>• ध्वनीचित्रफितीवर नृत्य सादरीकरण करून घ्यावे. | • गाण्याची यू-ट्यूबवर उपलब्ध ध्वनीचित्रफीत दाखविणे व त्यावर गप्पा मारणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास, कला | दीक्षा ॲप, ध्वनी-चित्रफीती, | ०१.०१.०२, १०, ७ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. गाण्यातील आशयावर चर्चा घेणे. | • गाणे चालीवर म्हणण्यास सांगणे. | • गाणे सामूहिक म्हणण्यास सांगणे व नृत्य करण्यास सांगणे. | | | बालगीतांची पुस्तके | |
| **घटक :** काव्य **उपघटक :** ३) बीज<br>**पाठ आशय :** बीज रुजणे या संदर्भातील माहिती सूर्यप्रकाशाच्या मदतीने त्याचे झाड होते. त्याला पाने आणि फळे येतात.<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• कविता • चर्चा • प्रश्न • प्रकटवाचन • पूरक वाचन | | | | | | |
| १. बीजाचे रोप होतानाचा प्रवास जाणणे.<br>२. कठीण शब्दांचे अर्थ जाणणे.<br>३. बीज रूजताना कोण मदत करते हे सांगता येणे.<br>४. आशयासंबंधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे.<br>५. प्रकटवाचन करणे.<br>६. पाठाचे सहभागी वाचन घेणे.<br>७. आशय स्वतःच्या भाषेत सांगता येणे. | • कुंडीत एक बी लावून तिचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br>• पाठातील कठीण शब्दांसाठी बोलीतील शब्द द्यावेत.<br>• शब्दभेंड्यांचा खेळ घ्यावा.<br>• पाठाचे सहभागी वाचन करून घ्यावे.<br>• पाठाचे प्रकटवाचन करून घ्यावे.<br>• पाठाच्या आशयाच्या संदर्भाने प्रश्नोत्तरांचा सराव घ्यावा.<br>• बीज कविता चालीवर ऐकवावी. | • बीज कसे रुजते याचा अनुभव देणे.<br>• निरीक्षण करण्यास सांगून स्वतःच्या भाषेत माहिती सांगण्यास सांगणे.<br>• पाठातील चित्राचे निरीक्षण करून त्याची माहिती सांगण्यास सांगणे.<br>• विविध प्रकारच्या बिया संकलित करण्यास सांगणे.<br>• संकलित बियांची माहिती सांगण्यास सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम<br>प्रकल्प | परिसर अभ्यास,<br>कला,<br>गणित,<br>कार्यानुभव | ध्वनी–चित्रफीती,<br>मोबाईल,<br>दीक्षा ॲप,<br>वनस्पती वाढ – चित्र | ०१.०१.०१, २, १०, ७ |

**घटक :** चित्रवाचन **उपघटक :** ४) माझे खेळ

**पाठ आशय :** आंधळी कोशिंबीर, कॅरम, सापशिडी खेळ.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • चर्चा • वर्णन, प्रश्न, संवाद

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. चित्रातील खेळ सांगता येणे.<br>२. खेळाचे नियम सांगणे.<br>३. परिसरातील खेळांची नावे सांगता येणे.<br>४. खेळ खेळता येणे.<br>५. खेळात अभिरूची विकसित करणे. चित्राचे निरीक्षण करणे.<br>६. चित्रातील माहितीसंबंधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे. | • पाठातील खेळांची नावे व त्याबद्दलची माहिती सांगावी.<br>• विद्यार्थी स्वतः कोणते खेळ खेळतात, यावर चर्चा करावी. (खेळाचे नाव, नियम, खेळाडू संख्या, साहित्य)<br>• प्रश्नोत्तरे सराव घ्यावा. | • परिसरातील खेळाचे संकलन करण्यास सांगणे.<br>• खेळाच्या साहित्याची यादी बनविण्यास सांगणे.<br>• विविध ग्रामीण खेळांसाठी लागणाऱ्या साहित्याची यादी करण्यास सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम<br>प्रकल्प<br>स्वाध्याय | परिसर अभ्यास,<br>कला,<br>शारीरिक शिक्षण | ध्वनी-चित्रफीत,<br>दीक्षा ॲप | ०१.०१.०५, २, १, ६ |

**घटक :** गद्य **उपघटक :** ५) माझे मित्र

**पाठ आशय :** लहानमोठे मित्र, आकाशात उडणारे मित्र, पाण्यात पोहणारे मित्र, सरपटणारे मित्र.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

• प्रकटवाचन • चर्चा • वर्णन

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. जमिनीवर, पाण्यात, आकाशात राहणारे प्राणी सांगता येणे.<br>२. स्वतःच्या मित्रांची नावे सांगता येणे. | • स्वतःच्या मित्राची माहिती सांगण्यास सांगावी.<br>• प्राण्यांची निवासस्थाने सांगण्याचा सराव घ्यावा. | • विद्यार्थ्यांना त्यांच्या निसर्गातील मित्रांची नावे सांगण्यास सांगणे.<br>• परिसरातील प्राण्यांची चित्रे दाखवून ते कोठे राहतात, | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम<br>प्रकल्प | परिसर अभ्यास,<br>कला. | ध्वनी-चित्रफीती,<br>दीक्षा ॲप,<br>प्राण्यांची गोष्टींची | ०१.०१.०२,९ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. प्राण्यांचे उपयोग सांगता येणे.<br>४. सहभागी वाचन करणे. | • पाठाचे प्रकटवाचन करण्यास सांगावे.<br>• पाठाचे सहभागी वाचन करून घ्यावे.<br>• चित्रातील प्राण्यांविषयी बोलण्यास सांगावे. | याचे संकलन करण्यास सांगणे.<br>• विद्यार्थ्यांना माहीत असलेल्या पक्ष्यांची आणि प्राण्यांची नावे यांची चिकट बुक/वही करण्यास सांगणे. | स्वाध्याय | पुस्तके | | |
| **घटक :** गद्य **उपघटक :** ६) माझे कुटुंब<br>**पाठ आशय :** आई, बाबा, दादा, आजी, आजोबा या नात्यांची माहिती. बाग, खेळ यांची ओळख.<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • प्रकटवाचन • चर्चा | | | | | | |
| १. नातेसंबंध सांगता येणे.<br>२. घरातील कोण काय काम करतात ते सांगता येणे.<br>३. परिसराची माहिती सांगता येणे. | • घरी विद्यार्थ्याचे आई, बाबा, आजी, आजोबा काय काम करतात ते विचारावे.<br>• नातेसंबंध ओळखण्याचा सराव घ्यावा.<br>• कुटुंबाचे संदर्भाने चर्चा घडवून आणावी. | • पाठातील नातेसंबंध, घरातील नातेसंबंध व त्यांची कामे यांवर विद्यार्थ्यांशी गप्पा मारणे.<br>• नात्यातील व्यक्तींची नावे सांगण्यास सांगणे.<br>• विद्यार्थ्यांच्या आजूबाजूच्या परिसरातील व्यक्तींची नावे सांगण्यास सांगणे.<br>• शेजाऱ्यांबद्दल माहिती सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम<br>प्रकल्प<br>स्वाध्याय | परिसर अभ्यास, कला. | | ०१.०१.०२,९ |

**घटक :** गद्य **उपघटक :** ७) लेखनपूर्व तयारी

**पाठ आशय :** लेखनपूर्व तयारी, आकारानुसार परिचय, चित्र, शब्द जुळणी

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- आकारभेद
- वाचनपूर्व तयारी
- लेखनपूर्व तयारी.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. लेखनपूर्व विविध आकारांचे रेखाटन करता येणे.<br>२. चित्र-शब्द भेद जाणणे.<br>३. आकार, रंग भेद जाणणे. | • भाषापेटीतील चित्र, चित्रशब्द जुळणी करून घ्यावी.<br>• रंगाचे नाव शिक्षकांनी सांगावे व त्या रंगाच्या वस्तू, प्राणी यांची नावे विचारावीत.<br>• शिक्षकांनी आकार सांगावे. त्या आकाराची काय काय माहिती आहे ते विद्यार्थ्यांना विचारावे. | • वर्गात दिसणाऱ्या लहान व मोठ्या वस्तूंची नावे सांगण्यास सांगणे.<br>• परिसरात उपलब्ध असलेल्या विविध आकाराच्या वस्तूंचे वर्गीकरण करण्यास सांगणे.<br>• कृती करण्यास सांगणे जसे – एकत्रित केलेली तांदूळ व डाळ निवडणे. कागद फाडणे, मातीचे गोळे करणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम<br>स्वाध्याय | परिसर अभ्यास, कला | भाषा पेटी | ०१.०१.०२, ९, ११, १३, ०८ |

**घटक :** गद्य  **उपघटक :** वाचनपूर्व तयारी

**पाठ आशय :** मुंगळ्याला पोहोचविणे, आडवी, उभी, तिरपी, अर्धा गोल, गोल रेषा गिरविणे, बिंदू जोडणे.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- वाचनपूर्व तयारी
- लेखनपूर्व तयारी

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. डावी ते उजवी रेषा ओढता येणे, गिरविता येणे.<br>२. चित्रपट्टीवरील पक्षी, प्राणी, कीटक योग्य त्या ठिकाणी हाताच्या बोटाने पोहोचविणे. | • भाषापेटीतील दिशादर्शक पट्टीचा उपयोग करावा.<br>• धूळ पाटीवर उभी रेघ, आडवी रेघ, तिरपी रेघ, अर्धगोल, गोल काढून घ्यावेत.<br>• पाटीवर विविध बिंदू काढून ते जोडण्यास सांगावेत. | १. धूळपाटीवर डावीकडून उजवीकडे बोट नेण्यास सांगणे.<br>२. खड्यांच्या माध्यमातून लेखनपूर्व तयारीसाठीचे आकार रेखाटणे. विविध आकार बोटाने गिरविण्यास सांगणे.<br>३. लेखनपूर्व तयारीसाठीचे आकार हवेत गिरविण्यास सांगणे.<br>४. लेखनपूर्व तयारीसाठीचे आकार मातीत गिरविण्यास सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास,<br>कला. | | |

**घटक :** गद्य **उपघटक :** अक्षरगट एक

**पाठ आशय :** क, म, ल, आ, काना, स्वरचिन्ह, चित्रांची नावे व त्यातील अक्षरगटातील अक्षरओळख, अक्षरलेखन तयारी.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- लेखनपूर्व तयारी • आकारभेद • अक्षरओळख • शब्द ओळख.

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. अक्षर – ध्वनी जाणणे.<br>२. ध्वनीचे चिन्ह वाचता व लिहिता येणे.<br>३. अक्षराचे उच्चारण करता येणे.<br>४. अक्षर ध्वनी ओळखता येणे. | अक्षरासाठी पुढीलप्रमाणे कृती कराव्यात. (शब्दचक्र)<br>• शिकविलेल्या अक्षराचा ध्वनी असलेले शब्द विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावा.<br>• सांगितलेले शब्द उच्चार करीत फळ्यावर लिहिण्यास सांगावेत.<br>• लिहिलेले शब्द तोडून वाचण्याचा सराव घ्यावा.<br>• जे अक्षरगटातील अक्षर अधोरेखित करावयाचे आहे. ते कोठे आले ते विचारावे व त्यास गोल करण्यास सांगावा.<br>• फळ्यावर लिहिलेला प्रत्येक शब्द जोडून तोडून वाचण्यास सांगावा. | • विद्यार्थ्यांना विविध ध्वनी व ध्वनीतील सूक्ष्म भेद ओळखण्यास सांगणे.<br>• अक्षरगटातील अक्षरांच्या शब्दभेंड्या. अक्षरगटातील अक्षरांचे ध्वनी संदर्भात अटी घालून खेळ खेळण्यास सांगणे.<br>उदा. क हे अक्षर पहिले येईल, मध्ये येईल, शेवटी येईल असे शब्द सांग. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास,<br>कला,<br>कार्यानुभव | | ०१.०१. ०९, ११, १३, ८ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | • अक्षरगटातील एका एका अक्षराचे लेखन करून घ्यावे.<br>• अक्षर हवेत गिरविण्याचा सराव घ्यावा.<br>• अक्षर पाटीवर गिरविण्याचा सराव घ्यावा.<br>• खड्याने, डाळीने, बियांनी ते अक्षर काढण्यास सांगावे.<br>• रांगोळीत/मातीत ते अक्षर गिरविण्यास सांगावे.<br>• रांगोळी, मातीने ते अक्षर काढण्यास सांगावे.<br>• वर्तमानपत्रातील कागदावर अक्षरगटातील त्या अक्षराला गोल करण्याचा सराव घ्यावा. | | | | | |

**घटक :** काव्य **उपघटक :** ८) पाऊस

**पाठ आशय :** जमिनीवरील पाणी, जलचक्र ओळख, थेंब व दिनूच्या संवादातून जलचक्राची ओळख.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • संवाद • प्रकटवाचन • नाट्यीकरण

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. प्रकटवाचन करणे.<br>२. जलचक्राची ओळख करून देणे.<br>३. जमिनीवरील पाणी आकाशात कसे जाते ते जाणणे.<br>४. थेंब व दिनूच्या संवादाचे नाट्यीकरण करणे. | • पावसाबद्दलच्या अनुभव कथनास संधी द्यावी.<br>• पावसाने वातावरणात होणारे बदल यावर चर्चा घडवून आणावी.<br>• पावसाळ्यात कपड्यामध्ये होणारे बदल विचारावेत.<br>• पावसात भिजण्याचा अनुभव द्यावा व गप्पा माराव्यात.<br>• पाठाच्या आशयाचे नाट्यीकरण सादरीकरण करून घ्यावे. | • पावसाचे गाणे घरी ऐकण्यास सांगणे<br>• पावसासंबंधीच्या गोष्टी ऐकविणे व चर्चा करण्यास सांगणे.<br>• माहीत असलेली पावसाची गाणी म्हणण्यास सांगणे.<br>• पावसाविषयी गप्पा मारणे.<br>• पावसात केलेल्या गंमती जमती सांगण्यास सांगणे.<br>• पावसाविषयी गाण्यांचे संकलन करणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम<br>प्रकल्प | परिसर अभ्यास, कला. | ध्वनी–चित्रफीत, पावसाची गाणी, पावसाच्या गोष्टींची पुस्तके. | ०१.०१.०२, ०९ |

**घटक :** चित्रकथा **उपघटक :** ९) झोपाळा

**पाठ आशय :** पाण्यात बेडूक... त्यांना दोन खांब दिसले... त्यांनी वेल आणून खांबाला बांधली.. झोपाळा तयार करून खेळू लागले.. झोपाळा उडू लागला तेव्हा लक्षात आले ते खांब नसून ते बगळ्याचे पाय आहेत.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • चर्चा, वर्णन, प्रश्न, संवाद

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. चित्रकथेतील मजकुराचे आकलन होणे. | • काही भासमान बाह्य अनुभव विद्यार्थ्यांना सांगावे. तसे अनुभव | • आपल्या परिसरातील अशा घटना संदर्भात घरातील मंडळींकडून | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती | परिसर अभ्यास, कला. | गोष्टीची पुस्तके, | ०१.०१.०५, २, ६ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| २. चित्रकथेतील घटनांचा क्रम लक्षात आणून देणे.<br>३. पाठाचे सहभागी वाचन. | विद्यार्थ्यांना असतील तर सांगण्यास प्रेरित करावे.<br>• पाठाचे सहभागी वाचन घ्यावे.<br>• पाठाच्या गंमतीवर चर्चा घडवून आणावी.<br>• पाठातील चित्राचे वर्णन करून घ्यावे. | माहिती घेण्यास सांगणे.<br>• पाठ्यांश स्वरूपातील विविध गोष्टी ऐकविणे व त्यांचे अनुभव सांगण्यास सांगणे. | उपक्रम | | ध्वनी चित्रफित. | |
| **घटक :** चित्रवाचन **उपघटक :** १०) माझी शाळा<br>**पाठ आशय :** शाळेचे चित्र आहे. तेथे मुले खेळत आहेत. इमारत शाळेची आहे.<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• संवाद • चित्रवाचन • प्रश्नोत्तरे • कथन • चर्चा, • वर्णन. | | | | | | |
| १. चित्रातील दडलेला आशय वाचता येणे.<br>२. वाचलेले चित्र स्वतःच्या भाषेत सांगता येणे.<br>३. चित्रातील शाळा आणि स्वतःची शाळा यांचा सहसंबंध जाणता येणे. | • विद्यार्थ्यांना शाळेबद्दल बोलण्याची संधी द्यावी.<br>• मित्राच्या शाळेची माहिती सांगण्यास सांगावी.<br>• शाळेविषयीच्या कविता, गाणी ऐकवावीत. इंटरनेटचा वापर करावा. | • चित्रवाचन करण्यास सांगणे.<br>• शाळेविषयी अनुभव सांगण्यास सांगणे.<br>• शाळेतील पहिल्या दिवसाविषयी प्रश्नोत्तरांतून चर्चा करणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास, कला. | | ०१.०१. ०५, २, ६, १२ |

**घटक :** गद्य **उपघटक :** ११) गमती शोध.

**पाठ आशय :** प्राणी, पक्षी यांना नसलेल्या गोष्टी चित्रात दिसत आहेत. जे त्यांना करता येत नाही त्या कृती ते करीत आहेत. त्याचे कारण.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- संवाद, चित्र वाचन, प्रश्नोत्तरे, कथन, चर्चा, वर्णन.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. चित्राचे सूक्ष्म निरीक्षण करणे.<br>२. चित्रात लपलेल्या गमती ओळखणे.<br>३. प्राणी, पक्षी यांचे निवासस्थान सांगता येणे.<br>४. प्रकटवाचन करणे.<br>५. चित्रातील पात्रांचा संवाद सादर करणे.<br>६. पात्रातील चित्र संदर्भाने चर्चा करणे. | • चित्रातील पात्र काय संवाद साधत असतील.<br>• चित्रातील प्राणी व आपण पाहिलेले प्राणी, पक्षी यांच्यात काय फरक दिसतो.<br>• उडणारे, चालणारे, सरपटणारे प्राणी प्रत्यक्षात कोण कोण आहेत.<br>• चित्रातील पात्राचे नाट्यीकरण करून सादरीकरण करून घ्यावे.<br>• चित्रातील पात्रांचे संदर्भाने चर्चा घडवून आणावी. | • चित्रातील प्राण्यांची चित्रे चिकटवहीत चिकटविण्यास सांगणे.<br>• पुस्तकातील चित्राव्यतिरिक्त प्राण्यांची चित्र दाखवून ते आपापसात काय बोलत असतील ते सांगण्यास सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास, कला. | | ०१.०१.०५, २, ६ |

**घटक :** गद्य **उपघटक :** १२) अक्षरगट–दोन

**पाठ आशय :** इ, घ, र, ई पहिली वेलांटी, व दुसरी वेलांटी ही स्वरचिन्हे, चित्रांची नावे व त्यांतील अक्षरगटातील अक्षरओळख, अक्षरलेखन तयारी, शब्दलेखन.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- लेखनपूर्व तयारी आकारभेद
- अक्षरओळख
- शब्द ओळख.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. अक्षर ध्वनी जाणणे.<br>२. ध्वनीचे चिन्ह वाचता व लिहिता येणे.<br>३. अक्षराचे उच्चारण करता येणे.<br>४. अक्षर ध्वनी ओळखता येणे. | अक्षरांसाठी पुढीलप्रमाणे कृती कराव्यात. (शब्दचक्र)<br>• शिकविलेल्या अक्षराचा ध्वनी असलेले शब्द विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावा.<br>• सांगितलेले शब्द उच्चार करीत फळ्यावर लिहिण्यास सांगावे.<br>• लिहिलेले शब्द तोडून वाचण्याचा सराव घ्यावा.<br>• जे अक्षरगटातील अक्षर अधोरेखित करावयाचे आहे ते कोठे आले ते विचारावे व त्यास गोल करण्यास सांगावा.<br>• फळ्यावर लिहिलेला प्रत्येक शब्द जोडून तोडून वाचण्यास सांगावा. | अक्षरगट तयार करून<br>• अक्षरगटातील अक्षराचे शब्द भेंड्या खेळण्यास सांगणे.<br>• अक्षरगटातील अक्षराचे ध्वनी संदर्भात अटी घालून खेळ खेळण्यास सांगणे.<br>उदा. घ हे अक्षर पहिले येईल, मध्ये येईल, शेवटी येईल असे शब्द सांग. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास,<br>कला | | ०१.०१.११, १०, ४ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | • अक्षरगटातील एका एका अक्षराचे लेखन करून घ्यावे.<br>• अक्षर हवेत गिरविण्याचा सराव घ्यावा.<br>• अक्षर पाटीवर गिरविण्याचा सराव घ्यावा.<br>• खड्याने, डाळीने, बियांनी ते अक्षर काढण्यास सांगावे.<br>• रांगोळीत/मातीत ते अक्षर गिरविण्यास सांगावे.<br>• रांगोळी, मातीने ते अक्षर काढण्यास सांगावे.<br>• वर्तमानपत्रातील कागदावर अक्षर गटातील त्या अक्षराला गोल करण्याचा सराव घ्यावा. | | | | | |

**घटक :** गद्य **उपघटक :** १३) वाचनपाठ

**पाठ आशय :** काका, मामा, काकी, मामी, रिमा घरी आली.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

• संवाद • प्रश्नोत्तरे • कथन • चर्चा • वर्णन.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. नातेसंबंध सांगता येणे.<br>२. प्रसंग, घटना स्वानुभव सांगता येणे. | • विद्यार्थ्यांना नातेसंबंधा- विषयी माहिती सांगण्यास प्रेरित करावे, त्यावर चर्चा घ्यावी.<br>• कुटुंबातील, नात्यातील माहिती सांगावी.<br>• कुटुंबातील सण, उत्सवाला कोण कोण येते, घरात त्या दिवशी खाण्यासाठी काय केले जाते, त्यावर गप्पा माराव्यात. | प्रकट वाचन- सहभागी वाचन | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास,<br>कला | | ०१.०१.०२, ०१ |

**घटक :** गद्य **उपघटक :** १४) आई मला दे ना.

**पाठ आशय :** बंदूक घेऊन सैनिक होऊन ऐटीत चालणारे, ड्रायव्हर होऊन मोटार घेऊन गावी जाणारे. पायलट होऊन विमान घेऊन आकाशी उडणारे. बाहुली घेऊन सजवेल आणि तिच्या सोबत नाच करेल.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

• संवाद • प्रश्नोत्तरे • कथन • चर्चा • वर्णन • नकला • नाट्यीकरण.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. विविध वाहनाचे चालक सांगता येणे.<br>२. सैनिकाबद्दलची अधिकची माहिती सांगणे. | • परिसरातील वाहने व ती चालविणाऱ्याला काय म्हणतात यावर चर्चा घडवून आणावी. | • विविध वाहनांच्या चित्रांचे संकलन करण्यास सांगणे.<br>• कविता वाचून गाण्यास सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास,<br>कला | दीक्षा ॲप, ध्वनी- चित्रफीती | ०१.०१.०२, १, १२ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. भावविश्वातील प्रसंगाचे कथन करणे.<br>४. वाहनांच्या आवाजाच्या नकला करणे.<br>५. पाठातील आशयाचे नाट्यीकरण करणे. | • गावातील सैनिकांबद्दल माहिती सांगावी.<br>• सैनिकांबद्दलच्या ध्वनी–चित्रफिती दाखवाव्यात.<br>• वाहनाच्या आवाजाच्या नकला करण्यास सांगाव्यात.<br>• आई, सैनिक, बाहुली संवाद या संदर्भाने नाट्यीकरण सादरीकरण करून घ्यावे. | • विविध चित्रे दाखवून ओळखण्यास सांगणे. | | | | |
| **घटक :** गद्य     **उपघटक :** १५) अक्षरगट – तीन<br>**पाठ आशय :** उ. न. पहिला उकार, स, प, ऊ, त दुसरा उकार या स्वरचिन्ह, चित्रांची नावे व त्यांतील अक्षरगटातील अक्षरओळख, अक्षरलेखन तयारी<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• लेखनपूर्व तयारी • आकारभेद • अक्षरओळख • शब्द ओळख. | | | | | | |
| १. अक्षर–ध्वनी जाणणे.<br>२. ध्वनीचे चिन्ह वाचता व लिहिता येणे.<br>३. अक्षराचे उच्चारण करता येणे.<br>४. अक्षर ध्वनी ओळखता येणे. | प्रत्येक अक्षरासाठी पुढीलप्रमाणे कृती कराव्यात. (शब्दचक्र)<br>• शिकविलेल्या अक्षराचा ध्वनी असलेले शब्द विद्यार्थ्यां–कडून म्हणून घ्यावेत.<br>• सांगितलेले शब्द उच्चार करीत फळ्यावर लिहिण्यास सांगावेत.<br>• लिहिलेले शब्द तोडून वाचण्याचा सराव घ्यावा. | • विद्यार्थ्यांना विविध आवाज ऐकविणे. प्राण्यांचे, वाहनांचे आवाज ऐकविणे, डोळे झाकून ते आवाज ओळखण्यास सांगणे.<br>• अक्षरगटातील अक्षरांचे शब्द सांगण्यास सांगणे.<br>• अक्षरगटातील अक्षरांचे ध्वनी संदर्भात अटी | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास, कला. | | ०१.०१.११, १०, ९ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | • जे अक्षरगटातील अक्षर अधोरेखित करावयाचे आहे ते कोठे आले ते विचारावे व त्यास गोल करण्यास सांगावा.<br>• फळ्यावर लिहिलेला प्रत्येक शब्द जोडून तोडून वाचण्यास सांगावा.<br>• अक्षरगटातील एका एका अक्षराचे लेखन करून घ्यावे.<br>• अक्षर हवेत गिरविण्याचा सराव घ्यावा.<br>• अक्षर पाटीवर गिरविण्याचा सराव घ्यावा.<br>• खड्याने, डाळीने, बियांनी ते अक्षर काढण्यास सांगावे.<br>• रांगोळीत/मातीत ते अक्षर गिरविण्यास सांगावे.<br>• रांगोळी, मातीने ते अक्षर काढण्यास सांगावे.<br>• वर्तमानपत्रातील कागदावर अक्षर गटातील त्या अक्षराला गोल करण्याचा सराव घ्यावा. | घालून खेळ खेळण्यास सांगणे.<br>उदा. न हे अक्षर पहिले येईल, मध्ये येईल. शेवटी येईल असे शब्द सांग.<br>अक्षराचे प्रकटवाचन. | | | | |

**घटक :** गद्य **उपघटक :** १६) माझे शब्द माझे मित्र

**पाठ आशय :** अक्षरगटावर आधारित काही शब्द देण्यात आले आहेत. त्यातील स्वरचिन्ह गाळण्यात आले आहेत, ते जोडून अर्थपूर्ण शब्द तयार करणे.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

• संवाद • प्रश्नोत्तरे • कथन • चर्चा • वर्णन.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| गाळलेले स्वरचिन्ह ओळखून अर्थपूर्ण शब्द तयार करणे. | • वर्गातील विद्यार्थ्यांची नावे फळ्यावर लिहिताना स्वरचिन्ह गाळून लिहावीत व ती पूर्ण करण्यास सांगावीत.<br>• विद्यार्थ्यांना गटात असे स्वरचिन्हविरहित शब्द सांगून अर्थपूर्ण शब्द करण्याचे खेळ घ्यावेत. | प्रकटवाचन – सहभागी वाचन<br>• संबंधित शब्दांच्या चित्रांचे संकलन करण्यास सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | परिसर अभ्यास, कला. | | ०१.०१.१०, ३ |

**घटक :** गद्य **उपघटक :** स्वरचिन्हासहित अक्षरलेखन.

**पाठ आशय :** स्वरचिन्ह लावून अक्षर वाचन व लेखन.

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • लेखन तयारी व वाचन सराव.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| झालेल्या अक्षर गटातील अक्षरांना स्वरचिन्ह लावून वाचता व लिहिता येणे. | • या घटकातील स्वरचिन्हाचे बोलीतील आलेले शब्द घ्यावेत.<br>• स्वरचिन्ह लावून शब्द तयार करण्यास सांगावेत. | • स्वरचिन्ह असलेले शब्द पाठात शोधण्यास सांगणे.<br>• स्वरचिन्ह असलेले शब्द लिहिण्यास सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | ध्वनी–चित्रफीत, दीक्षा ॲप | | ०१.०१.१०, ३ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | • स्वरचिन्ह असलेले परिसरातील शब्द विद्यार्थ्यांना सांगण्यास सांगावेत. | • स्वरचिन्ह असलेल्या विद्यार्थ्यांची नावे सांगण्यास सांगणे. | | | | |
| **घटक :** गद्य    **उपघटक :** अर्थपूर्ण शब्द ओळखणे.<br>**पाठ आशय :** अर्थपूर्ण शब्द शोधणे.<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • वाचन तयारी • प्रकटवाचन. | | | | | | |
| चौकटीतील अक्षरांमधून अर्थपूर्ण शब्द शोधणे. | • परिसरातील शब्द घेऊन त्यातील अक्षर गाळून विद्यार्थ्यांना शब्द पूर्ण करण्यास सांगावेत.<br>• तयार करण्यात आलेले शब्दाचे वाचन करण्यास सांगावे. | अर्थपूर्ण शब्दांचे भाषिक खेळ खेळण्यास सांगणे. | निरीक्षण<br>तोंडीकाम<br>कृती<br>उपक्रम | | | ०१.०१.१०, ३ |
| **घटक :** चित्रवाचन    **उपघटक :** १७) चित्रातील आशय सांगणे.<br>**पाठ आशय :** कुत्रा, मांजर, पिल्ले, चेंडू यांच्यातील संवादाचा अंदाज.<br>**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**<br>• संवाद • चित्रवाचन • प्रश्नोत्तरे • कथन • चर्चा • वर्णन | | | | | | |
| | **मागे-पुढे**<br>१. विद्यार्थ्यांना एका ओळीत उभे करून पुढील विद्यार्थी कोण? मागील विद्यार्थी कोण? असे प्रश्न विचारावेत.<br>२. झाडांची पाने गोळा करायला लावून झाडाच्या पुढील व मागील बाजूचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br>३. बस, रेल्वे या गाड्यांचे निरीक्षण करून पुढे कोण बसते, मागे कोण बसते? असे प्रश्न विचारून विचार करण्यास वाव द्यावा.<br>**वर-खाली**<br>१. कुंडीतील रोपाचे निरीक्षण करण्यास सांगून खाली मुळे, वर खोड त्यावर पाने असे स्पष्टीकरण द्यावे. | | - | इतिहासातील गोष्टींमधील पात्रांचे वर्णन करून संकल्पना स्पष्ट कराव्यात.<br><br>नदी मोठी की समुद्र मोठा, कोणता देश मोठा हे नकाशावरून, चित्रातून विद्यार्थ्यांना दाखवावे. | | |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | २. वर आकाश, खाली जमीन अशी अनेक उदाहरणे विद्यार्थ्यांकडून काढून घ्यावीत.<br>**आधी-नंतर**<br>१. आधी टाळी वाजवून नंतर उडी मार असा खेळ घ्यावा.<br>२. आधी हात स्वच्छ धुऊन नंतर डबा खा असे सांगावे.<br>३. घरी गेल्यानंतर काय काय करता ते क्रमाने सांगण्यास सांगावे.<br>४. क्रमाने केलेल्या कृतींचे चित्र काढावे व कोणती कृती पहिली कोणती दुसरी याचे क्रमांक देण्यास सांगावे.<br>**एक-अनेक**<br>१. एक चित्र व अनेक चित्रे फळ्यावर काढून त्यातील फरक लक्षात आणून द्यावा.<br>२. एक व अनेक ओळखण्याचा सराव द्यावा. | १. शर्यत लावून आधी कोण आले नंतर कोण आले स्पष्ट करावे.<br>२. वरील संकल्पना वापरून गोष्ट तयार करण्याचा अनुभव द्यावा.<br>३. वरील संकल्पनांचा दैनंदिन जीवनातील गोष्टींशी संबंध जुळवून नाट्यीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दयावी. | | | | |

**घटक :** अवकाशीय संबोध **अंदाजे तासिका : –**

**उपघटक :** आत–बाहेर, रुंद–अरुंद, लांब–आखूड, सर्वांत लांब–सर्वांत आखूड, उंच–ठेंगणा, जड–हलका, कमी वेळ–जास्त वेळ, कशा नंतर काय?

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- निरीक्षणाने तुलना करून दिलेल्या बाबींचा अंदाज करता येणे व पडताळा घेता येणे.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. निरीक्षणाने तुलना करून दिलेल्या बाबींचा अंदाज करता येणे व पडताळा घेता येणे.<br>२. समूहातील सर्वांत उंच सर्वांत ठेंगणा ठरवता येणे.<br>३. निरीक्षणाने तुलना करण्यासाठी उंच–ठेंगणा, लांब–आखूड, रुंद–अरुंद या शब्दांच्या संदर्भाने वापर करण्याची क्षमता प्राप्त करणे.<br>४. हाताळून जड–हलका, कमी वजन– जास्त वजन संदर्भाने ठरविता येणे. | **आत–बाहेर**<br>१. आत–बाहेर या संकल्पनेसाठी वर्गाच्या बाहेर जा, वर्गात ये या प्रकारच्या कृती करून घेऊन संकल्पना स्पष्ट करावी.<br>२. 'फळांच्या आत' बिया, 'फळांच्या बाहेर' असा अर्थ ध्वनित होतो हे प्रत्यक्ष दाखवावे.<br>३. रिंगणावर उभे करून एक म्हटले की रिंगणाच्या आत उडी मार, दोन म्हटले की रिंगणाच्या बाहेर उडी मार असे खेळ घ्यावेत. | १. महाराष्ट्राचा नकाशा दाखवून जवळची शहरे लांबची शहरे सांगावीत. | तोंडी व लेखी | १. वेगवेगळे मराठी शब्द वापरून मराठीतील शब्द भांडार वाढवा.<br>२. भूगोल – नकाशावरून जवळ, लांब शहरे दाखवून भूगोलाशी समवाय साधावा.<br>३. विज्ञान– प्राणी,पक्षी, झाडे अशी उदाहरणे घेऊन पर्यावरण विज्ञानाशी संवाद साधावा. | | |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | **रुंद-अरुंद**<br>१. कपड्यांच्या, साड्यांच्या रुंद-अरुंद किनारी दाखवून रुंद-अरुंद संकल्पना रुजवणे.<br>२. बोटाने, वितीने किंवा पेन्सिल, खडू यांच्या मदतीने रुंदी मोजण्याचा अनुभव देऊन रुंद-अरुंद ठरविण्याचा अनुभव देणे.<br>३. रुंद- अरुंद तोंडाच्या बाटल्या, पिशव्या, डबे दाखवून ही संकल्पना स्पष्ट करणे.<br>**लांब-आखूड**<br>१. फक्त निरीक्षणाने कोणते लांब, कोणते आखूड असे विचारावे, नंतर कशावरून ठरविले? हा प्रश्न विचारून त्यांना विचार करण्यास प्रवृत्त करावे. | १. लांब पेन्सिल, वापरून कमी झालेली आखूड पेन्सिल, अशी चित्रे काढून ही संकल्पना स्पष्ट करावी. | | | | |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | २. कंपास पेटीतील पट्टी व फूटपट्टी दाखवून लांब आखूड सांगावे.<br>३. जिराफाची मान लांब, कुत्र्याची आखूड अशी उदाहरणे देऊन संकल्पना रुजवावी.<br>**उंच-ठेंगणा**<br>१. कोण उंच, कोण ठेंगणे हे ठरविण्यासाठी निरीक्षण करून अंदाज बांधण्याचा सराव करून घ्यावा. नंतर बोटाने, खडूने, वितीने मोजण्याचा अनुभव देऊन उत्तराचा पडताळा घेण्यास सांगावे.<br>२. चित्रांची जोडी काढून उंच-ठेंगणा सांगावे.<br>३. जोडो ब्लॉक maths mat च्या मदतीने उंच-ठेंगणे दाखविणे. | २. काठीसारखी एखादी आकृती फळ्यावर काढून त्यापेक्षा लांब किंवा त्यापेक्षा आखूड चित्र काढा, अशी कृती करून घेणे.<br>१. गुगलच्या माध्यमातून जगातील सर्वांत उंच व सर्वांत ठेंगणा माणूस दाखवावा. | | | | |

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | **जड–हलका**<br>१. वस्तू प्रत्यक्ष उचलून बघून जड–हलका ठरविण्याचा अनुभव द्यावा.<br>२. दोन पारड्यांच्या तराजूमध्ये वस्तू ठेवून जड–हलका कसे ठरवायचे याचे प्रात्यक्षिक द्यावे.<br>३. रिकामी बाटली व भरलेली बाटली उचलायला लावून जड–हलका ही संकल्पना स्पष्ट करावी.<br>**कमी वेळ–जास्त वेळ**<br>१. दोन गावांना एकाच वाहनाने, एकाच गतीने जाण्यासाठी लागणारा वेळ विचारात घेऊन जवळ–लांब ठरविण्यासाठी मदत करावी.<br>२. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन आयुष्यातील पटकन होणारी गोष्ट व खूप | १. दोन विद्यार्थ्यांना वजन काट्यावर उभे करून आलेल्या वजनांचा कमी–जास्तपणा ठरवून जड–हलका ठरविण्याचा अनुभव द्यावा.<br>२. अशा वस्तू द्याव्यात की ज्या दिसायला खूप मोठ्या दिसतील पण वजनाने हलक्या असतील. उदा. : ओंजळभर कापूस आणि एक दगड जड हलका कोणता हे विचारावे.<br>१. चालत येताना लागणारा वेळ व सायकलवरून येताना लागणारा वेळ असे अनुभव देऊन कमी–जास्त वेळ ठरविण्यास मदत करावी.<br>२. एखाद्या कुंडीमध्ये बी पेरून घ्यावी व उगवून येण्यास लागणारा वेळ | | | | |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | वेळानंतर होणारी गोष्ट यांची यादी शिक्षकांनी फळ्यावर लिहावी.<br><br>**कशा नंतर काय?**<br>१. कागदापासून वस्तू बनवण्याचा क्रम विचारात घेऊन कशानंतर काय ही संकल्पना सांगावी.<br>२. आधी पीठ मळायचे नंतर भाकरी करायच्या अशी उदाहरणे सांगून त्यांच्याकडून आणखी उदाहरणे जाणून घ्यावीत.<br>३. बाळ, छोटा मुलगा, तरुण मुलगा, मध्यम वयाचा माणूस, म्हातारा माणूस अशा चित्रांतून संकल्पना स्पष्ट करावी. | यावरून कमी वेळ जास्त वेळ सांगावे.<br>३. विद्यार्थ्यांना एखादी क्रिया करण्यासाठी लागणाऱ्या वेळेवरून कमी वेळ–जास्त वेळ ठरविण्याचा अनुभव द्यावा.<br><br>१. पुस्तकातील कोणत्या धड्यानंतर कोणता धडा येतो? असे प्रश्न विचारून कशानंतर काय ही संकल्पना स्पष्ट करून घ्यावी. | | | | |

**घटक :** आकार ओळख **उपघटक :** आकार ओळख **अंदाजे तासिका :** ५

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- विविध आकारांची ओळख

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. विविध आकारांच्या वस्तूंचे निकषांनुसार निरीक्षण करण्याची क्षमता विकसित करणे.<br>२. निरीक्षणाच्या आधारे आकारावरून वर्गीकरण करणे. | १. कार्डशीटचे विविध आकार कापून घ्यावेत.<br>२. परिसरातील विविध वस्तूंच्या आकारांचे निरीक्षण करण्यास सांगावे.<br>३. समान आकारांच्या वस्तू एकत्र करण्याची संधी द्यावी.<br>४. आकारांची नावे व आकार यांचा तक्ता बनवावा. | १. बांगडी, चेंडू व नाणे यांच्यातील साम्य व फरक विचारून विचार करण्याची संधी द्यावी.<br>२. विविध आकारांच्या लाकडी ठोकळ्यांना स्पर्श करून टोचणारे, न टोचणारे आकार विचारावेत. | निरीक्षण<br>विचार करणे,<br>कृती करणे.<br>प्रकल्प | | | |

**क्षेत्र : संख्याज्ञान**

**घटक :** १ ते ९ अंकांची ओळख **उपघटक :** १ ते ९ अंकांची ओळख व लेखन **अंदाजे तासिका :** ३०

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- १ ते ९ अंकांची ओळख वाचन व लेखन

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. गणिताच्या मदतीने दैनंदिन व्यवहार सुलभतेने पार पाडणे.<br>२. १ ते ९ संख्यांचा क्रम सांगता येणे.<br>३. वस्तूसमूह दिला असता त्यातील वस्तूंची संख्या सांगता येणे.<br>४. दिलेल्या संख्यांइतक्या वस्तूंचा समूह करता येणे.<br>५. दिलेले संख्याचिन्ह ओळखून वाचता येणे.<br>६. सांगितलेली संख्या ओळखून वाचता येणे. | १. शाळेच्या बागेतली झाडे, पाण्याच्या टाकीचे नळ, वर्गातील फळे, खिडक्या मोजायला लावण्याच्या कृती करून घेणे.<br>२. सांगितलेल्या संख्यांइतकी चित्रे काढण्याचा सराव घेणे.<br>३. चित्रात लपलेला अंक ओळखणे हा खेळ घ्यावा.<br>४. टेबलाला पाय किती? पंख्याला पाती किती? पक्ष्याला चोची किती? असे सोपे सोपे प्रश्न विचारावेत. | १. संख्याचिन्हे काढून त्यांवर डाळी, धान्य चिटकवून घ्याव्यात.<br>२. संख्याचिन्हे काढून त्यांवर रांगोळी चिकटवून त्यांवर बोटाने गिरविण्याचा सराव द्यावा.<br>३. काडेपेटीच्या आत अंक लिहावा. पेटीवर अक्षरी तोच अंक लिहावा व एक ते नऊ अंकांच्या जोड्या करण्यास सांगावे.<br>४. संख्यापट्ट्या तयार करून मधले अंक भरून घ्यावेत. | तोंडी,<br>कृती,<br>लेखी,<br>स्वाध्याय | **मराठी –** त्यांच्या भावविश्वातली नवीन उदाहरणे देऊन त्यांचा शब्दसंग्रह वाढवावा.<br><br>**पर्यावरण –** परिसरातील आंब्याची झाडे, परस बागेतील झाडे, मोजण्यास सांगावे. | | ०१.७१.०४ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | ५. रिकाम्या जागा पूर्ण करा ही कृती घ्यावी.<br>उदाहरणार्थ : मी आज डब्यात ------ पोळी आणली होती. आमच्या घरात ------ जण राहतात.<br>६. चित्रे काढावीत. एका विद्यार्थ्याने अचूक मोजले आहे असे दाखवावे, दुसऱ्या विद्यार्थ्याने चुकीचे मोजले आहे असे दाखवावे व कोणाचे उत्तर बरोबर असे विचारावे.<br>७. धूळपाटीवर अंकांचे रेखाटन करून घेणे.<br>८. अंकांची गोष्ट तयार करून घेणे.<br>९. बोटांनी दाखविलेला अंक ओळखण्यास सांगावे व लिहिण्यास सांगावे. | ५. चिंचोके, मणी यांच्या साहाय्याने अंकांचे आकार तयार करून घेणे.<br>६. दाखविलेल्या अंकांइतक्या टाळ्या वाजविणे, उड्या मारणे अशा कृती करून घेणे.<br>७. एका विद्यार्थ्याने फळ्यावर/पाटीवर बोटाने अंक काढायचा व दुसऱ्या विद्यार्थ्याने तो ओळखायचा असा खेळ घेणे. | | **भूगोल –** जिल्ह्यात किती नद्या आहेत, गावात किती मंदिरे आहेत, हे मोजायला लावावे.<br>**विज्ञान –** पंचेंद्रियांची ओळख करून देऊन ती मोजून घ्यावीत. | | |

**घटक :** शून्याची ओळख **उपघटक :** – **अंदाजे तासिका :** ५

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- शून्याची ओळख, वाचन व लेखन.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. गणिताच्या मदतीने दैनंदिन व्यवहार सुलभतेने पार पाडणे.<br>२. काही वस्तू नाही म्हणजे शून्य वस्तू हे सांगता येणे.<br>३. शून्य ही संख्या वाचता व चिन्हात लिहिता येणे. | १. फळ्यावर अनेक चित्रे काढावीत. प्रत्येक विद्यार्थ्याला एक चित्र पुसण्यास सांगावे. सर्व चित्रे पुसून झाल्यावर फळ्यावर किती चित्रे उरली असे विचारावे.<br>२. बरणीतील लाडू वाटायला द्यावेत. बरणीत लाडू संपल्यानंतर बरणीत किती लाडू उरले असे विचारावे.<br>३. ० संख्याचिन्हापासून चित्र काढण्यास सांगावे.<br>४. संपणे, काहीच नसणे, मोकळे असणे, म्हणजे शून्य ही संकल्पना पक्की करून घ्यावी. | १. मोबाईल/संगणकाच्या की बोर्डवर शून्य शोधायला लावावे.<br>२. इंग्रजी अक्षर 'O' व शून्य संख्याचिन्ह यांतील फरक लक्षात आणून द्यावा.<br>३. एक म्हटले की, वरच्या पायरीवर जायचे, शून्य म्हटले की, आहे तिथे थांबायचे असा खेळ घ्यावा. | तोंडी<br>लेखी<br>कृती | विविध विषयातील उदाहरणे घेऊन समवाय साधावा. | | ०१.७१.१३ |

**घटक :** १ ते १०० ची ओळख **उपघटक :** १ ते १०० संख्यांचे वाचन व लेखन **अंदाजे तासिका :** ९०

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- १ ते १०० संख्या ओळखता येणे.
- एक ते १०० संख्याचिन्ह लिहिता येणे.
- पुढची मागची संख्या सांगता येणे.
- संख्यांचा चढता– उतरता क्रम सांगता येणे.

| पाठ अध्यापनाची उद्‌दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. दैनंदिन व्यवहार सक्षमपणे व सुलभपणे पार पाडणे.<br>२. गणिताबद्दल आवड निर्माण करणे.<br>३. गणिती चिन्हांचा व तंत्रांचा सुलभतेने वापर करण्याचे कौशल्य प्राप्त करणे.<br>४. दशक–एकक स्वरूपात सांगितलेली संख्या अंकात लिहिता व वाचता येणे.<br>५. शंभर या संख्येची आणि संख्याचिन्हाची ओळख होणे.<br>६. शंभर ही संख्या लिहिता व वाचता येणे. | १. १ ते १०० संख्या क्रमाने म्हणण्याचा सराव घेणे.<br>२. १ ते १०० संख्यांचे रेकॉर्डिंग ऐकविणे.<br>३. आडव्या मांडणीत संख्यांचे वाचन घेणे. जसे – एक, अकरा, एकवीस.... | १. पाठ्यपुस्तकाच्या ज्या पानावर क्रमांक आहेत ती पाने उघडून संख्या वाचून घेण्याचा सराव घेणे.<br>२. १ ते १०० संख्यांचा तक्ता समोर ठेवून एका आड एक संख्या म्हणण्याचा सराव घेणे... जसे एक, तीन, पाच...<br>३. कॅलेंडरचे निरीक्षण करून संख्या वाचण्याचा सराव देणे.<br>४. वहीच्या पानांवर क्रमाने संख्या लिहिण्याची कृती करून घेणे.<br>५. संख्या म्हणण्याच्या विविध पद्धती वापरून सराव | तोंडी, लेखी | परिसरातील गोष्टींचे गणन करून घेऊन सर्व विषयांशी समवाय साधावा.<br><br>**भूगोल –** भारताचा नकाशा दाखवून राज्ये मोजून घ्यावीत. | | ०१.७१.१० |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | करून घेणे. उदा. शंभरच्या आधी नव्याण्णव, नव्याण्णवच्या आधी अठ्ठ्याण्णव याप्रमाणे तसेच एक नंतर दोन, दोन नंतर तीन, तीन नंतर चार, तसेच ११ म्हणजे एक दशक एक एकक, २१ म्हणजे दोन दशक एक एकक असा सराव घ्यावा.<br>६. मणी माळेवरून अंक मोजण्याचा सराव घेणे.<br>७. मणी माळेवर शिक्षक चिमटा लावतील, विद्यार्थी ती संख्या ओळखून तिचे वाचन व लेखन करतील, असा सराव घ्यावा. | | **विज्ञान –** हातांची, पायांची बोटे मोजण्या–सारख्या कृती करून घ्याव्यात. | | |

**क्षेत्र : संख्यावरील क्रिया**

**घटक :** ७) १ ते ९ अंकांपर्यंतची बेरीज–वजाबाकी **उपघटक :** बेरीज–वजाबाकी **अंदाजे तासिका :** ३०

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- १ ते ९ अंक वापरून बेरीज, वजाबाकी करता येणे.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. गणिताच्या मदतीने दैनंदिन व्यवहार सुलभतेने पार पाडणे.<br>२. दोन समूह एकत्र करणे म्हणजे 'बेरीज' हे सांगता येणे.<br>३. वाढविणे, मिळविणे अधिक या शब्दांचा उपयोग करून बेरजेचे विधान तयार करता येणे.<br>४. स्वतःची पद्धत वापरून, बेरीज करता येणे.<br>५. बेरीज जलद व अचूक करता येणे. | १. वस्तूंच्या साहाय्याने मोजणी व बेरीज आणि वजाबाकी यांचा सराव घ्यावा.<br>२. फळ्यावर चित्रे काढावीत व उभ्या व आडव्या मांडणीत बेरीज–वजाबाकीचा सराव घ्यावा.<br>३. सात बेरीज येईल अशा संख्यांच्या जोड्या सांगणे, अशा कृती करून घ्याव्यात.<br>४. तोंडी पटापट बेरीज व वजाबाकीची गणिते सोडविण्याचा सराव करणे.<br>५. चिन्ह व शब्द यांचा सहसंबंध सांगावा. | १. कार्डशीटपासून १ ते ९ अंक, बेरीज–वजाबाकी ही चिन्हे तयार करून बेरीज वजाबाकी यांचा खेळ घ्यावा.<br>२. वेगवेगळ्या वर्कशीट करून सोडविण्याचा सराव द्यावा. उदा.<br>१ + ३ = ४;<br>३ + १ = ४<br>५ + २ = ७,<br>२ + ५ = ७<br>संख्या, त्यांचा क्रम, येणारी बेरीज, विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावी. वजाबाकीसाठी हा नियम लागू पडेल का असा प्रश्न विचारावा. | लेखी तोंडी | **मराठी –** विद्यार्थ्यांच्या अनुभव विश्वातील उदाहरणे देऊन त्यांचा शब्दसंग्रह वाढवावा<br><br>**पर्यावरण –** निसर्गातील गोष्टींची उदाहरणे देऊन पर्यावरणाशी समवाय साधावा. | | ०१.७१.०४, ०१.७१.०६, ०१.७१.०७, ०१.७१.०८, ०१.७१.०९ |

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | उदा. एकूण म्हणजे अधिक, किती उरले म्हणजे वजाबाकी.<br>६. वस्तूंची संख्या दाखवून बेरीज करून घेणे. | ३. नाणी व नोटांचा वापर करून बेरीज, वजाबाकी करण्याचा अनुभव देणे.<br>४. समीकरणांचा वापर करून बेरीज, वजाबाकीचा सराव घेणे.<br>जसे :<br>५ + ३ = ८<br>८ – ३ = ५<br>८ – ५ = ३ | | | | |

**क्षेत्र : आकृतिबंध**

**घटक :** ८) आकृतिबंध **उपघटक :** आकारांचे आकृतिबंध व संख्यांचे आकृतिबंध **अंदाजे तासिका :** १०

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :**

- संख्या व परिसरातील वस्तूंचे आकार आणि त्यानुसार त्यांच्यामधील आकृतिबंध

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम (तंत्रासह) एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. गणिताबद्दल आवड निर्माण होणे.<br>२. संख्या, चित्रे आकृती, वस्तूंचे आकार, वेगवेगळे आवाज, (टाळ्या, टिचक्या) मधील आकृतिबंध लक्षात येणे. | १. विविध आकारांचे आकृतिबंध पूर्ण करणे.<br>२. विविध आकारांचे आकृतिबंध स्वतः तयार करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना द्यावा.<br>३. संख्यांचे आकृतिबंध पूर्ण करणे.<br>४. संख्यांचे आकृतिबंध तयार करण्याचा अनुभव द्यावा. | १. साडीची किनार, कापडाची किनार यांतील आकृतिबंध लक्षात आणून द्यावा.<br>२. पाने, फुले यांचा वापर करून आकृतिबंध तयार करण्याची संधी देणे.<br>३. चित्रकलेच्या माध्यमातून वेगवेगळ्या रंगांच्या माध्यमातून आकृतिबंध तयार करून घ्यावेत. | लेखी व तोंडी<br>प्रकल्प<br>निरीक्षण<br>कृती | **इतिहास व भूगोल –** लेण्यांमधील कोरीव काम चित्रात, गुगलच्या माध्यमातून दाखवून इतिहास व भूगोल या विषयाशी समवाय साधावा.<br>**चित्रकला –** चित्राच्या माध्यमातून आकृतिबंध तयार करून चित्रकलेशी समवाय साधावा. | | ०१.७१.११ |

## क्षेत्र : नाणी नोटा

**घटक :** नाणी नोटा  **उपघटक :** नाणी नोटांची ओळख  **अंदाजे तासिका :** ५

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • नाणी व नोटा ओळख.

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती–परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| नाणी व नोटा ओळखता येणे.<br>नाणी व नोटा वापरून १० रु. पर्यंतची रक्कम तयार करता येणे. | १. खेळण्यातील नाणी–नोटा हाताळायला द्याव्यात.<br>२. नाणी व नोटा यांचे मूल्य समजून द्यावे. उदा. १ रुपयाचे नाणे व नोट<br>३. सुटे व दशक यांच्यातील संबंध स्पष्ट करून सांगावा.<br>४. कार्डशीटपासून नोटा व नाणी तयार करून घ्यावीत. | १. भाजी बाजार मांडून प्रत्यक्ष व्यवहाराचा अनुभव द्यावा.<br>२. १ ते १० संख्यांमधील लहान–मोठेपणा समजावून द्यावा.<br>३. छोट्या वस्तू व त्यांचे कमी जास्त मूल्य सांगावे.<br>४. नाणी नोटांचा वापर करून चढता उतरता क्रम लावण्याचा अनुभव द्यावा. | निरीक्षण करणे, विचार करणे, कृती करणे. | प्रत्यक्ष व्यवहार करण्याचा अनुभव देऊन इतर विषयांशी समवाय साधावा. | | ०१.७१.०१<br>०१.७१.०४<br>०१.७१.०६ |

**क्षेत्र : वार**

**घटक :** सप्ताहाचे वार **उपघटक :** सप्ताहाचे वार सांगणे. **अंदाजे तासिका :** ५

**उपघटकांत समाविष्ट असलेले इतर संबोध/संकल्पना (अभ्यासक्रम २०१२ संबोध विकास तक्त्याच्या आधारे) :** • सप्ताहाचे वार

| पाठ अध्यापनाची उद्दिष्टे (अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | घटकावर आधारित सूचक कृती-परिसरीय, सर्वांगीण सहभाग पूरक कृती | अध्ययन अनुभवास पूरक उपक्रम एकविसाव्या शतकातील आव्हाने, जाणिवा | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची तंत्रे/साधने | इतर विषयांशी समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | अध्ययन निष्पत्ती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| सप्ताहाचे वार सांगणे. | १. सप्ताहाचे वार क्रमाने व उलट्या क्रमाने म्हणून घेणे.<br>२. वारांचा तक्ता तयार करणे.<br>३. कालचा, आजचा, उद्याचा वार विचारून घेणे.<br>४. कॅलेंडरचे निरीक्षण करण्याचा अनुभव देणे. | १. रोज फळ्यावर वार लिहिताना मुलांना विचारून लिहिणे.<br>२. वारांचे गाणे तयार करून म्हणून घेणे.<br>३. विद्यार्थ्यांना वारांची नावे देऊन त्यांचे गोल रिंगण बनविणे व रविवार नंतर परत सोमवार येतो हे स्पष्ट करून सांगणे. | निरीक्षण करणे, विचार करणे, कृती करणे. | गोष्टीतून वारांचा संदर्भ जोडून इतर विषयांशी समवाय साधणे. | | |

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

## विषय – आरोग्य व शारीरिक शिक्षण (खेळ)

### संवाद शिक्षक मित्रांशी

शालेय विद्यार्थ्यांचा सर्वांत आवडता विषय म्हणजे आरोग्य व शारीरिक शिक्षण. बालसुलभ खेळण्याच्या आवडीमुळे आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या तासिकेत विद्यार्थी नेहमीच सक्रिय असतात. या विद्यार्थ्यांना विषयाच्या उद्‌दिष्टनुरुप घटक, उपघटक, उपक्रमांमधील अपेक्षित क्षमता आणि कौशल्यांचे अध्यापन करून त्यांना शारीरिक व मानसिकरित्या सुदृढ बनविणे हे आपले कार्य.

**विषयाचे तासिका/वेळापत्रक नियोजन**

आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाच्या तासिका या वेळापत्रकाच्या नियोजनाप्रमाणे आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयासाठी वापरल्या जातील याबाबत शिक्षकांनी दक्ष असावे. तासिका सुरू होण्यापूर्वी मैदानावर सर्व तयारी करून ठेवावी. साहित्य व आखणी तयार असल्याने वेळ वाचतो. विद्यार्थ्यांना मैदानावर जाताना व येताना रांगेत जाण्यायेण्याची शिस्त लावावी. तासिकांची सुरुवात उत्तेजक हालचालींद्‌वारे करून घ्यावी. शिकविण्याचा मुख्य भाग झाल्यावर काही वेळ मनोरंजनात्मक खेळासाठीही ठेवावा. आपल्याकडे उपलब्ध साधन साहित्य, मैदान याचा कल्पकतेने वापर करून आरोग्य व शारीरिक शिक्षण विषय उद्‌देशानुरूप विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करावा.

**आजारी व दिव्यांग विद्यार्थ्यांचा विचार**

आजारी असलेल्या, नुकतेच दुखापतीतून बरे झालेल्या विद्यार्थ्यांना जोरकस व्यायाम किंवा तीव्र गतीच्या हालचाली करण्याची सक्ती करू नये. त्यांना जमेल त्या पद्‌धतीने तासिकेमध्ये सक्रिय ठेवावे. विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांनाही त्यांच्या क्षमतांचा विचार करून तासिकेमध्ये कृतिशील ठेवण्याचा प्रयत्न करावा. शिकलेले व्यायाम प्रकार हालचाली विद्यार्थी घरी करतील. आपल्या परिवारातही करून दाखवतील असे प्रोत्साहन द्यावे. किमान एक तास नियमित मैदानावर विविध खेळ, व्यायाम, धावणे, शारीरिक हालचालींचे प्रकार करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे. दररोज सूर्यनमस्कार घालण्याची सवय लावावी. विद्यार्थ्यांकडून विविध नवनवीन खेळ खेळून घ्यावे. त्यांच्या क्षमतेनुसार व्यायामाची तीव्रता, काठिण्यपातळी व वारंवारिता निश्चित करावी. आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे नियोजन करून संपूर्ण अभ्यासक्रमातील आरोग्याधिष्ठीत शारीरिक सुदृढतेच्या सर्व क्षमता व कौशल्याधिष्ठित कारक सुदृढतेचे सर्व कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त होतील याकडे विशेष लक्ष पुरवावे.

**मुलांच्या आनंदासाठी – मुलांच्या आरोग्यासाठी**

इयत्ता पहिलीच्या वयातील मुलेही कृतिशील असतात. सांघिक खेळात, तालबद्‌ध हालचालींमध्ये, विविध

व्यायाम प्रकारांमध्ये त्यांना रस असतो. त्यांच्या शारीरिक क्षमतांच्या विकासाचीही सुरुवातच असते. त्याचप्रमाणे योग्य शरीर स्थिती आणि विविध हालचालींबाबत योग्य माहिती त्यांना देणे आवश्यक असते. खेळ, विविध कृती, हालचाली व व्यायाम आदींचे महत्त्व सांगून त्यातून विकसित होणाऱ्या क्षमता, कौशल्ये व सामाजिक गुणांची माहिती त्यांना नकळत देण्याचा प्रयत्न करावा. सर्व विद्यार्थ्यांना 'आनंदासाठी, आरोग्यासाठी' मैदानावर भरपूर उपक्रम करण्याची संधी द्यावी. त्यांच्या कल्पना आणि मतांचा मान ठेवत त्यांच्या पद्धतीनेही हालचालींचे नियोजन करावे.

**उपक्रमात सहभागी होण्याची संधी व प्रोत्साहन**

खेळ व शर्यती जिंकणाऱ्या व हरणाऱ्या तसेच पहिल्या व दुसऱ्या स्पर्धकाचे/गटाचे कौतुक करावे. स्पर्धा जिंकण्यासाठी नसून सहभाग घेत आपले कार्यमान तपासण्यासाठी आहे हे बिंबवावे. आपल्या परिसरात उपलब्ध सोयीसुविधा, पद्धती व परंपरा यांच्यानुसार नियमितपणे विविध खेळ, कसरती, नृत्य, छंद आदी कृतिशील प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास प्रोत्साहन द्यावे. शालेय स्तरावर विविध स्पर्धा आणि उपक्रमांत सहभागी होण्याची संधी देऊन त्यांच्या क्षमता व सुप्त गुण विकसित होण्यासाठी प्रयत्न करावे.

**शारीरिक सुदृढता व मानसिक स्वास्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक शिक्षण**

मैदानावर सक्रिय असणारी मुले सामान्यतः विविध कौशल्य व सामाजिक गुण लवकर प्राप्त करतात. सहकार्य, गटात काम करण्याची क्षमता, निर्णय क्षमता, समस्या निराकरण, शिस्त, जबाबदारी, समन्वय आदी अनेक गुण मुलांमध्ये दिसून येतात. दैनंदिन खेळ व शारीरिक हालचालींमुळे आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांमधील चिंता आणि ताणतणाव कमी होऊन मानसिक व भावनिक स्थैर्य त्यांना प्राप्त होते. जे विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण तासिकेत मैदानावर सक्रिय असतात ते शैक्षणिक क्षेत्रातही अग्रभागी असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. शालेय जीवनात सक्रिय असणारे हे विद्यार्थी भावी जीवनातही शारीरिक व मानसिकदृष्ट्या अधिक स्वस्थ व सक्रिय असतात असे दिसून आले आहे. शारीरिक शिक्षण हे शारीरिक सुदृढता व मानसिक स्वास्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. यामुळे स्नायू व हृदयाच्या मांसपेशी मजबूत होतात व शरीर दमदार आणि लवचिक होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांना आपली विविध उद्दिष्टे योग्य रीतीने प्राप्त करण्यास यामुळे बरेच साहाय्य होते.

**विविध क्षमता चाचणी व शारीरिक उपक्रम**

क्रीडा विभागाच्या विविध क्षमता चाचण्या त्याचप्रमाणे 'फिट इंडिया'द्वारे घेण्यात येणारे विविध शारीरिक उपक्रम, त्यांतील चाचण्या यांचाही उपयोग शारीरिक शिक्षण तासिकांमधून शारीरिक हालचाली व शारीरिक सुदृढता विकसित करण्यासाठी करून घेता येईल.

**शारीरिक शिक्षणाच्या आधारित माहितीचे वाचन व संकलन**

शिक्षकांनी आरोग्य व शारीरिक शिक्षणावर आधारित विविध पुस्तके, ग्रंथ, मासिके, त्याचप्रमाणे सामाजिक माध्यमांवर उपलब्ध विविध व्हिडिओ आणि माहितीचे वाचन व संकलन करत रहावे. जेणेकरून विविध

हालचालींमागे अपेक्षित असलेल्या विविध शारीरिक क्षमता व कारक कौशल्यांच्या विकासाच्या उद्देशांची अधिक माहिती प्राप्त करता येईल. नवनवीन अध्ययन–अध्यापन पद्धती, उपक्रम, साहित्याचा विविधांगी वापर, कमी जागेत विविध खेळ व उपक्रम, मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन आदी विविध कल्पना बघायला मिळू शकतात. या सर्वांचा वापर आपल्या तासिकेमध्ये केल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य व शारीरिक शिक्षण मनोरंजनात्मक होईल.

**आरोग्य व शारीरिक शिक्षणाचा इतर विषयांचा समवाय**

आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या तासिकेतून इतर विषयांचा समवाय साधता येतो. विविध हालचाली व उपक्रमांदरम्यान इंग्रजी मुळाक्षरे, बाराखडी, शब्द, म्हणी, कविता यांचा कल्पक वापर करून भाषा विषयाचा समवाय साधून सराव घेता येतो, तर गणितातील संख्या, पाढे, वर्गमूळ, वर्ग, बेरीज, वजाबाकी, त्रिकोण, चौकोन अशा मूलभूत कौशल्यांचा मैदानावर खेळताना वापर करता येतो. विविध शास्त्रीय कारणे, भौगोलिक कारणे, असे का?, त्याचप्रमाणे खेळाचा इतिहास, विविध चांगल्या सवयी, नागरिकत्वाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आदी बाबींमधून परिसर अभ्यास विषयाचा समवाय साधता येईल. कला विषयाद्वारे विविध आकारांची आखणी, रंग भरणे, आकृती, चित्र काढणे तर कार्यानुभवामध्ये खेळाशी संबंधित विविध पर्यायी साहित्य, माहिती, तक्ते, आकृत्या, नकाशे व आवश्यक साहित्य तयार करून घेता येईल.

**विद्यार्थ्यांना द्यावयाच्या मार्गदर्शक सूचना**

- विद्यार्थ्यांच्या मानसिक क्षमता व शारीरिक सुदृढतेबाबत तात्त्विक मार्गदर्शन करून या क्षमतांची आवश्यकता व महत्त्व प्रसंगानुरूप विशद करावे.
- योग्य मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणावी आणि विविध ठिकाणी हे करावे, हे करू नये असा 'डूज अँड डोन्ट' सूचनेचा तक्ता विद्यार्थ्यांकरवी बनवून घ्यावा.
- घरात, शाळेत मैदानावर, गर्दीच्या ठिकाणी, निर्जन ठिकाणी, उंचावर, लिफ्टमधे, पायऱ्या चढत – उतरत असताना, अनोळखी व्यक्ती सोबत बोलताना – वागताना, कमी उजेड वा अंधाऱ्या ठिकाणी, सामाजिक कार्यक्रमांत, रस्त्यावर, आपत्कालीन परिस्थिती, नाट्यगृह आदी विविध ठिकाणी कसे वागावे? काय करावे? काय करू नये? यांबाबत मार्गदर्शक सूचना द्याव्यात.
- इयत्ता चौथी – पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांची वैयक्तिक आवड, क्षमता व कौशल्यांनुसार विद्यार्थ्यांना योग्य खेळाची निवड करण्यासाठी मदत करण्याबाबत पालकांना मार्गदर्शन करावे.
- आरोग्य व शारीरिक शिक्षण इयत्तानिहाय, वयाचा व क्षमतांचा विचार करून गृहपाठ, गृहकार्यासाठी साप्ताहिक वा मासिक कार्यतक्ता तयार करावा. यामुळे विद्यार्थी आपल्या घरी दैनंदिन कृतियुक्त जीवनशैलीचा अंगीकार करून शारीरिक हालचाली, व्यायाम, सूर्यनमस्कार, आसने, शरीरस्थिती व विविध सुदृढता कसोट्यांचा नियमित सराव करतील.

- क्रीडा नैपुण्य चाचण्या, शारीरिक सुदृढता कसोट्याकारक क्षमता चाचण्या, राज्य क्रीडा विभागाच्या बॅटरी टेस्ट, फिट इंडिया शारीरिक क्षमता चाचण्या व उपक्रम, शरीररचना, जाणीव, उंची, वजन, मोजमापे नोंदवणे यांबाबत पालक व विद्यार्थ्यांमधे जागृती करावी. स्वयं–मूल्यमापन तक्तानिर्मिती करून तो भरण्यास प्रोत्साहन द्यावे.
- विद्यार्थ्यांच्या अंगी विविध सामाजिक, भावनिक व शारीरिक क्षमता व गुण आत्मसात होणे तसेच शारीरिक व मानसिक क्षमता व कौशल्ये प्राप्त होत असण्याबाबत दक्ष असावे.
- विशेषतः विद्यार्थ्यांना विविध बाबतीत स्वयंपूर्णता, समाजात वावरताना सुरक्षितता, स्वतःची काळजी व निगा, आत्मरक्षा व संरक्षणाबाबतीत शारीरिक व मानसिक क्षमता विकसित होण्यासाठी मुलींना सशक्त करण्याचे विशेष प्रयत्न करावे.
- मोबाईल, इंटरनेट, कॉम्प्युटर आदी इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या वापराच्या सुयोग्य पद्धतीचे मार्गदर्शन करून त्यांच्या अतिवापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची विद्यार्थ्यांना कल्पना द्यावी.
- फावल्या वेळेच्या सदुपयोगाबाबत मार्गदर्शन करावे. कृतिशील छंद/हालचाली/व्यायाम प्रकार/कार्यशैलीची निवड करून त्यांतून आत्मिक समाधान मिळवण्यासाठी मार्गदर्शन करावे.
- विद्यार्थ्यांच्या अंगी विषयांच्या तासिकांतून, शालेय उपक्रमांतून व प्रसंगानुरूप चर्चेतून जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेली १० जीवनकौशल्ये विकसित होतील हे पहावे.
- विद्यार्थ्यांच्या समूह सहभागाचा सुयोग्य प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांमध्ये या वयात असलेले 'मी/माझे' ऐवजी 'आपण/आपले' अशी भावनिक सुधारणा करून खिलाडू वृत्ती, 'सांघिक भावना' निर्माण करणे व ती जोपासणेबाबत गोष्टीरूप व प्रसंगानुरूप आवश्यकता व महत्त्व यांबाबत मार्गदर्शन करणे.
- आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयात प्राप्त होणाऱ्या क्षमता व कौशल्यांचा आपल्या घरात, शाळेत व समाजात वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे.
- विविध क्रीडा प्रकारांनुसार मूलभूत कौशल्यांचा सराव व प्रशिक्षण पद्धतीची तात्त्विक माहिती पालकांना मिळण्यासाठी प्रोत्साहित करून दैनिक सरावासाठी आग्रह करावा.
- विविध खेळ, स्पर्धा, खेळाडू यांच्या प्रोत्साहित करणाऱ्या, प्रेरणादायी मार्गदर्शक कथा सांगून विद्यार्थ्यांची आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची आवड जोपासावी.

**संदर्भ साहित्य :** शिक्षकांनी अधिक माहितीसाठी आरोग्य व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२, शारीरिक शिक्षण हस्तपुस्तिका इयत्ता पहिली मूल्यमापन पद्धती मार्गदर्शिका, विविध लघु खेळ, शालेय उपक्रम या बालभारतीद्वारे प्रकाशित पुस्तकांचा आधार विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी घ्यावा.

■■■

# शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे ध्येय

**शारीरिक शिक्षणाचे ध्येय :**

विशिष्ट उद्दिष्टांनी निवडलेल्या शारीरिक हालचालींच्या माध्यमातून शारीरिक–मानसिक व सामाजिकदृष्ट्या निरोगी, सुदृढ, सर्जनशील व कृतिशील जीवनशैलीचा अंगीकार करणारा नागरिक तयार करणे हे शारीरिक शिक्षणाचे ध्येय आहे.

**इयत्ता पहिली : शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाची उद्दिष्टे**

- मुक्त हालचालींतून आनंद मिळवून देणे.
- अनुकरणात्मक हालचालींतून क्रियाशीलता वाढवणे.
- व्यायामाची आवड निर्माण करणे.
- आंतरिक ऊर्जेस वाव देणे.
- शारीरिक सुदृढतेची जाणीव निर्माण करणे.
- मूलभूत हालचालींची ओळख करून देणे.
- योग्य शरीरस्थितीबाबत जाणीव निर्माण करणे.
- आरोग्यविषयक चांगल्या सवयी अंगी बाणवणे.
- योग्य आहाराची ओळख व जाणीव करून देणे.
- मैदान व क्रीडांगण स्वच्छतेमधून परिसर स्वच्छतेची जाणीव निर्माण करणे.
- मनोरंजनात्मक बाबींमधून आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची आवड टिकवणे.
- समूह सहभागाचा प्रयत्न करणे.
- खिलाडू वृत्ती निर्माण करणे.

■■■

## आरोग्य व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाची क्षेत्रे

**आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची क्षेत्रे व त्याच्या क्षमता पुढीलप्रमाणे आहेत.**

- **आरोग्याधिष्ठित शारीरिक सुदृढता**

  १) हृदयाचा दमदारपणा  २) स्नायूंची ताकद  ३) स्नायूंचा दमदारपणा
  ४) लवचिकपणा  ५) शरीरधारणा

- **विविध हालचाली व योग्य शरीरस्थिती**

  १) जागेवर करावयाच्या हालचाली  २) जागा बदलत करावयाच्या हालचाली
  ३) साहित्य व सहकाऱ्यांबरोबर हालचाली  ४) शरीर नियोजन कौशल्य

- **कौशल्याधिष्ठित कारक सुदृढता**

  १) वेग  २) समन्वय  ३) दिशाभिमुखता
  ४) शक्ती  ५) तोल  ६) प्रतिक्रिया काल

- **आरोग्य**

  **अ) वैयक्तिक आरोग्य**

  १) आहार  २) शरीरावयव  ३) वैयक्तिक स्वच्छता
  ४) स्वच्छतागृहाचा वापर  ५) विश्रांती व झोप  ६) वाईट सवयींना प्रतिबंध

  **ब) मैदानावरील आरोग्य**

  १) पोशाख  २) मैदान स्वच्छता  ३) क्रीडांगण आखणी
  ४) साहित्याचा वापर व निगा  ५) व्यायाम व सुरक्षितता  ६) प्रथमोपचार

- **कृतिशील जीवनशैली**

कृतिशील जीवनशैली म्हणजे दैनंदिन जीवनात कृतिशील राहणे, विविध कार्य आवडीने करणे आणि फावल्या वेळेचा सदुपयोग करून खेळ, व्यायाम अशा शारीरिक हालचाली किंवा एखादा छंद जोपासणे. मैदानावर खेळणे, पदभ्रमण, दैनंदिन सूर्यनमस्कार, व्यायाम आदी उपक्रम हे कृतिशील जीवनशैलीचा भाग आहेत.

■■■




**शारीरिक शिक्षण विषयाचा इतर विषयांशी समवाय**

प्राथमिक शिक्षणात नव्यानेच शिक्षण सुरू केलेल्या विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया करत असताना शिक्षकांना सर्व विषयांचा एकमेकांशी समन्वय ठेवून अध्ययन अध्यापन प्रक्रिया पुढे नेण्याची कला अवगत असावी लागते. शारीरिक शिक्षणाच्या सर्वच विषयांशी समवाय करून शिक्षक विद्यार्थ्यांना आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या अध्ययन निष्पत्तीसोबतच इतरही विषयांमधील विविध घटक आणि उपघटकांचा योग्य रितीने सराव करून घेण्याचा यशस्वी प्रयत्न करू शकतात.

भाषा, गणित, परिसर अभ्यास, कला आणि कार्यानुभव या विषयांचा आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयांशी समन्वय साधून शारीरिक शिक्षणाच्या तासांमध्ये विद्यार्थ्यांना उद्दिष्टांनुसार व अध्ययन निष्पत्तीच्या अनुषंगाने उपक्रमांचे अध्ययन करायचे आहे.

इयत्ता पहिलीमध्ये अध्यापन होत असलेले विषय भाषा, गणित, कला, कार्यानुभव यांचा एकमेकांशी समन्वय साधून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अध्यापन केल्यास हे सर्व विषय योग्य त्या पद्धतीने उद्दिष्टानुरूप

विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतात. आवश्यक त्या अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांमध्ये निश्चितपणे दिसतात. त्यामुळे शिक्षकांनी आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाच्या तासिकांमध्येही आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामधील विविध उपक्रमांत विविध विषयांमधील प्राथमिक कौशल्यांचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांनी मिळवलेले ज्ञान दृढ होण्यास मदत होते.

इतर विषयांच्या तासिकांमध्येही आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामधील विविध उपक्रमांचा वापर करता येईल.

**भाषा विषयाशी समवाय**

भाषेमध्ये मुळाक्षरे, स्वर, व्यंजने यांचा क्रम तसेच विविध शब्द, म्हणी, वाक्य, प्रश्नोत्तरे यांचा उपयोग विविध उपक्रमांतून करून घेता येईल. भाषेच्या साहाय्यानेच विविध संदेश, कानगोष्टी, सूचना यांचे योग्य आदान–प्रदान आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या मैदानी व वर्गखोलीतील विविध उपक्रमांत शिक्षकांना आपल्या कौशल्याने व नावीन्यपूर्ण पद्धतीने वापरण्याची संधी आहे.

**गणित विषयाशी समवाय**

गणित विषयाचा समवायही सहजपणे करता येतो. संख्या, पाढे, मूलभूत क्रिया जसे – बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, घनमूळ, लहान की मोठा, कमी की जास्त, आधी की नंतर अशा पद्धतीच्या गणितीय संकल्पना रुजवण्यासाठी खेळाचा उपयोग आरोग्य व शारीरिक शिक्षण तासिका व उपक्रमांतही कल्पकतेने शिक्षकांना करता येईल.

**परिसर अभ्यास विषयाशी समवाय**

परिसर अभ्यास विषयांच्या विविध संज्ञा, इतिहास, शास्त्रीय महत्त्व, असे का होते?, याचे कारण काय? या बाबी आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या उपक्रमांतूनही विद्यार्थ्यांना शिकवता येतील.

**कला विषयाशी समवाय**

मैदान आखणी करणे, मातीवर गिरवणे, कलात्मक रीतीने मांडणी करणे, चित्रे काढणे, व्यायाम प्रकारांना नाट्यमय रितीने सादर करणे, नृत्य या बाबींद्वारे कला विषयाशी समवाय साधता येईल.

**कार्यानुभव विषयाशी समवाय**

कागदी, स्पंज, कापसाचे चेंडू बनवणे, पर्यायी क्रीडा साहित्य तयार करणे, माहितीचे तक्ते तयार करणे, कात्रणे जमवणे, चिकटवही अशा प्रकारच्या बाबी कार्यानुभव विषयाशी समवाय साधतात.

■■■

## पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| १ | **मूलभूत हालचाली– जागेवर करायच्या हालचाली अंदाजे तासिका (८)** | **वाकणे :**<br>➢ उभे राहून कमरेतून समोर, बाजूला, मागे, पुढे.<br>खाली बसून विविध दिशांना समोर, मागे, बाजूला.<br>• कमरेतून वाकून–दोन्ही पायांत अंतर ठेवून गुडघे सरळ ठेवत. | विविध प्रकारे वाकतो. |
| | | **ताणणे :**<br>➢ हात पाय वर–खाली, मागे–पुढे, विविध दिशांना, पंजे व तळवे मागे–पुढे.<br>➢ शरीराचे विविध भाग क्रमाने, पाठ, कंबर व मांड्यांचे स्नायू | विविध प्रकारे ताणतो. |
| | | **वळणे :**<br>➢ चवड्यांवर उभे राहून दोन्ही बाजूंना, मागे, उडी मारून दोन्ही बाजूंना.<br>➢ दोन्ही बाजूंनी गिरकी घेऊन वळणे, एका चवड्यावर वळणे. उभे राहून, झोपून वळणे. | विविध प्रकारे वळतो. |
| | | **उड्या मारणे :**<br>➢ एका पायावर उडी मारणे. | विविध प्रकारे उड्या मारतो. |
| | | **गिरकी घेणे :**<br>➢ चवड्यांवर उभे राहून दोन्ही बाजूंना मागे, टाचांवर उभे राहून दोन्ही बाजूंना मागे.<br>➢ १८० अंश गिरकी घेऊन मागे, ३६० अंश गिरकी घेऊन एका पायावर. | विविध प्रकारे गिरकी घेतो. |
| | | **अवतरण करणे :**<br>➢ एका पायावर उडी मारणे, दोन्ही पायांनी पुढे उडी मारणे, एका पायावर अवतरण करणे.<br>➢ उडी मारत दोन्ही पायांवर अवतरण करणे. | विविध प्रकारे उड्या मारतो. योग्य अवतरण करतो. |
| | | **विविध प्रकारे तोल सांभाळणे :**<br>➢ तोल सांभाळणे : एका पायावर, चवड्यांवर, टाचेवर; वीट, ठोकळा, लाकडी फळी, बेंच, टेबल, कमी उंचीच्या साधनांवर, पायरीवर तोल सांभाळणे. | पंजावर विविध प्रकारे तोल सांभाळतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | | ➢ एका पायावर उभे : पाय मागे, पाय समोर पकडत, पाय मागे, पाय समोर ताणत, शरीराचा टी बॅलन्स, एक हात एक पाय जमिनीवर टेकवत, जमिनीवर दोन्ही हात टेकवून पाय वर घेत तोल सांभाळणे.<br>**जागेवर धावणे :**<br>➢ जागेवर चकवणे, जागेवर लंगडी घालणे, पंजावर उड्या मारणे.<br>**गॅलपिंग :**<br>➢ गॅलपिंग करतो. | जागेवर धावतो.<br>जागेवर चकवतो.<br>जागेवर लंगडी घालतो<br>गॅलपिंग करतो. |
| | **मूलभूत हालचाली – जागेवर करायच्या हालचाली अंदाजे तासिका (१६)** | **चालणे :**<br>➢ वेगवेगळ्या वेगाने चालणे, हात हलवत, पाय वर उचलत, पाय मागे उचलत, पायाच्या कडेवर, तळव्याच्या कडेवर, टाच/चवड्यांवर, जवळजवळ पावले टाकत, दूरदूर पावले टाकत, चालत चालत गुडघ्यांत वाकत, चालत खाली वाकत, उभे राहत, चालत, गुडघे वाकत, खाली बसत व उठत.<br>**धावणे :**<br>➢ हळूहळू धावणे, पाय वर उचलत धावणे, पाय मागे करत, पाय समोर टाकत धावणे, सायकलिंग करत धावणे, नागमोडी धावणे, गोलाकार धावणे, बाजूला धावणे.<br>➢ त्रिकोणी, चौकोनी– धावणे, सरळ धावणे, समोर धावणे.<br>➢ सरळ मागे धावणे, एक पाय एक उडी मारणे धावणे.<br>**चकवणे/हुलकावणी देणे :**<br>➢ चकवणे जागेवर हात न लागण्यासाठी, चकवणे पाय न लागण्यासाठी, चकवणे जागा बदलत हात/पाय न लागण्यासाठी.<br>**लंगडी :**<br>➢ डाव्या पायाने लंगडी करणे, उजव्या पायाने मागे पुढे, वेग बदलत लंगडी करणे.<br>**झाप मारणे लंगडी घेणे :**<br>➢ एक आड एक पायावर झाप मारून घेणे, लयबद्ध पद्धतीने वेग व अंतर कमी–जास्त करीत झाप. | विविध इशाऱ्यांनुसार हालचाली करतो.<br><br>सांगितल्याप्रमाणे धावतो.<br><br>हुलकावणी देतो.<br><br>लंगडी घालतो.<br><br>झाप मारतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | | **सरकणे–घसरणे :**<br>➢ जागेवर उभे राहून पाय जमिनीवर घासत सरकणे, लगेच दुसऱ्या पायाजवळ वजन संक्रमण, धावत येऊन एका पायाने घसरणे, दोन्ही पायांनी धावत येऊन घसरणे. | सरकतो/घसरतो. |
| | **मूलभूत हालचाली – साहित्य व सहकाऱ्यांसह करावयाच्या हालचाली अंदाजे तासिका (२४)** | **मोठा व हलका चेंडू हाताळणे :**<br>➢ चेंडू फेकणे, झेलणे, कडीमधून टाकणे, इत्यादी, बीन बॅग सहा सामान्य व्यायाम प्रकार.<br>➢ वस्तूवर नजर, अचूक अंदाज, योग्य समन्वय, डोळे, हात, कंबर व गुडघ्यांची हालचाल<br>➢ पुढे–मागे सरकणे या बाबींची माहिती द्यावी. | विविध प्रकारे चेंडू हाताळतो.<br>बीन बॅगसह व्यायाम करतो. |
| | | **फेकणे :**<br>➢ मोठा फुगा दोन्ही हातांनी वर फेकून देणे. कागद चुरगाळून त्याचा चेंडूसारखा आकार करून फेकून देणे, कागदी चेंडू एकमेकांकडे मोठ्या आकाराकडून लहान आकाराकडे, शरीर, हात, खांदे, नजर योग्य स्थिती समजणे. | फेकणे क्रिया योग्य पद्धतीने करतो. |
| | | **झेलणे :**<br>➢ येणारा चेंडू, वेग, अंतर, दिशा व गती यांचा अंदाज; हातांची स्थिती, हातांची पकड; चेंडू पकडल्यावर चेंडू हाती आल्यावर घट्ट पकड. | झेलणे क्रिया योग्य पद्धतीने करतो. |
| | | **लाथडणे :**<br>➢ मोठा चेंडू पायाने समोर मारणे, पायाची व कमरेची स्थिती, योग्य स्थिती, तोल सांभाळण्यासाठी हात व खांद्याची हालचाल, एकमेकांकडे चेंडू लाथाडणे, भिंतीवर चेंडूला लाथाडणे, धावत्या चेंडूला लाथाडणे. | लाथाडणे क्रिया योग्य पद्धतीने करतो. |
| | | **चेंडू टोलावणे :**<br>➢ बॅट, रॅकेट, स्लगर, काडी किंवा हाताने चेंडूला फटकावणे, टोलावणे, उभे राहण्याची योग्य पद्धत, येणाऱ्या चेंडूवर नजर, हातांची कोपरातून स्थिती, मनगटाची हालचाल. | चेंडू टोलवणे क्रिया योग्य पद्धतीने करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | | ➢ बॅट, स्लगर, काडी चेंडूवर अचूक घात, सुरुवातीला मोठ्या चेंडूला मारणे, कागदी चेंडूचा वापर, छोट्या आकाराच्या चेंडूचा सराव, टांगत्या चेंडूवर सराव, जमिनीवर घरंगळणाऱ्या चेंडूवर सराव, हळुवार फेकलेल्या चेंडूवर सराव. | |
| २ | **विविध व्यायाम – सामान्य व्यायाम व उत्तेजक व्यायाम अंदाजे तासिका(१६)** | **उत्तेजक व्यायाम :**<br>➢ सांधे व स्नायूंना उत्तेजक करणारे व्यायाम, हालचालींचा क्रम, डोक्याकडून पायाकडे/ पायाकडून डोक्याकडे,<br>➢ पारंपरिक पद्धत – हळुवार धावणे, शरीर ताणणे, वाकणे, वळणे, उड्या, विविध प्रकारे धावणे, | सर्व सांधे व स्नायूंना उत्तेजित करणारे व्यायाम करतो. |
| | **विविध व्यायाम – सामान्य व्यायाम एबीसी ड्रिल्स अंदाजे तासिका (८)** | **विविध प्रकारे धावणे : एजिलीटी रन**<br>➢ शारीरिक क्षमता विकासासाठी हालचालींचे व्यायाम<br>➢ मूलभूत क्षमता विकसनासाठी हालचालींचे व्यायाम<br>➢ नागमोडी धावणे, आगगाडी/विमानासारखे धावणे, गटवार कृती – इशाऱ्यानुसार विविध दिशांना धावणे, विविध प्रकारे धावणे, तोल सांभाळणे.<br>➢ जमिनीवर चेंडूचे टप्पे टाकणे, उंच उड्या मारणे, पायऱ्या चढणे, लटकणे, झोके घेणे. चेंडू टाकणे, बीन बॅगसह व्यायाम. | चपळाईने विविध प्रकारे धावतो. |
| | **तालबद्ध व्यायाम अंदाजे तासिका (१६)** | **तालबद्ध व्यायाम**<br>➢ कॅलॅस्थेनिक्स, ॲरोबिक्स; मास पिटी खडी, बैठी; ससाहित्य व्यायाम प्रकार : फुगे, डंबेल्स, रिबिन इत्यादी. | शिकवलेले सर्व तालबद्ध व्यायाम प्रकार व उपक्रम करतो. |
| | **विशेष व्यायाम – अनुकरणात्मक हालचाली अंदाजे तासिका (४)** | **विविध प्राणी चाल व उडी :**<br>➢ बेडूक उडी, हत्ती चाल, इतर विविध प्राणी चाल व उडी. | अनुकरणात्मक हालचाली करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | **विशेष व्यायाम – सूर्यनमस्कार अंदाजे तासिका (८)** | **दहा अंकातील सूर्यनमस्कार :**<br>➢ सूर्यनमस्कार १ ते १० अंकांपर्यंत क्रमवार कृती.<br>➢ कृती योग्य क्रमाने होत आहेत याकडे लक्ष द्यावे.<br>➢ सलग तीन ते पाच सूर्यनमस्कार करून घ्यावे.<br>➢ घरी दररोज अकरा सूर्यनमस्कार घालण्यास सांगावे. | सूर्यनमस्कार शरीरस्थिती क्रमवार करतो. |
| | **विविध व्यायाम – विशेष व्यायाम धाडसी व्यायाम प्रकार अंदाजे तासिका (८)** | **धाडसी व्यायाम प्रकार**<br>➢ मनोरे – एक, दोन थरांचे मानवी मनोरे<br>➢ रोल, पुढील कोलांटी<br>➢ लटकणे, घसरगुंडीवरून घसरणे.<br>➢ कमी उंचीच्या पायऱ्या चढणे, उतरणे, उडी मारणे खालून वर, वरून खाली.<br>➢ जोर लावणे, हाताने ढकलणे, हाताने ओढणे, खांद्याने ढकलणे, रस्सीखेच. | शिकवल्याप्रमाणे, मनोरे करतो. लटकणे, रोल शिकवल्याप्रमाणे करतो. |
| | **विविध व्यायाम विशेष व्यायाम गतिरोध मालिका अंदाजे तासिका (८)** | **पाच ते सात अडथळ्यांची गतिरोध मालिका**<br>➢ वेगवेगळे व्यायाम प्रकार, क्रमवार, मधे खंड न पडता, एकाच गतीमध्ये पूर्ण करणे,<br>➢ उदाहरणार्थ : थोडे अंतर धावणे, नागमोडी धावणे, साहित्यावरून उड्या मारणे, बेडूक उडी, पायऱ्या चढणे, उतरणे, टेबलखालून जाणे, बेंचवरून उडी मारणे.<br>➢ कोलांटी उडी, दोरीवरून उडी मारणे, अडथळ्यावरून किंवा खालून जाणे इत्यादी.<br>➢ जंगल जिमचा अडथळा म्हणून उपयोग.<br>➢ गतिरोध मालिका क्षमतेनुसार विविध उपक्रम व्यायाम प्रकार व काठिण्यपातळी वाढवावी.<br>➢ कमीत कमी वेळात योग्य सर्व स्थितीसह योग्यप्रकारे करण्याची प्रोत्साहन द्यावे.<br>➢ गतिरोध मालिकेचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता नाही.<br>➢ उपलब्ध साहित्य, कल्पकतेने मालिका तयार करता येईल.<br>➢ गतिरोध मालिकेच्या स्पर्धा घेता येतात. | गतिरोध मालिकेतील सर्व अडथळे पार करतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| ३ | **कवायत संचलन**<br>**कवायत**<br>**अंदाजे तासिका (६)** | **कवायत :**<br>➢ **एक लाईन बन**<br>एकामागे एक रांग तयार करणे, एक लाईन बन<br>➢ **कदवार एक लाईन बन**<br>या आज्ञेनुसार उंचीनुसार रांग सर्वांत उंच विद्यार्थी शिक्षकांसमोर व त्याच्या डावीकडे इतर विद्यार्थ्यांनी आपल्या उंचीनुसार उभे राहावे. खांद्यांच्या उंचीनुसार आपली उंची तपासण्याची पद्धत सांगावी.<br>➢ **सावधान**<br>डावा पाय उचलून नव्वद अंशाचा कोन, टाचेला टाच लावणे, हातांच्या मुठी बंद, खांदे खाली खेचलेले, हात मांडीला चिकटलेले, मान ताठ, नजर समोर, टाचेमध्ये तीस अंशाचा कोन, सावधान करताना क्रमवार योग्य शरीरस्थिती बघावी.<br>➢ **विश्राम**<br>डावा पाय समोर उचलून नव्वद अंशाचा कोन, डावा पाय साधारण दहा ते बारा इंच बाजूला, जोरात दोन्ही हात मागे, डाव्या हातावर उजव्या हातांची बोटे, डाव्या हाताच्या अंगठ्यावर उजव्या हाताचा अंगठा, पाठ, गुडघे ताठ, नजर सरळ, खांदे ओढलेले, सावधानमधून विश्राम आणि विश्राममधून सावधानमध्ये स्थितीबदल करताना हात शरीरालगत चिकटलेले असावेत. अनावश्यक हालचाली होणार नाहीत हे सांगावे. मानेची अनावश्यक हालचाल टाळावी.<br>➢ **आराम से**<br>पायाची हालचाल न करता कमरेवरील शरीराची हालचाल करण्याची परवानगी असल्याचे समजावे. सावधान विश्राम आराम से एक लाईन बन आदेश देण्याचा व त्यानुसार कृती करण्याचा सराव सर्वांकडून करून घ्यावा.<br>सावधान विश्रामची स्पर्धा घेता येईल. | रांगेत उभा राहतो.<br>सावधान, विश्राम, आराम से या कृती करतो. |
| ४ | **विविध खेळ – स्थानिक व पारंपरिक खेळ**<br>**अंदाजे तासिका (१२)** | **स्थानिक पातळीवरील पारंपरिक खेळ :**<br>➢ टिक्करबिला, विटीदांडू, लगोरी, रप्पारप्पी/आबाधुबी, सणांचे खेळ, टिपरी, लेझीम, लोक नृत्य, गोट्या, कंचे, कवड्या, सागरगोटे, स्थानिक परिसरातील खेळले जाणारे विविध खेळ स्थानिक खेळांची ही विद्यार्थ्यांना माहिती देऊन ते खेळण्यास उत्तेजन द्यावे. | स्थानिक व पारंपरिक खेळांत आवडीने सहभागी होतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | | ➢ स्थानिक व पारंपरिक खेळ खेळताना सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग, उत्साह, शारीरिक क्षमता, मनोरंजन, खेळांचे लवचिक नियम, पर्यायी साहित्य, जागेनुसार मांडणी आदी बाबी लक्षात घ्याव्या. | |
| | **विविध खेळ – लघुखेळ अंदाजे तासिका (१२)** | **स्पर्धात्मक खेळ : विनासाहित्य/ससाहित्य :**<br>१) आईचे पत्र हरवले, २) विमान विमान, ३) पाणी घालणे, ४) खिंड ओलांडणे, ५) ट्रॅफिक सिग्नलचा खेळ.<br>➢ शारीरिक सुदृढता – हृदय संवहन, दमदारपणा, ताकद, लवचिकपणा, शरीरधारणा अशा क्षमता कौशल्य विकसनाचे खेळ घ्यावे.<br>➢ कारक कौशल्ये – वेग, दिशाभिमुखता, तोल, समन्वय, प्रतिक्रिया काल अशा कौशल्यक्षमता विकसनाचे खेळ घ्यावे. | लघु खेळांमध्ये उत्साहात सहभागी होतो. |
| ५ | **विविध खेळ, शर्यती अंदाजे तासिका (१२)** | **स्पर्धात्मक खेळ : विनासाहित्य/ससाहित्य :**<br>१) जलद चालणे शर्यत. २) उलटसुलट करणे शर्यत. ३) वस्तूभोवती वळसे घेणे.<br>४) गटाने धावण्याची शर्यत. ५) धावण्याची शर्यत.<br>➢ शारीरिक सुदृढता – हृदय संवहन, दमदारपणा, ताकद, लवचिकपणा, शरीरधारणा अशा क्षमता कौशल्य विकसनाच्या शर्यती घ्याव्या.<br>➢ कारक कौशल्य – वेग, दिशाभिमुखता, तोल, समन्वय, प्रतिक्रिया काल अशा कौशल्यक्षमता विकसनाचे शर्यती घ्यावे. | शर्यतीमध्ये उत्साहाने सहभागी होतो. |
| ६ | **विविध स्पर्धा अंदाजे तासिका (८)** | **विविध उपक्रमांवर आधारित विविध स्पर्धा :**<br>➢ शिकवलेल्या हालचाली व कौशल्यांच्या साहाय्याने स्पर्धा.<br>➢ सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग. नेतृत्व गुणाला संधी. त्यांच्यातील सुप्त गुणांना संधी.<br>➢ आयोजन/नियोजनात सहभागाची संधी द्यावी.<br>➢ या विविध स्पर्धांतून खिलाडू वृत्ती, आज्ञापालन, सहकार्य, समन्वय, संघभावना, शिस्त, नेतृत्व आदी गुण विकसित होण्यासाठी विशेष प्रयत्न करावे.<br>➢ विविध स्पर्धांतून जीवन कौशल्य उपयोजन योग्य पद्धतीने विद्यार्थी करतो आहे याकडे लक्ष द्यावे. ('स्व' ची जाणीव, समानानुभूती, ताणतणावाचे नियोजन, भावनांचे समायोजन, निर्णय क्षमता, चिकित्सक विचारशक्ती, संवाद कौशल्य, वैयक्तिक संबंध इत्यादी.) | विविध स्पर्धांमध्ये आवडीने सहभागी होतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| ७ | **आरोग्य विषयक अंदाजे तासिका (२)** | **शारीरिक स्वच्छता :**<br>➢ विद्यार्थ्यांची वर्षातून दोनदा संपूर्ण आरोग्य तपासणी.<br>➢ दैनिक तासिकांमध्ये विद्यार्थ्यांची शारीरिक स्वच्छता.<br>➢ बाह्य अवयव स्वच्छता, आरोग्यविषयक सवयी.<br>➢ नखे, त्वचा, नाक, डोळे, केस, दात, जीभ, कान आदींबाबत तपासणी व माहिती. | माहिती घेतो.<br>शारीरिक स्वच्छता करतो. |
| | **आहारविषयक अंदाजे तासिका (२)** | **आहार :**<br>➢ योग्य आहाराचा तक्ता–<br>➢ हे करावे/हे करू नये, सूचना/माहिती<br>➢ सकस आहार, आहार घटकांचा व खाद्यपदार्थांचा तक्ता<br>➢ सर्व प्रकारच्या भाज्या, फळभाज्या, पालेभाज्या, डाळी, भात, पोळी, उसळी, कोशिंबिरी, फळे, दूध आदी पदार्थांच्या सेवनाचे महत्त्व.<br>➢ आहार घेण्याच्या योग्य सवयी, आहार घेण्याच्या वेळा.<br>➢ आहार घेताना ताटातील सर्व पदार्थ संपवण्याची शिस्त. | योग्य व सकस आहाराचे महत्त्व समजते. आरोग्यासंबंधीत सर्व चांगल्या सवयींची माहिती घेतो व पालन करतो. |
| | **आरोग्यविषयक शरीरावयव माहिती अंदाजे तासिका (२)** | **शरीरावयव माहिती :**<br>➢ बाह्य अवयव तक्ता<br>➢ केस, डोळे, कान, नाक, त्वचा, नखे इत्यादी.<br>➢ शरीरावयव तक्ता<br>➢ कोणते अवयव व कोणती कृती याची माहिती व चर्चा<br>➢ त्या त्या अवयवाचा योग्य उपयोग व योग्य वापराची पद्धत माहिती.<br>**पाणी पिण्याच्या सवयी –**<br>➢ तहान लागण्यापूर्वी पाणी पिण्याची सवय.<br>➢ बसून व सावकाश पाणी पिण्याची योग्य पद्धत.<br>➢ दिवसाला दोन ते तीन लीटर पाणी पिणे<br>➢ शाळेत, मैदानावर जाताना स्वतःची पाण्याची बाटली जवळ ठेवण्याची सवय. | बाह्य अवयवाच्या स्वच्छतेचे महत्त्व जाणतो व स्वच्छता राखतो.<br><br>पाणी पिण्याचे महत्त्व जाणतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | **आरोग्यविषयक वैयक्तिक स्वच्छता अंदाजे तासिका (२)** | **वैयक्तिक स्वच्छता :**<br>➢ शारीरिक स्वच्छता – बाह्य अवयव<br>➢ केस, डोळे, नाक, दात, कान, नखे, त्वचा – स्वच्छता व निगा<br>➢ आवश्यकता व महत्त्व – स्वच्छता सवयी तपासाव्यात.<br>➢ कपडे स्वच्छता – चांगल्या सवयींची माहिती<br>➢ पादत्राणे स्वच्छता – चांगल्या सवयीची माहिती | कपडे, पादत्राणे व आरोग्य संबंधित सर्व चांगल्या सवयींची माहिती घेतो व पालन करतो. |
| | **स्वच्छतागृह वापरावयाच्या चांगल्या सवयी अंदाजे तासिका (२)** | **स्वच्छतागृह वापरासंबंधी चांगल्या सवयी :**<br>➢ मलमूत्र विसर्जन रोखून न धरता करण्याची सवय.<br>➢ मलमूत्र विसर्जन योग्यवेळी योग्य ठिकाणी करावे.<br>➢ मलमूत्र विसर्जनानंतर हात, पाय व अवयव स्वच्छ करण्याची सवय<br>➢ हात धुताना साबण/हँड वॉशचा वापर करण्यास प्रोत्साहित करावे. | स्वच्छतागृहाच्या वापराची माहिती घेतो व पालन करतो. |
| | **विश्रांती व झोप अंदाजे तासिका (२)** | **विश्रांती व झोप :**<br>➢ आठ ते दहा तास झोप,<br>➢ दररोज रात्री लवकर झोपणे, सकाळी लवकर उठणे.<br>➢ फायदे व महत्व याची चर्चा.<br>➢ झोपण्याची योग्य पद्धती, सुरक्षितता.<br>➢ बिछाना–अंथरूण–पांघरूण व सामान्य बाबींची चर्चा. | विश्रांती झोपेचे महत्त्व जाणतात व योग्य पद्धतीने पालन करतो. |
| | **आरोग्यविषयक वाईट सवयींना प्रतिबंध अंदाजे तासिका (२)** | **वाईट सवयींना प्रतिबंध**<br>➢ उघड्यावरचे खाद्यपदार्थ, गाडीवरील खाद्यपदार्थ,<br>➢ उघड्यावरील बाहेरच्या पदार्थांचे सेवनाचे दुष्परिणाम,<br>➢ पाकीटामधून मिळणारे विविध तयार खाद्यपदार्थ, वडापाव, कचोरी, समोसा, बर्गर, पिझ्झा, नूडल्स, भेळ, आदी पदार्थांचे अतिसेवनाचे दुष्परिणाम.<br>➢ चहा, कॉफी, शीतपेये यांचे शरीरावरील दुष्परिणाम याबाबत चर्चेतून माहिती द्यावी.<br>➢ योग्य आहार घेण्यासाठी प्रवृत्त करावे व उघड्यावरील बाहेरचे खाद्य पदार्थ खाण्यापासून परावृत्त करावे. | तयार खाद्यपदार्थ, शीतपेय सेवनाचे दुष्परिणाम जाणतो |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | | ➢ टीव्ही पाहण्याचा एकूण वेळ, मोबाईलवर खेळण्याची सवय, कॉम्प्युटर/व्हिडिओ गेमचा वापर यांबाबत वैयक्तिक माहिती घेऊन यांच्या अतिवापरामुळे डोळ्यांवर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती द्यावी.<br>➢ अतिवापर होणार नाही याबाबत सतर्क करावे.<br>➢ सार्वजनिक जागी थुंकणे, कचरा टाकणे, खोकणे, नाक शिंकरणे, मलमूत्र विसर्जन करणे आदी अयोग्य सवयींबाबत माहिती देणे.<br>➢ योग्य सवयींचे पालन करण्यास सांगणे. | |
| | **आरोग्यविषयक**<br>**व्यायाम**<br>**अंदाजे तासिका (८)** | **व्यायाम :**<br>➢ दररोज मैदानावर एक ते दीड तास व्यायाम.<br>➢ धावणे, उड्या मारणे, चेंडूचे विविध खेळ.<br>➢ सूर्यनमस्कार,<br>➢ विविध हालचाली, व्यायाम, शिवाशिवीचा, खेळ सहकाऱ्यांसह खेळणे.<br>➢ शारीरिक, मानसिक व भावनिक विकासासाठी खेळ, विविध हालचालींची आवश्यकता, महत्त्व, चर्चा. | दररोज मैदानावर खेळ, विविध हालचाली व व्यायाम करतो. |
| | **आरोग्यविषयक**<br>**योगा ओळख**<br>**अंदाजे तासिका (१६)** | **योगा ओळख :**<br>➢ योगाचा अर्थ<br>➢ योगाचे फायदे व महत्त्व<br>➢ योगाचे स्वरूप : यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधीबाबत थोडक्यात माहिती यम, नियम बाबत आवश्यक माहिती.<br>➢ आसनांच्या पूर्वतयारीसाठी विविध शारीरिक स्थिती.<br>➢ लवचिकपणा, स्नायूंचा दमदारपणा, शरीराचा तोल, संतुलन, वैयक्तिक क्षमता या बाबींसाठी योग पूर्व शारीरिक तयारी.<br>➢ नाकाने श्वास व उच्छ्वास/फुंकर घालणे.<br>➢ शांत बसणे. | योगाची माहिती घेतो. यम, नियमाबाबत माहिती जाणतो.<br><br>शारीरिक स्थिती व क्रिया करतो. |
| | **क्रीडांगण संबंधित**<br>**पोशाख**<br>**अंदाजे तासिका (२)** | **पोशाख :**<br>➢ मैदानावर खेळणे व हालचाली करण्यासाठी योग्य.<br>➢ सुती पोशाख, क्रीडा वेश, किट, ट्रॅक सूट. | हालचालींसाठी सोयीच्या पोशाखाचे महत्त्व समजून घेतो. |

| अ. क्र. | घटक/उपघटक | उपक्रम/संबोध | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|
| | | ➢ घाम पुसण्यासाठी आवश्यक सुती रुमाल, नॅपकिन.<br>➢ खेळासाठी योग्य कॅनव्हास व इतर बुटांचे प्रकार,<br>➢ पोशाखाचे महत्त्व व आवश्यकता. | |
| | **क्रीडांगणाशी संबंधित– मैदान स्वच्छता अंदाजे तासिका (८)** | **मैदान स्वच्छता :**<br>➢ मैदान स्वच्छता–मैदानाची स्वच्छता–मैदानावरील कचऱ्याची स्वच्छता.<br>➢ घाण कागद, पाण्याच्या प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या, काड्या, काटे, काचा, चॉकलेटचे कागद, वेष्टणे, खरकटे पदार्थ.<br>➢ मैदानाची निगा – पाणी मारणे.<br>➢ श्रममूल्यांची जोपासना व पर्यावरणाची जाणीव. | क्रीडांगणाची स्वच्छता राखतो. |
| | **क्रीडांगणाशी संबंधित– मैदानाची सुरक्षितता अंदाजे तासिका (८)** | **मैदानाची सुरक्षितता :**<br>➢ मैदानावर खड्डे, खाच–खळगे, कचरा, काचा, दगड, अडथळे नाहीत याची तपासणी.<br>➢ खेळासाठी उपलब्ध साधन साहित्य विद्यार्थ्यांना धोकादायक किंवा इजा करणारे नाही याची तपासणी.<br>➢ प्रथमोपचार पेटी, पिण्याचे पाणी यांची उपलब्धता.<br>➢ रस्त्यावर वाहतुकीच्या भागात व अडचणीच्या, असुरक्षित ठिकाणी न खेळण्याच्या सूचना.<br>➢ इजा झाल्यास शिक्षकांना सांगण्याविषयी सूचना.<br>➢ असुरक्षितता वाटल्यास पळून सुरक्षित ठिकाणी येणे.<br>➢ मोठ्याने मदतीसाठी ओरडण्याचे प्रशिक्षण. | मैदानाची निगा राखतात. मैदान सुरक्षितता पद्धती व महत्त्व समजून घेतो. |
| | **क्रीडांगणाशी संबंधित– प्रथमोपचार अंदाजे तासिका (२)** | **प्रथमोपचार :**<br>➢ प्रथमोपचार पेटीची माहिती.<br>➢ मुका मार, खरचटणे, सूज यांकरिता घेण्याची प्राथमिक काळजी.<br>➢ जखमी व दुखापतग्रस्त अवयवांची काळजी.<br>➢ सहकाऱ्याला करावयाची मदत पद्धती.<br>➢ प्रथमोपचार पेटीतील साहित्याचा उपयोग.<br>➢ प्रथमोपचार पेटी ठेवण्याची जागा. | सामान्य रक्तस्रावावर प्रथमोपचार पद्धती जाणतो. |

# पूरक उपक्रम




**मुख्य खेळ :**

पूरक उपक्रमांमध्ये मुख्य खेळांतील विविध क्षमता आणि मूलभूत कौशल्य खेळण्याची पद्धती यांबाबत विद्यार्थ्यांना स्वतंत्र माहिती द्यायची आहे. यातून विविध शारीरिक सुदृढता व कारक कौशल्यांचा विकास घडून येईल हा उद्देश समोर ठेवावा. कबड्डी, खो–खो, हँडबॉल, व्हॉलीबॉल, सॉफ्टबॉल, फुटबॉल, बॅडमिंटनसारख्या विविध खेळांची इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांना साजेशी माहिती, मैदान व क्रीडा साहित्याची माहिती, खेळाडू व पुरस्कारांची माहिती व मूलभूत कौशल्यांची माहिती द्यावी.

मूलभूत कौशल्यांचा प्राथमिक स्तरावर हालचालींचा सराव करून घ्यावा. मुख्य खेळाचे व्हिडिओ, क्रीडा कौशल्यांचे व्हिडिओ, चित्रे दाखवून योग्य हालचाली व कौशल्य प्राप्तीचे प्रयत्न करता येतील.

**क्रीडास्पर्धेत सहभाग :**

गटा–गटांच्या आंतरवर्गीय विविध हालचाली, व्यायाम, शरीरस्थिती, उपक्रम व क्रीडा कौशल्यांच्या स्पर्धा व शर्यतीत विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. सर्व विद्यार्थी क्रीडास्पर्धेत सहभागी होतील व आपल्या क्षमतांचा परिचय करून देतील यासाठी दक्ष असावे. क्रीडास्पर्धा सहभागातून त्यांची आंतरिक ऊर्जा व समूह सहभागाच्या प्रयत्नांना बळकटी प्राप्त करून द्यावी.

**शाळाबाह्य उपक्रम :**

विविध सहली, भ्रमंती, पदभ्रमण, गिर्यारोहण, बगिचे व क्रीडा मैदान भेटी, विविध क्षेत्रभेटी या शाळाबाह्य उपक्रमांतून विद्यार्थ्यांना कृतिशील जीवनशैलीसाठी प्रोत्साहित करावे. विविध प्रकारचे छंद जसे वृक्षारोपण, सायकल चालवणे, घरातली कामे, बागकाम आदी बाबींमध्ये फावला वेळ सत्कारणी लावण्यास सांगावे. शाळाबाह्य उपक्रमांतून विविध शारीरिक क्षमता, कारक कौशल्ये तसेच सामाजिक गुण यांचा एकत्रितपणे विकास होतो याकडे लक्ष द्यावे.

■■■

## विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी

ज्या विद्यार्थ्यांमध्ये काही शारीरिक अथवा मानसिक कमतरता आढळून येते त्या विद्यार्थ्यांविषयी त्यांच्या कमतरतेचा बाऊ न करता त्यांना सर्वसामान्य शिक्षणप्रवाहात सामावून घेता येते. त्यांचा आत्मविश्वास व जगण्यातील आनंद वाढवण्यासाठी त्यांना शारीरिक शिक्षणातील विविध उपक्रमांत सामावून घेता येते.

या विद्यार्थ्यांना सामावून घेताना त्यांच्या कमतरतेचा प्रकार, प्रमाण इत्यादी बाबींचा विचार करावा.

**ताकद व दमदारपणा कमी असणाऱ्यांसाठी**

- पायात दोष असल्यास विद्यार्थ्यांना चेंडू रिंगमधून टाकण्यासाठी अंतर व उंची कमी करून संधी.
- फटकावण्यासाठीचे साहित्य वजनाने कमी करून किंवा लांबी व रुंदी कमी करून वापरण्यास देता येते.
- रूपांतरित खेळ नियम सोपे करून घेता येऊ शकतात.

**समन्वय कमी असणाऱ्यांसाठी**

- विद्यार्थ्यांना हवेतून येणाऱ्या वस्तूचे भय वाटते. त्यांना संरक्षणात्मक आयुधे लावून खेळात सहभाग घेता येतो.
- अचूकतेवर कमी भर देणाऱ्या कृतींचा समावेश. उदा. बीन बॅग उचलणे, फेकणे, वाहून नेणे इत्यादी.
- स्थिर वस्तूवर प्रयोग करून आघाताच्या क्रिया आत्मसात करण्यास शिकवता येते. उदा. भिंतीवर चेंडू मारणे.
- तोल व चपळता कमी असणाऱ्यांसाठी

  तोल सांभाळायचा आहे त्याच्या आधाराची जाडी व रुंदी वाढवून/अंतर व उंची कमी करून कृती घेता येते.
- जास्तीत जास्त शरीरावयव जमिनीशी स्पर्श करतील अशा कृती करून घेता येतात. उदा. साईड रोल, हात व पायांवर चालणे इत्यादी.
- गुळगुळीत फरशी नसावी. मॅटवर विविध हालचाली करून घ्याव्यात. उदा. उड्या मारणे, रोल करणे इत्यादी.
- सहकार्याचा आधार जास्तीत जास्त राहील अशा पद्धतीच्या कृतींचा समावेश करता येतो.

  उदा. जोडीदाराबरोबर करायचे विविध व्यायाम.

**बोधात्मक व आकलनात्मक दोष असणाऱ्यांसाठी**

- जास्तीत जास्त सोप्या पद्धतीचे प्रकार/कृतीवर भर द्यावा. क्रीडा साहित्याची ने-आण व वाटप करणे, वर्गीकरण करणे, विविध प्रकारचे चेंडू हाताळणे, कवायतीचे सोपे प्रकार करणे इत्यादी.

- अधिकाधिक सुटसुटीत सूचना देऊन सावकाश करण्यात येणाऱ्या कृतींवर भर देण्यात यावा.

  उदा. ठरावीक अंतर चालणे, चेंडू पास करणे, लटकणे इत्यादी.

- दैनंदिन अध्यापनात विचार करून त्यांना सामावून घेता येते, त्यांच्या कमतरतेचा विचार करून त्यांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या व कामांमध्ये सहभागी करून घेतल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढेल. त्यासाठी फार वेगळा वेळ देण्याची गरज नाही.

  काही उदाहरणे : पायाच्या संदर्भात कमतरता असणाऱ्या विद्यार्थ्यास वेळाधिकारी, गुणलेखक इत्यादी बनण्याची जबाबदारी देता येते. तसेच हाताने खेळायच्या खेळांत त्यांना सामावून घेता येते. उदा. चेंडू टाकणे, फेकणे, घेणे इत्यादी. अंध विद्यार्थ्यांना घुंगराच्या चेंडूने खेळात सामावून घेता येते.

  कमतरतेची तीव्रता, त्या विद्यार्थ्यांची मानसिकता इत्यादी बाबी लक्षात घेऊन उपक्रम घ्यावेत. इतर सामान्य विद्यार्थ्यांना अशा मुलांना सामावून घेण्यास सांगावे. त्या विद्यार्थ्यांना चिडवणे, त्रास देणे हे प्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

■■■

## आरोग्य व शारीरिक शिक्षण : नियोजन

आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयासाठी महिन्याला अंदाजे २० ते २४ तासिका उपलब्ध होतात, तर एकूण वर्षात एकूण १८० ते २०० तासिका मिळतात. अभ्यासक्रमातील घटकांचे वार्षिक नियोजन करताना दिलेल्या सर्व घटकांना योग्य न्याय व भारांश दिला गेला आहे याकडे लक्ष द्यावे. तासिकेमध्ये विद्यार्थ्यांच्या आनंददायी वातावरणात भरपूर मुक्त शारीरिक हालचाली होतील व मनोरंजनातून सुदृढता, वाढ व क्षमता प्राप्त होईल असे नियोजन असावे. विविध हालचाली, उपक्रम, प्रात्यक्षिक, गटकार्य, वर्गकार्य, खेळ व शर्यती, व्यायाम यांचे नियोजन वेळ व घटकानुसार आपल्याकडील उपलब्ध मैदान, जागा, साहित्य, परिसरातील पद्धती व परंपरा यांचा विचार करून याची आखणी करावी. वार्षिक व मासिक नियोजन करताना महिन्यातील चार आठवड्यांमध्ये असलेल्या प्रत्येक तासिकेमधून कोणत्या घटकातील कोणत्या उपघटकांचा उपक्रम घेणार याचे सूक्ष्म नियोजन केल्यास त्यानुसार तासिका घेणे, साहित्य जमवणे, रेखांकन व इतर आवश्यक तयारी करणे सोपे जाते. इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गांचे नियोजन करताना समसमान घटकांचा त्या ठरावीक आठवड्यात विचार केल्यास एकाच प्रकारचे साहित्य, मैदान रेखांकन, पर्यायी साहित्य व तासिकेसाठी केलेली तयारी ही इतरही वर्गांना/शाळेतील सर्व वर्गांना आरोग्य व शारीरिक शिक्षण तासिकेसाठी उपयोगी पडू शकते.

अभ्यासक्रमातील सर्व घटक-उपघटक तसेच क्षमता-कौशल्यांचा विचार करून आपल्या पद्धतीने सुयोग्य नियोजन करावे. अभ्यासक्रमातील सर्व घटक, उपघटक तसेच क्षमता, कौशल्यांचा विचार करून सर्व अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांना प्राप्त होतील असे नियोजनाचे उद्दिष्ट असावे.

**वार्षिक व मासिक नियोजन नमुना**

| महिना | पहिला आठवडा | दुसरा आठवडा | तिसरा आठवडा | चौथा आठवडा |
|---|---|---|---|---|
| जून | --------- | -------- | विविध मनोरंजक<br>सांघिक खेळ<br>कवायत संचलन | आरोग्य तपासणी<br>वजन उंची मापन<br>स्वयं-मूल्यमापन |
| जुलै | उत्तेजक व्यायाम<br>जागेवर मूलभूत<br>हालचाली | सूर्यनमस्कार<br>तालबद्ध कवायत | एबीसी ड्रील्स<br>लघु खेळ | आरोग्य<br>आरोग्यदायी सवयी<br>योग्य शरीरस्थिती |
| ऑगस्ट | जागा बदलत<br>मूलभूत हालचाली<br>अनुकरणात्मक चाली | क्रीडाकौशल्य खेळ १<br>धाडसी व्यायाम | एबीसी ड्रील्स<br>विविध शर्यती | आरोग्य<br>योग्य शरीरस्थिती |
| सप्टेंबर | सहकाऱ्यांसह मूलभूत<br>हालचाली<br>साहित्यासह मूलभूत<br>हालचाली | क्रीडाकौशल्य खेळ २<br>ॲथलेटिक्स | एबीसी ड्रील्स<br>पारंपरिक खेळ | आरोग्य<br>सूर्यनमस्कार |

| महिना | पहिला आठवडा | दुसरा आठवडा | तिसरा आठवडा | चौथा आठवडा |
|---|---|---|---|---|
| ऑक्टोबर | अनुकरणात्मक चाली<br>धाडसी व्यायाम | क्रीडाकौशल्य खेळ १<br>तालबद्ध व्यायाम | स्थानिक खेळ<br>गतिरोध मालिका | आरोग्य<br>कवायत संचलन |
| नोव्हेंबर | उत्तेजक हालचाली<br>सूर्यनमस्कार | क्रीडाकौशल्य खेळ २<br>जिम्नॅस्टिक | पूरक खेळ<br>परावर्तित खेळ | आरोग्य<br>स्वयं-मूल्यमापन वजन व उंची मापन |
| डिसेंबर | धाडसी व्यायाम<br>अनुकरणात्मक हालचाली | क्रीडाकौशल्य खेळ १<br>तालबद्ध व्यायाम | लघुखेळ<br>सुदृढता कसोट्या कारक क्षमता कसोट्या | आरोग्य<br>मनोरंजक कृती |
| जानेवारी | कवायत संचलन<br>जागेवर हालचाली स्पर्धा | क्रीडाकौशल्य खेळ २<br>ॲथलेटिक्स | विविध शर्यती<br>अनुकरणात्मक हालचाली | आरोग्य<br>सूर्यनमस्कार |
| फेब्रुवारी | धाडसी व्यायाम<br>जागा बदलत हालचाली शर्यत | क्रीडाकौशल्य खेळ १<br>तालबद्ध व्यायाम | पारंपरिक खेळ<br>मानवी मनोरे | आरोग्य<br>योग्य शरीरस्थिती |
| मार्च | सूर्यनमस्कार<br>सहकाऱ्यांसह हालचाली शर्यती | क्रीडाकौशल्य खेळ २<br>जिम्नॅस्टिक | स्थानिक खेळ<br>गतिरोध मालिका | आरोग्य<br>कवायत संचलन |
| एप्रिल | वैयक्तिक खेळ<br>दोघांच्या शर्यती | सांघिक खेळ<br>कारक क्षमता<br>कौशल्य चाचणी | गटाच्या शर्यती<br>सुदृढता कसोटी चाचण्या | आरोग्य तपासणी<br>स्वयं-मूल्यमापन |

हा नियोजनाचा नमुना असून यानुसार आपले स्वतंत्र नियोजन करावे. शैक्षणिक वर्षातील सुट्टीच्या कालावधीतील तासिकांचे योग्य समायोजन करावे. खेळांची निवड करताना उपलब्ध साधने, मैदान व स्थानिक परंपरांचा विचार करावा. आपल्याकडील मैदान, साहित्य, परंपरा यांचा विचार करून मुख्य खेळ, लघु खेळ यांची निवड करावी. अभ्यासक्रमातील सर्व क्षमता विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत उद्देशानुरूप पोहोचतील असे पहावे.

■■■

# आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे मूल्यमापन

इयत्ता पहिलीच्या आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांच्या कृतींचे मूल्यमापन हे आनंददायी व ताणरहित वातावरणात करावे. कृतींचे मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांची शरीरस्थिती, कृती करण्याची पद्धती, कृतीची योग्यता, अचूकता, क्रमबद्धता, कृती करतानाची शारीरिक सहजता, आत्मविश्वास, कृती करण्याची शैली या बाबींचे निरीक्षण करून योग्य गुणांकन करता येईल. मूल्यमापनासाठी उपक्रम, कृती निवडत असताना सदर उपक्रम आणि कृती योग्य रीतीने शिकवून व सराव करून झाल्याचे निश्चित करावे. त्यानुसार त्या कृतींचे मूल्यमापन करण्याचे निकष ठरवून त्यानुसार मूल्यमापन करावे.

आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाचे मूल्यमापन हे आकारिक तंत्रांनी करणे अपेक्षित आहे. किमान ३ आकारिक साधन तंत्रे वापरून प्रत्येक सत्राचे शेवटी मूल्यमापन करायचे आहे. मूल्यमापन करताना उपक्रमातील सहभाग, उत्साह, विद्यार्थ्यांची कृती, त्याची अध्ययन निष्पत्ती, कृती आणि कौशल्यांचा योग्य वापर, तुलनेने वाढलेली क्षमता व कौशल्यामधील प्रगती यांचा विचार मूल्यमापन करताना करता येईल.

दैनंदिन तासिकांमधील कृती, प्रात्यक्षिके, उपक्रम, दिलेले वर्गकार्य, गृहकार्य, प्रकल्प या सर्वांचा मूल्यमापनामध्ये समावेश करता येऊ शकतो. वैयक्तिक कौशल्य, वैयक्तिक खेळ, सांघिक खेळ, हालचालींची काठिण्यपातळी, विविध शारीरिक सुदृढतेचे व कारक कौशल्याच्या घटकांचे मापन करणे अपेक्षित आहे.

आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाच्या आकारिक मूल्यमापनसाठी साधारणपणे पुढील आठ तंत्रे वापरता येतात. या तंत्रांचा उपयोग करून सुयोग्य पद्धतीने विद्यार्थ्यांचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ पद्धतीने व्हावे अशी अपेक्षा आहे. तासिकेच्या वेळी विविध हालचाली, कृती, खेळांचे अनुभव देत असताना त्याच वेळी सातत्यपूर्ण सर्वंकष पद्धतीने मूल्यमापन प्रक्रिया राबवायची आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची सर्वोत्कृष्ट गुणांकनाची नोंद करता येऊ शकते.

**आकारिक मूल्यमापनाची तंत्रे**

| | | |
|---|---|---|
| १) दैनंदिन निरीक्षण | २) तोंडी काम | ३) प्रात्यक्षिक |
| ४) उपक्रम किंवा कृती | ५) प्रकल्प | ६) चाचणी कसोटी |
| ७) स्वाध्याय | ८) गटकार्य | ९) वर्गकार्य |

१०) इतर (स्वमूल्यमापन, प्रश्नावली, पदनिश्चयन श्रेणी, कृती मूल्यमापन, समाजमिती तंत्र)

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शक हस्तपुस्तिका २०१२ तयार केलेली आहे. मूल्यमापन संदर्भात या पुस्तिकेचा संदर्भ शिक्षकांनी घ्यावा.

■■■

# अधिक माहिती व आवश्यक संदर्भासाठी

अधिक माहिती व आवश्यक संदर्भासाठी खालील शासकीय प्रकाशने वाचावीत. त्याचप्रमाणे विविध संस्थांद्वारे आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयीची माहिती देणारी नियतकालिके वाचणे फायद्याचे ठरते.

- 'शारीरिक शिक्षण हस्तपुस्तिका' इयत्ता दुसरी, बालभारती, पुणे
- 'लघुखेळ', बालभारती पुणे
- 'शालेय उपक्रम', बालभारती, पुणे
- 'आरोग्य व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२', विद्या परिषद, पुणे
- इंटरनेटवर उपलब्ध माहिती स्रोत

  इंटरनेटवर विषयाची माहिती देणारी विविध संकेतस्थळे उपलब्ध आहेत. आपल्याला हव्या असलेल्या माहितीबाबत शोध घेतल्यावर आपल्याला PPT, PDF, व्हिडिओ, फोटो, चित्रे, रेखांकने या स्वरूपात माहिती उपलब्ध होते. त्याचा वापर करून आपण आपली आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची तासिका अधिक प्रभावी करू शकतो.

  उदाहरणादाखल काही संकेतस्थळे व व्हिडिओ चॅनल दिले आहेत.

- यू-ट्यूब
  1) https://www.youtube.com/user/Nasirgavandi077
  2) https://youtu.be/oc4QS2USKmk
  3) https://youtu.be/skSbg1IGup8
  4) https://youtu.be/dQ_PK7Z-vv4
- विकास पीडिया
  https://mr.vikaspedia.in/education/kids-zone/916947933

■■■

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

## विषय - कार्यानुभव (करू)

### संवाद शिक्षक मित्रांशी

NCF 2005, SCF 2010, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण पुनर्रचित अभ्यासक्रम आराखडा २०१२ यानुसार तयार झालेला अभ्यासक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबवला जात आहे. आधुनिक जगाची गरज, प्रगत तंत्रज्ञानाचा जगभर वापर, संपूर्ण जग हे जवळ आलेले आहे. या सर्व बाबींमुळे आपल्या विद्यार्थ्यांना एका विशिष्ट उंचीचे शिक्षण मिळावे, कृतिशीलता, इतर विषयांशी समवाय सांगणारा, अभिव्यक्तीसाठी संधी देणारा, सखोल विचार करण्यावर भर असलेला, सहज-सुलभ उपलब्ध होणारा, प्रवाही, गुणवत्तापूर्ण, समतेवर आधारित, विद्यार्थी अनेक पर्याय देऊ शकतील अशी क्षमता निर्माण करणारा आंतरराष्ट्रीय शाळांसाठीचा अभ्यासक्रम तयार आहे. या अंतर्गत कार्यानुभव या विषयातील घटकाची निवड, अध्ययन-अध्यापन, मूल्यमापन या सर्व प्रक्रियेमध्ये आपल्या सर्वांना खारीची छोटी मदत व्हावी म्हणून हा प्रपंच आहे.

खेळू, करू, शिकू या विषयाची इयत्ता तिसरीपर्यंत बालभारतीची तीन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका आपल्या वापरासाठी उपलब्ध आहेत या सर्वांचा सेतू निर्माण करण्यासाठी आम्ही आपल्या सर्वांना मैत्रीपूर्ण मदत करीत आहोत. आंतरराष्ट्रीय शालेय स्तरावर अध्ययन अध्यापनासाठी खेळू (आरोग्य व शारीरिक शिक्षण), करू, (कार्यानुभव), शिकू (कला शिक्षण) असे तीन स्वतंत्र विषय आहेत. या तीनही विषयांचे अध्ययन-अध्यापन आपल्याला शासनाने निर्धारित केलेल्या तासिकांमध्ये स्वतंत्रपणे करायचे आहे. सदर मार्गदर्शिकेमध्ये त्यासाठी तिन्ही विषयांचे स्वतंत्र घटक, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, अध्ययन निष्पत्ती, अध्ययन अनुभव, कृतिक्रम, माहिती मिळवण्याचे संदर्भस्रोत, घटक पूर्ण करण्यासाठीचे आणखी सोपे पर्याय, घटकांचा इतर विषयांशी समवाय कसा साधायचा आणि मूल्यमापन कसे करायचे यांचे निर्देश दिलेले आहेत.

कार्यानुभव या विषयाचे अनिवार्य उपक्रम ४०% भारांश आणि ऐच्छिक उपक्रम ६०% भारांश असे दोन भाग केले आहेत. त्या पद्धतीने वर्षभर घटकांची निवड व कार्यवाही ही आपण विद्यार्थ्यांच्या परिसरातील भौगोलिक परिस्थिती, साहित्य, साधनांची उपलब्धता यानुसार करणार आहोत. अनेक नमुना उपक्रम सुचवलेले आहेत तरीही आपल्याला विविध उपक्रम अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांनुसार आणि आराखड्यानुसार विद्यार्थ्यांना आनंद मिळवून देणे हे आपले अंतिम ध्येय आहे.

इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांकडून लेखन अपेक्षित नाही म्हणून त्यांच्यासाठी अगदी सोप्या कृती दिलेल्या आहेत. पुढे घटकांची काठिण्यपातळी वाढवलेली आहे. घटक, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, अध्ययन अनुभव, मूल्यमापन यांच्यात समवाय राखणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना शिक्षकांबरोबरच पालकांचे,

परिसरातील स्थानिक कारागिरांचे मार्गदर्शन घेऊन आणखी आनंद मिळवता आला पाहिजे. समाजोपयोगिता या अभ्यासक्रमाचा आत्मा असून कार्यजगताचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना स्वतःच्या करिअरच्या वाटा शोधण्यासाठी आणि वैयक्तिक आरोग्य जपण्यासाठी अभ्यासक्रम सहाय्यभूत ठरणार आहे. आयोजित केलेल्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना अभिव्यक्त व्हायला पुरेपूर स्वातंत्र्य द्यायला हवे, त्याचबरोबर कृतीच्या संस्कारातून त्यांच्या मन मस्तिष्क व हातांच्या बोटांना कौशल्यपूर्ण काम मिळायला हवे.

शाळांमध्ये कार्यानुभव हा विषय विद्यार्थ्यांपर्यंत नेताना सर्वप्रथम आपल्याला अभ्यासक्रमाची उद्‌दिष्टे पहावी लागतील. आराखडा व त्यानुसार नियोजन काळजीपूर्वक पाहायला हवे. लवचिकता या धोरणामुळे घटकांची निवड करण्याचे आपल्याला विद्यार्थ्यांचा परिसर, उपलब्ध साधनसुविधा यानुसार स्वातंत्र्य आहे. घटक पूर्ण करताना सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या क्षमतेनुसार, स्वतंत्रपणे अथवा सांघिक रितीने काम करता यावे, आनंद मिळावा, जीवनासाठी उपयुक्त कार्यकौशल्ये मिळावी असा प्रयत्न आपण सर्व मिळून करणार आहोत. त्यासाठी अनेक लिंक्स (व्हिडिओ, ऑडिओ) चित्र, विविध प्रकाशनांची चित्रसंग्रह मिळण्याचे सूचक उपलब्ध करून देत आहोत. घटक आणखी कल्पकतेने कसा विद्यार्थ्यांपर्यंत नेता येईल असेही सूचक देत आहोत.

या शिक्षक हस्तपुस्तिकेमध्ये कार्यानुभव विषयाची उद्‌दिष्टे, क्षेत्र, सर्व उपक्रम, कृतिक्रम, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (आकारिक) या प्रणालीवर आधारित मूल्यमापनाचे निर्देश यांचा समावेश केलेला आहे. विद्यार्थ्यांच्या आवडीला, त्यांच्या स्वतंत्र कृतीला, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कृतींना भरपूर वाव आहे. आधुनिक माध्यमांच्या वापराबरोबरच जीवनकौशल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवावीत यासाठीचे विशेष उपक्रम दिलेले आहेत. खूप सफाईदारपणा अपेक्षित नाही  पण निर्मितीचा आनंद मिळावा म्हणून त्यांना भावतील, झेपतील, आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांची तुलना होऊ शकेल असे उपक्रम घ्यावेत. विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला भरपूर वाव द्यावा. भाषा, गणित, परिसर अभ्यास, कला, आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयांशी समवाय साधण्यासाठीच्या बाबीही दिलेल्या आहेत.

कार्यानुभव (करू) अभ्यासक्रम आंतरराष्ट्रीय शाळांच्या स्तरावर यशस्वीपणे राबवण्यासाठी आपणा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा...!!

■■■

# कार्यानुभव विषयाची ठळक उद्‌दिष्टे

१) **श्रमप्रतिष्ठा :** श्रम आणि कौशल्ये यांवर आधारित कामे करणे, तसेच श्रमजीवी लोकांबद्‌दल आदराची भावना ठेवून त्यांचा सन्मान करणे.

२) **उद्योजकतेचे शिक्षण :** विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेविषयी असलेल्या सुप्त गुणांचा विकास करणे, तसेच उपजत असलेल्या गुणांना वाव देऊन उद्योजकतेविषयीचे आवश्यक ज्ञान देणे.

३) **जीवन क्षमता विकसित करणारी कौशल्ये :** विद्यार्थ्यांच्या गरजा व समस्या यांच्याशी निगडित उपक्रमांद्‌वारे निरोगी व आनंदमय जीवन जगण्यासाठी कौशल्ये विकसित करण्यास मदत करणे.

४) **समाजोपयोगिता व कार्यजगत :** कार्यानुभवातील उपक्रमांतून समाजातील उद्योगमूलक कार्याची ओळख करून घेण्याची संधी प्राप्त करून देणे आणि समाज विकसनासाठी त्यांचा उपयोग करण्याची क्षमता निर्माण करणे.

५) **कार्यातील स्व-भूमिकेची समज :** विविध उपक्रमांतील कार्य निश्चितीनंतर, त्या कार्यातील स्वभूमिका समजावून घेऊन त्यातील कार्यकारणभाव, शास्त्रीय तत्त्वे व क्रमवारीत त्यांची माहिती घेणे.

६) **अर्थोत्पादन क्षमता :** उत्पादक उपक्रमाचा सराव करीत असताना, विद्यार्थ्यांमध्ये उत्पादनास आवश्यक अशी प्राथमिक कौशल्ये निर्माण करणे व शक्य तेथे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात मर्यादित अर्थोत्पादन करण्याची क्षमता निर्माण करणे.

७) **कार्यकौशल्य विकास :** उत्पादक कार्यातील सुबकता, अचूकता, आकर्षकता, गती, निर्मिती, प्रदर्शन व विक्री यांबाबतची कौशल्ये विकसित करणे.

८) **कार्यसंस्कृतीचे जतन व संवर्धन :** परिसरातील विविध कार्यांची ओळख करून घेणे, सामाजिक रूढी, परंपरा आणि प्रथा यांच्यामागील कार्याची ओळख करून घेणे, कार्यकारणभाव जाणून त्यांचे जतन व संवर्धन करण्यास मदत करणे.

९) **अनिवार्य उपक्रम :** सर्व शाळांमध्ये उपक्रमांच्या बाबतीत एकसूत्रीपणा आणण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये समाजोपयोगी कार्याची वृत्ती जोपासण्यासाठी अनिवार्य उपक्रमांची योजना करणे.

१०) **कार्यानुभवातून पर्यावरणाची जाणीव :** अनिवार्य उपक्रमांतून तसेच उत्पादक उपक्रमांतून पर्यावरण संरक्षण व संवर्धन यांची जाणीव निर्माण करणे.

■■■

# कार्यानुभव उपक्रमांचे स्वरूप व आराखडा

### कार्यानुभव विषयाचे स्वरूप व भारांश

इयत्ता : पहिली ते आठवी

**अनिवार्य उपक्रम (४०%)**

| गरजाधिष्ठित उपक्रम (२०%) | अभिरुचिपूरक उपक्रम (१०%) | कौशल्याधिष्ठित उपक्रम (१०%) |
|---|---|---|

**ऐच्छिक उपक्रम (६०%)**

| उत्पादक क्षेत्रे (६०%) | तंत्रज्ञान क्षेत्रे (६०%) | इतर क्षेत्रे (६०%) |
|---|---|---|

### ऐच्छिक उपक्रम

(अ) उत्पादक क्षेत्रे : क्षेत्र : अन्न<br>
क्षेत्र : वस्त्र<br>
क्षेत्र : निवारा

(ब) तंत्रज्ञान क्षेत्रे : माहिती तंत्रज्ञान

(क) इतर क्षेत्रे : शेतीपूरक व्यवसाय (पशू–पक्षी संवर्धन)

स्थानिक परिस्थिती आणि उपलब्ध साधन–सुविधा लक्षात घेऊन उपक्रमांची निवड इतर क्षेत्रांमध्ये करता येईल. त्यासाठी नवीन उपक्रमांचा अभ्यासक्रम करून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांची मान्यता घ्यावी.

### अनिवार्य उपक्रम (४०%)

| गरजाधिष्ठित उपक्रम | अभिरुचिपूरक उपक्रम | कौशल्याधिष्ठित उपक्रम |
|---|---|---|
| १. संस्कृती आणि कार्यजगताची ओळख<br>२. जलसाक्षरता<br>३. आपत्ती व्यवस्थापन<br>यांतील प्रत्येक उपक्रमाचा स्वतंत्र अभ्यासक्रम दिलेला आहे. तो संपूर्ण अभ्यासक्रम वर्षभरात पूर्ण करून घ्यावा. | (इयत्तावार दिलेल्या अभिरुचिपूरक उपक्रमांपैकी वर्षभरात किमान दोन उपक्रम विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करून घ्यावेत. | (इयत्तावार दिलेल्या कौशल्याधिष्ठित उपक्रमांपैकी वर्षभरात किमान दोन उपक्रम विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करून घ्यावेत. |

### ऐच्छिक उपक्रम
**(इयत्ता : पहिली ते पाचवी)**

या उपक्रमांतर्गत दिलेल्या तीन क्षेत्रांची निवड करावी. ही निवड उपलब्ध साधन–सुविधा व विद्यार्थ्यांची आवड व गरज लक्षात घेऊन करावी.

उत्पादक क्षेत्रांची निवड केल्यास अन्न, वस्त्र, निवारा या उपक्षेत्रांतून दिलेल्या प्रत्येकी एका उपक्रमाची निवड करणे अनिवार्य आहे, म्हणजे उत्पादक क्षेत्रात वर्षभरात एकूण तीन उपक्रम पूर्ण करून घ्यायचे आहेत.

## पाठ्यक्रमातील अनिवार्य उपक्रम

**विषय : कार्यानुभव (करू) : अनिवार्य उपक्रम**

**उपक्रम :** गरजाधिष्ठित उपक्रम (संस्कृती व कार्यजगताची ओळख) **अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** वर्ग सुशोभन करणे.

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| अनिवार्य उपक्रम.<br><br>कार्यसंस्कृतीचे जतन. | १. वर्ग सजावट कामात सहभागी होतो.<br>२. आवडीप्रमाणे विविध कृतींमध्ये सहभाग घेतो.<br>३. सांघिक भावनेने काम करतो<br>४. स्व–कल्पनेने मांडणी करतो.<br>५. विविध कृतींचे नेतृत्व करतो.<br>६. विविध वस्तू मिळण्याचे ठिकाण, वापर, किंमत समजून घेतो.<br>७. घर सजावटीसाठी सहकार्य करतो.<br>८. एकमेकांच्या भावनांचा आदर करतो. | १. वर्ग सजावट करण्याची जागा स्वच्छ करून घ्यावी.<br>२. सुशोभिकरणासाठी आवश्यक विविध साहित्य जमा करून घ्यावे. उदा. रांगोळी, पाने–फुले, कुंड्या.<br>३. सजावट या संदर्भाने उपलब्ध व्हिडिओ दाखवावा.<br>४. वर्ग सजावट अथवा गृहसजावट या संदर्भाने विद्यार्थ्यांना आपली मते मांडू द्यावीत.<br>५. स्वकल्पनेने रांगोळी व इतर साहित्य रचना करण्याची संधी द्यावी. | **भाषा :**<br>बडबड गीत, वर्णन, अभिनय, स्व–भाषेतील अभिव्यक्ती<br>**गणित :**<br>वस्तू मोजणी, कमी–जास्त करणे, भौमितिक आकार.<br>**परिसर अभ्यास :**<br>वस्तूंची उपलब्धता, मांडणी, सारखेपणा.<br>**कला शिक्षण :** आकार, आकर्षकता, सजावट, रंगसंगती.<br>**आरोग्य व शा. शिक्षण :** स्नायूंची हालचाल, बैठक व्यवस्था, संयम. | **Online Books :**<br>http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>**कार्यानुभव :**<br>शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पहिली, पाठ्यपुस्तक : इयत्ता पहिली, खेळू, करू, शिकू इयत्ता दुसरी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.<br>DIKSHA Mobile App<br>https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app | १. रांगोळी, रंगीत माती, खडे, बिया, शंख–शिंपले, बाटल्यांची झाकणे अशा सहज सुलभ वस्तूंची सुशोभनासाठी निवड करता येईल.<br>२. परिसरात उपलब्ध असलेल्या इतर निरुपयोगी साहित्यातून सजावट करता येईल.<br>३. घरी पालकांच्या मदतीने उपलब्ध साहित्यातून आकर्षकपणे सजावट करता येईल.<br>४. घरातील मोठ्या माणसांच्या मदतीने– |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | ६. प्रसंगी अभिनय, बडबड गीते सादर करण्याची संधी द्यावी.<br>७. सर्व विद्यार्थ्यांना स्वतःच्या आवडीची जबाबदारी मिळेल याची काळजी घ्यावी.<br>८. काम पूर्ण झाल्यानंतर सर्वांना शाबासकी द्यावी.<br>९. आंतरराष्ट्रीय पातळीवरील शाळांमध्ये चालणाऱ्या अशा उपक्रमांचा व्हिडिओ दाखवावा.<br>१०. वर्ग सजावट आणि समाजोपयोगिता यांचा संबंध सांगावा. | | • वर्ग सजावट याविषयी स्वतः केलेला व्हिडिओ.<br>• आंतरराष्ट्रीय पातळीवरील एखाद्या शाळेच्या वर्ग सजावटीचा व्हिडिओ.<br>• वर्ग सजावटी-साठी परिसरात असलेले सहज सुलभ उपलब्ध साहित्य.<br>https://youtu. be/ adSFFX 1Hp_4<br>https://youtu.be/ KJOybPm 2y7U<br>https://youtu.be/o9_ blvJsETc | श्लोक, प्रार्थना यांचा संग्रह करता येईल.<br>५. परदेशातील शाळांशी संपर्क करून तेथे चालणारे काम व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे समजावून घेता येईल. विद्यार्थ्यां- पर्यंत पोहोचवता येईल.<br>६. वर्ग सुशोभन स्पर्धेचे आयोजन करता येईल. |

**विषय : कार्यानुभव (करू)**

**उपक्रम :** अभिरुचिपूरक

**अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** डोलणारे खेळणे

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| कार्यानुभवातून पर्यावरणाची जाणीव. | १. परिसरातील उपलब्ध साहित्यापासून आधुनिकतेशी सांगड घालून अभिरुचीनुसार साहित्य तयार करतो. | १. परिसर या शब्दाची चित्राद्वारे ओळख करून द्यावी व चर्चा करायला प्रोत्साहन द्यावे.<br>२. डोलणाऱ्या खेळण्यांची चित्रे दाखवून त्यांतील वैज्ञानिक तत्त्व सांगू द्यावे.<br>३. डोलणारे खेळणे याविषयी व्हिडिओ दाखवावा.<br>४. उपलब्ध साहित्यातून स्वकल्पनेने खेळणे तयार करून घ्यावे. (Self Awareness)<br>५. विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन सोपे असे डोलणाऱ्या खेळण्याचे | **परिसर अभ्यास :** निरुपयोगी साहित्यांतून खेळणी व वैज्ञानिक तत्त्व, खेळण्यांचा इतिहास.<br>**गणित :** कागदाच्या घड्या, चौरस, त्रिकोण, आयत व वस्तूची प्रमाणबद्धता.<br>**भाषा :** खेळण्यांची नावे, प्रदर्शनाची माहिती, संवाद, स्व-भाषेतील अभिव्यक्ती | **Online Books** http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>कार्यानुभव : शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पहिली<br>पाठ्यपुस्तक : खेळू, करू, शिकू इयत्ता पहिली, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.<br>DIKSHA Mobile App https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app | १. घडीकाम पद्धतीने खेळणे तयार करता येईल.<br>२. तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करून (Paint Program) मध्ये Toy चे चित्र काढता येईल.<br>३. रिकामे विविध आकारांचे लहान डबे, बुचे, झाकणे यांचा वापर करून पर्यावरणाची जाणीव निर्माण होण्यासाठी खेळणी करता येतील. उदा. (विदूषक)<br>४. भेटकार्ड, लग्न-पत्रिका किंवा रंगीत कार्डशीटचा वापर - |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रात्यक्षिक वर्गात करून घ्यावे.<br>६. निरुपयोगी खोके किंवा रंगीत कागद व रंग, यांपासून गटात खेळणी तयार करण्याची संधी देऊन निरीक्षण करण्यास सांगावे. (Creative Thinking)<br>७. आवडणाऱ्या खेळण्यांची नावे विचारावीत.<br>८. तयार केलेल्या खेळण्यांचे शालेय परिसरात प्रदर्शन भरवून विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेत सांगायला प्रोत्साहन द्यावे. (Effective Communication)<br>९. भारताबाहेरील खेळणी याविषयी माहिती. | | https://youtu.be/xX2Gr0D1dyM<br><br>https://youtu.be/PzK7J_aVs1c | करून डोलणारे खेळणे तयार करता येईल.<br>५. मासिकांतील विविध चित्रे यांचा वापर करून अभिरुची-नुसार स्व-निर्मित विविध प्रकारची खेळणी तयार करता येतील.<br>६. गटामध्ये खेळणी कशी तयार केली, अभिनयासह संवाद कौशल्य सादर करण्याची संधी देता येईल.<br>७. परदेशातील स्वस्त वैज्ञानिक खेळणी यांचा परिचय करून देता येईल. |

**विषय : कार्यानुभव (करू)**

**उपक्रम :** कौशल्याधिष्ठित उपक्रम

**अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** बाहुली तयार करणे. Doll Making

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| कार्यानुभवातून पर्यावरणाची जाणीव. | १. विविध वस्तूंचा वापर करून बाहुली तयार करतो.<br>२. गरजा आणि समस्या यांच्याशी निगडित कौशल्यपूर्ण समाजोपयोगी साहित्य निर्माण करतो.<br>३. पालकांच्या मदतीने निरुपयोगी साहित्यांतून शिक्षणपूरक खेळणी तयार करतो आणि आनंद मिळवतो. | १. विविध प्रकारच्या बाहुल्यांची चित्रे दाखवून त्यांची नावे विचारावीत व बाहुल्यांचा Video दाखवून कोणती बाहुली का आवडली हे विचारावे.<br>२. तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करून Paint प्रोग्राम मध्ये बाहुलीचे चित्र काढण्याची संधी द्यावी.<br>४. नमुना Soft Toys चे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन वर्गात घ्यावे. | **परिसर अभ्यास :** निरुपयोगी वस्तूंचा वापर, रंगीत खडे, शंख, शिंपले यांचा वापर.<br>**ICT /कला :** बाहुलीचे चित्र रेखाटणे.<br>**भाषा :** बाहुलीच्या माध्यमांतून पारंपरिक व विविध भाषांचा वापर.<br>**गणित :** कागदाच्या घड्या चौरस, त्रिकोण, आयत व वस्तूची प्रमाणबद्धता. | Online Books http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>कार्यानुभव : शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पहिली, पाठ्यपुस्तक : खेळू, करू, शिकू इयत्ता पहिली महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.<br>DIKSHA Mobile App https://play.google.com/ store/apps/details?id=in.gov.diksha.app | १. घडीकाम पद्धतीने बाहुली व विविध कलाकृती तयार करून घेता येतील.<br>२. लहान खोके, डबे, झाकणे, बुचे यांचा वापर करून बाहुली तयार करता येईल.<br>३. विविध रंगीत खडे, भुसा, माती, वाळलेल्या काड्या अशा सहज उपलब्ध साहित्याचा वापर करून पुठ्ठ्यावर बाहुलीचा आकार तयार करता येईल. |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | ५. त्या बाहुलीच्या आकाराशी निगडित बालगीत म्हणून घ्यावे (Creative Thinking)<br>६. विविध Soft Toys व बाहुल्यांचे प्रदर्शन वर्गात आयोजित करावे. प्रत्येकास त्या हाताळण्याची संधी द्यावी.<br>७. बाहुलीच्या माध्यमांतून चर्चा व संवाद सादर करावा. ( Effective Commu-naction)<br>८. संवादासाठी विविध भाषा निवडाव्यात. | | https://youtu.be/bvJaaPZ3nVo<br>https://youtu.be/PinPifuI0zs<br>https://youtu.be/yvXmQOLeibE | ४. वाळलेले गवत व दोरा यांपासून बाहुली हे कौशल्यपूर्ण खेळणे तयार करता येईल.<br>५. कापडी रुमाल किंवा टिश्यू पेपर यांपासून बाहुली तयार करता येईल.<br>६. विद्यार्थ्यांच्या सांघिक सहभागाने करून नाटुकले सादर करता येईल.<br>७. परदेशी मुलांची खेळणी व मनोरंजन असे वैज्ञानिक तत्त्वांवर आधरित व्हिडिओ दाखवता येतील. |

**विषय : कार्यानुभव (करू)**

**उपक्रम** : उत्पादक क्षेत्र (निवारा) **अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** मातीचा पाटासारखा चौकोन तयार करून त्यावर विविध वस्तूंचे ठसे उमटवणे.

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| कार्यकौशल्यांचा विकास. कार्यातून पर्यावरणाची जाणीव. | १. माती भिजवण्याची प्रक्रिया जाणतो.<br>२. मातीचा पाटासारखा चौकोन तयार करतो.<br>३. परिसरातील उपलब्ध साधनांचा उपयोग करून ठसे देतो आणि सुशोभन करतो.<br>४. पालकांची मदत घेऊन सुशोभन करतो, आनंद मिळवतो.<br>५. गटात सांघिक भावनेने काम करतो.<br>६. तयार झालेल्या वस्तूंचा उपयोग सुशोभनासाठी करतो. | १. माती मळण्याची प्रक्रिया सविस्तर सांगावी अथवा व्हिडिओ दाखवावा.<br>२. मातीचा पाटासारखा चौकोनी आकार तयार करून घ्यावा.<br>३. परिसरातील उपलब्ध साधने जमवण्यासाठी सांगावे. उदाहरणार्थ– वाळलेली पाने, फुले, पेनाचे टोपण, काड्या, बिया, खडे इत्यादी.<br>४. विद्यार्थ्यांना वैयक्तिक अथवा सांघिक पद्धतीने ठसे देण्यास सांगावे. | **भाषा :**<br>बडबड गीत, (मातीचे), नवे शब्द व स्वभाषेतील शब्द उच्चारण, स्व– भाषेत अभिव्यक्तीची संधी.<br>**गणित :**<br>आकार, प्रमाण, संख्या, लहानमोठेपणा, लांबी, रुंदी, उंची जाडी.<br>**परिसर अभ्यास :**<br>माती, मातीचे स्रोत, मातीचा प्रकार, माती मळण्याची प्रक्रिया.<br>**कला शिक्षण :**<br>रंग, आकार, आकर्षकता, सजावट | **Online Books**<br>http://cart.ebalbharati.in /BalBooks/ebook.aspx<br>कार्यानुभव : शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पहिली, पाठ्यपुस्तक : खेळू, करू, शिकू इयत्ता पहिली महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.<br>DIKSHA Mobile App https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app<br>• स्वतः तयार केलेला व्हिडिओ | १. मातीऐवजी (प्लास्टिसिन) / कागदाचा लगदा वापरता येईल.<br>२. ठसे देण्यासाठी सहज उपलब्ध होणारी वाळलेली पाने, फुले, बोटांचे ठसे यांचाही वापर करता येईल.<br>३. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या आवडीप्रमाणे उठाव अथवा कोरून मातीच्या पाटावर काम करण्याची संधी देता येईल. |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | ५. तयार झालेली वस्तू सुकवण्याची पद्धत सांगावी.<br>६. तयार झालेली वस्तू घरी पालकांच्या साहाय्याने आणखी सुशोभित करून तिचा वापर घरगुती सुशोभनासाठी करता येतो हे सांगावे.<br>७. मातीच्या चौकोनी पाटाचे पूर्ण झालेले काम प्रदर्शित करण्याची विद्यार्थ्यांना संधी द्यावी.<br>८. मातीकाम करताना घ्यावयाची खबरदारी व जबाबदारीची जाणीव करून द्यावी. | **आरोग्य व शारीरिक शिक्षण :**<br>बळाचा वापर, बैठक स्थिती, बोटांच्या स्नायूंचा वापर. | • आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रकाशित विविध मातकाम या विषयावरील मासिकातील चित्रसंग्रह.<br>• मातीकाम करणाऱ्या स्थानिक कारागिराची मुलाखत अथवा व्हिडिओ. https://youtu.be/z104S J9VewY https://youtu.be/ys6GZkJNY | ४. मातीचा पाट त्यांच्या आवडत्या आकारांचा व जाडीचा तयार करण्याचे स्वातंत्र्य देता येईल. |

**विषय : कार्यानुभव (करू)**

**उपक्रम** : इतर क्षेत्रे – शेतीपूरक व्यवसाय — **अंदाजे तासिका** : २

**घटक/उपघटक :** • पशु–पक्षी संवर्धन • परिसरातील पशु–पक्ष्यांचा परिचय

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| कार्यानुभवातून पर्यावरणाची जाणीव निर्माण करणे. | १. परिसरातील आणि पाहिलेल्या पशुपक्ष्यांची माहिती स्वतःच्या भाषेत सांगतो.<br>२. पशुपक्ष्यांचे आवाज ओळखतो.<br>३. पशुपक्ष्यांच्या हालचाली सांघिक रितीने अभिव्यक्त करतो. | १. परिसरात पाहिलेल्या पशुपक्ष्यांची नावे व माहिती विचारावी.<br>२. चित्र समोर मांडून प्राण्यांविषयी माहिती विचारावी.<br>३. प्राणीपक्ष्यांची नावे, त्यांचे निवास, वैशिष्ट्ये शोधण्यास व स्वतःच्या भाषेत सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.<br>४. वर्गात अथवा बाहेर पशुपक्ष्यांच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजन करावे.<br>५. स्वत:च्या घराच्या परिसरातील पशुपक्षी यांविषयी माहिती विचारावी. | **भाषा :**<br>नवे शब्द,<br>स्व–भाषेतील नावे,<br>स्वभाषेत अभिव्यक्ती.<br>**गणित :**<br>संख्या, लहान मोठेपणा, आकार.<br>**परिसर अभ्यास :**<br>पशु–पक्ष्यांचा निवारा, अन्न, पाणी पिण्याच्या पद्धती.<br>**कलाशिक्षण :**<br>रंग, आकार, आवाज, तालबद्धता.<br>**आरोग्य व शारीरिक शिक्षण :**<br>लयदार चाल, विविध हालचाली. | Online Books<br>http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx<br>कार्यानुभव :<br>शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पहिली.<br>पाठ्यपुस्तक :<br>खेळू, करू, शिकू इयत्ता पहिली.<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.<br>DIKSHA Mobile App<br>https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app | १. स्वतः चित्रित केलेला पशुपक्षी व्हिडिओ दाखवता येईल.<br>२. परिसरातील पशुपक्ष्यांचे दर्शन असा कार्यक्रम राबवता येईल.<br>३. परिसरातील व घरातील पशुपक्षी याविषयी वर्णन करण्याची विद्यार्थ्यांना संधी देता येईल.<br>४. भारताबाहेरील पशुपक्ष्यांचा परिचय करून देता येईल.<br>५. जगातील प्रत्येक देशातील वैशिष्ट्य– |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | ६. माझे दोस्त पक्षी–प्राणी यांविषयी विविध अंगानी अभिव्यक्त होऊ द्यावे. | | • पशुपक्ष्यांच्या विविध चित्रांचा संग्रह.<br>• यू–ट्यूबवर उपलब्ध असलेला व्हिडिओ. https://youtu.be/xSR_bq0 Zx50 https://youtu.be/rYYappkvleA https://youtu.be/fkER4p CeJKo | पूर्ण प्राण्यांची माहिती देता येईल.<br>६. पशुपक्ष्यांचे मुखवटे वापरून संवाद सादर करता येईल. |

**विषय : माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (करू)**

**उपक्रम :** माहिती तंत्रज्ञान — **अंदाजे तासिका :** २

**घटक/उपघटक :** शैक्षणिक खेळ व की–बोर्डची ओळख.

| उद्दिष्टे | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती |
|---|---|---|---|---|---|
| मनोरंजनात्मक व विधायक खेळांची ओळख करून देणे. | विधायक संगणकीय खेळामध्ये माऊस व की–बोर्डचा वापर करतो. | १. मोबाईल मुलांना हाताळायला द्यावा व मोबाईलवर की–पॅडच्या साहाय्याने कसे टाईप करतात? त्यामुळे काय होते? यावर मुक्त चर्चा करून मुलांच्या पूर्वानुभवाचा उपयोग | **गणितीय :** खेळांच्या माध्यमातून अंक ओळख देता येईल.<br>**भाषिक :** खेळांच्या माध्यमातून इंग्रजी मुळाक्षरे सराव घेता येईल. | **Online Books** http://cart.ebalbharati.in /BalBooks/ebook.aspx<br>कार्यानुभव : शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पहिली,<br>पाठ्यपुस्तक : खेळू, करू, शिकू | १. ज्या मुलांना मोबाईलवर की–पॅड हाताळता येतो त्यांच्या मदतीने मुलांना त्यांच्या मोबाईलवर की पॅड हाताळण्याची संधी देता येईल हे काम गटात देता येईल. यामुळे एकमेकांच्या मदतीने शिकण्याची संधी मिळेल. |

| उद्दिष्टे (कार्यानुभव अभ्यासक्रमातील उद्दिष्टांकडे नेणारी व अध्ययन निष्पत्तीतील भाग साध्यतेकडे नेणारी) | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | इतर विषयांचा समवाय | संदर्भ स्रोत/ संदर्भ साधने | घटकांवर आधारित सूचक कृती/सेतू परिसरीय/ सर्वांगीण सहभाग/ पूरक कृती |
|---|---|---|---|---|---|
| | | करून सहभाग घेता घ्यावा.<br>२. संगणकावर माऊस व की-बोर्ड चा वापर कसा करतात. यासाठी खेळ आयोजित करावा. उदा. सर्व मुलांनी आपली नावे संगणकावर टाईप करणे.<br>३. काही मनोरंजक खेळ संगणकावर घ्यावेत उदा. दिलेलं नाव अनेक नावांमधून माऊसच्या साहाय्याने शोधणे. | **कला विषयाशी** संबंधित असून मूलभूत वाचन क्षमता प्रशिक्षणातील कृती म्हणून घेता येईल. | इयत्ता पहिली. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.<br>DIKSHA Mobile App https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app<br>शिक्षकांसाठी you tube वर अनेक संदर्भ video आहेत ते वापरता येतील.<br>जसे- https://youtu.be/DUe8kcJKTwY<br>https://youtu.be/_zBmvltSDdo | २. गणितीय खेळ संगणकाच्या मदतीने घेता येईल. उदा दिलेली संख्या शोधणे, सांगितलेली संख्या लिहिणे.<br>३. भाषिक खेळात संगणकाचा वापर करता येईल. उदा इंग्रजी मुळाक्षरे ओळख यांवरील खेळ.<br>४. संगणकावर माऊसच्या साहाय्याने पेंट प्रोग्रॅममध्ये स्वच्छंद चित्र काढायची संधी देऊन सर्जनशीलतेला वाव देता येईल. (विविध-प्रकारचे खेळ गटात घेता येतील. त्याद्वारे सादरीकरणाची संधी देऊन संवाद कौशल्य विकसित करता येईल.) |

# मूल्यमापन निर्देश

मित्रहो, कार्यानुभव (करू) हा विषय विद्यार्थ्यांच्या जीवनाशी जोडताना नियोजन आत्यंतिक महत्त्वाचे आहे. कार्यानुभवाची उद्दिष्टे साध्य करणे, अध्ययन अनुभवांची मांडणी करणे, सर्वंकष मूल्यमापन (आकारिक) करणे, विद्यार्थ्यांना निर्भेळ आनंद मिळवून देणे आणि कार्यजगताचा अनुभव देण्यासाठी नियोजन असायला हवे.

१) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन मार्गदर्शिकेचे वाचन करूया.

२) अभ्यासक्रमाचा आराखडा आणि उपलब्ध तासिकांनुसार उपक्रम, सहशालेय उपक्रम, क्षेत्र भेट, प्रकल्प, प्रात्यक्षिक, प्रदर्शन, माहितीचे स्त्रोत उपलब्ध करणे आणि पालक–कारागिरांच्या सहभागाचे नियोजन करूया.

३) स्थानिक परिस्थिती, सण–समारंभ, उपलब्ध साधन सुविधा, निरुपयोगी साधनांची उपलब्धता यांचाही विचार करूया.

४) प्रत्येक सत्रातील अखेरचा काही कालावधी अतिरिक्त पूरक मार्गदर्शनासाठी तसेच सराव समृद्धीसाठी राखून ठेवूया.

५) आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवताना प्रत्येक बाब ही अपडेट पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल असाही नियोजनासाठी विचार करूया.

नियोजनपूर्वक केलेली प्रत्येक कृती अध्ययन–अध्यापन प्रभावी बनवते. सुलभक आणि सर्वच विद्यार्थ्यांना आनंद मिळवून देते, समृद्ध करते.

कार्यानुभव या विषयाचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करण्यासाठी २० ऑगस्ट २०१२ च्या शासन निर्णयामध्ये स्वतंत्र सूचना दिल्या आहेत. भाषा, सामाजिक शास्त्रे, विज्ञान, गणित इत्यादी विषयांच्या तुलनेने या विषयांमध्ये अधिक मूर्त स्वरूपातील कृती, अभिव्यक्ती प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांकडून अपेक्षित आहेत. हा विषय कौशल्याधिष्ठित आहे. या विषयाबाबत लेखी काम नगण्य आहे. त्यामुळे या विषयाचे केवळ आकारिक मूल्यमापन करायचे असून संकलित मूल्यमापन अपेक्षित नाही. आकारिक मूल्यमापन यासाठी विहित केलेल्या आठ साधनांपैकी किमान तीन साधनतंत्रे वापरावयाची आहेत. त्यामध्ये निरीक्षण हे तंत्र वापरणे अनिवार्य आहे, परंतु त्यासाठी गुणांमध्ये भारांश शून्य आहे. उरलेल्या साधनांमधून किमान दोन साधनतंत्रांची निवड करावयाची आहे. या विषयाचे कौशल्याधिष्ठित स्वरूप लक्षात घेता प्रात्यक्षिक, प्रयोग व उपक्रम, कृती या तंत्राची निवड प्राधान्याने करावी लागेल. आशयाच्या स्वरूपावरून प्रकल्प आणि तोंडी काम या तंत्रांना योग्य ते स्थान द्यावे लागेल. शासन निर्णयानुसार तीन तंत्रांपेक्षा अधिक तंत्र वापरण्याची मुभा आहे.

गुणदानामध्ये निरीक्षण या तंत्राला शून्य भारांश आहे. इतर तंत्रांना आशय आणि व्याप्ती पाहून योग्य तो भारांश द्यायचा आहे. विज्ञान, गणित इत्यादी विषयांचे मूल्यमापन जेवढ्या वस्तुनिष्ठतेने करता येते तसे या विषयातील कृती कौशल्याचे मूल्यमापन करता येत नाही. त्यामुळे अगदी काटेकोर मूल्यमापनाची अपेक्षा करता

येणार नाही ही या विषयाची मर्यादा आहे. परंतु विद्यार्थ्यांची कृती/आविष्कार कसे असावेत यांच्या निकषांची यादी करून त्यानुसार मूल्यमापन केले तर वस्तुनिष्ठता वाढण्यास मदत होईल.

सर्व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व व त्यांचा विकास यांचा वेध घेण्याच्या दृष्टीने या विषयाचे आगळे स्थान आहे. या विषयासंदर्भातील कृती करताना आविष्कार दाखवलेल्या विद्यार्थ्यांचे वर्तन इतर विषयांच्या तुलनेत अधिक नैसर्गिक असते. या अवस्थेत विद्यार्थ्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू सहजपणे लक्षात येण्याची संधी असते. जाणीवपूर्वक निरीक्षण करून ही संधी घेता येईल. इतर विषयांमध्ये फारशी रुची किंवा प्रगती न दाखवल्यास काही विद्यार्थ्यांना या विषयांमध्ये गती असल्याचे जाणवू शकेल. या विद्यार्थ्यांना हेरून या विषयात अधिक प्रगती करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करता येईल. त्याची या विषयातील रुची कायम राहावी, कौशल्य वाढावे या दृष्टीने त्यांना वर्गातील/शाळेबाहेरील/कार्यक्रम उपक्रमांत सहभाग घेण्याचे नियोजन करता येईल. या विषयाचे स्वरूप दृश्य/मूर्त असल्यामुळे संपादणूक व या विषयातून होणारा व्यक्तिमत्त्व विकास याविषयीचे मूल्यमापन दैनंदिन तासिकातील कृती, उपक्रम, प्रात्यक्षिके तसेच प्रकल्पातून करणे सहज शक्य आहे. परंतु याचबरोबर इतर विषयांच्या तासिकांमध्ये या विषयांच्या मूल्यमापनाला वाव आहे. उदा. इतर विषय शिकवताना कार्यानुभवातील ओरिगामी, पुष्परचना इत्यादी कृतींचा समावेश असू शकतो. त्यामुळे इतर विषयांच्या अध्यापनातून देखील कार्यानुभव विषयासंबंधित मूल्यमापन करण्याची संधी घेतली पाहिजे. अशाच प्रकारे निरनिराळ्या सहशालेय उपक्रमांचा वापर देखील करता येईल. या विषयात प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांनी मुक्त आविष्कार करावा. त्यात त्यांच्या कल्पना, सर्जनशीलता, अनुभव यांचे प्रतिबिंब असावे अशी अपेक्षा आहे. स्वतःच्या प्रौढ अनुभवांच्या पार्श्वभूमीवर एखाद्या विशिष्ट प्रकारे कृती असण्याविषयी आग्रह, सूचना वा दुरुस्ती करणे योग्य ठरणार नाही. मुलांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि आनंद यांना धक्का लागणार नाही याची काळजी मूल्यमापन करताना घ्यायला हवी असे वातावरण निर्माण करणे व कायम ठेवणे ही भूमिका शिक्षकाकडून अपेक्षित आहे. कार्यानुभव विषयाचे मूल्यमापन करताना विषयाची उद्‌दिष्टे साध्य करण्याच्या हेतूने पुढील दृष्टिकोन लक्षात घेणे आवश्यक आहे.

- श्रमविषयक कार्याची आवड
- कार्यातील सहभाग कौशल्य विकास व त्याला तंत्रज्ञानाची जोड
- जीवनविषयक गरजापूर्ती करण्याची क्षमता
- समाजोपयोगी कार्यातील सहभाग
- कार्यशिक्षणातून पर्यावरणाची जाणीव
- उद्योजकतेचे शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या अंमलबजावणी संदर्भात शिक्षकांसाठी मार्गदर्शक हस्तपुस्तिका तयार केल्या आहेत याचा संदर्भ अध्यापनाचे नियोजन करताना अवश्य घ्यावा.

■■■

## परिशिष्ट : संदर्भ सूची


- प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम – २०१२ : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
- इयत्ता पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पहिली
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
- पुस्तक : खेळू, करू, शिकू
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता दुसरी
- पुस्तक : खेळू, करू, शिकू
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता तिसरी
- पुस्तक : खेळू, करू, शिकू
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता चौथी
- कार्यानुभव शिक्षक हस्तपुस्तिका, इयत्ता पाचवी
- ebalbharati Online Books
  http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook.aspx
- दिक्षा ॲप DIKSHA Mobile app
  https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app


■■■

# शिक्षक मार्गदर्शिका - पूरक साहित्य : २०२०

## विषय – कलाशिक्षण (शिकू)

### संवाद शिक्षक मित्रांशी

शिक्षणात कलेचा सहभाग असेल तर, शिक्षणाची गुणवत्ता व शिकण्यातील सहजता वाढते. शिक्षण जितके सहज तितके ते अंत:करणावर कोरले जाते. शिकवलेले मनात कोरले गेले, की ते आयुष्यभर उपयोगी पडते. त्यामुळेच कलेतून होणारे शिक्षण हे जीवन शिक्षणच असते.

कला हे भावना व्यक्त करण्याचे सुंदर माध्यम आहे. मन जपण्यासाठी कलेसारखे दुसरे माध्यम नाही. कलेतून मूल खुलते आणि त्याचा सर्वांगीण विकासही साधला जातो. खरं तर बालकांची संवेदनशीलता, निरीक्षणशक्ती, मानसिक, भावनिक विकास व कृतिशीलता वाढवण्यास कला शिक्षण या विषयाची नक्कीच मदत होते. कला विषयाची ही पुस्तिका म्हणजे विद्यार्थ्याला स्वत:चे जीवनच वाटेल या गोष्टींचा जाणीवपूर्वक विचार केलेला आहे. तसेच या पुस्तिकेची भाषा सहज, सोपी व त्याला समजेल अशी आहे.

चित्र, शिल्प, गायन, वादन, नृत्य, नाट्य या कलांना नियमाच्या बंधनात न अडकवता मुलांना मी हे रोजच करतो असे वाटते. कृतीतून केलेले शिक्षण कायम स्मरणात राहते. लहानपणापासून मूल काहीना काही कृती करीत असते. त्यातूनच मूल शिकत असते. कृतीतून त्याला आनंद मिळावा व वेगवेगळी माध्यमे त्याने हाताळावीत. तसेच या शिक्षणाचा उपयोग त्याला इतर विषयांच्या अभ्यासासाठी व्हावा ही अपेक्षा!

गायन आणि अभिनयाद्वारे गंमत गाणी जी मुलांना सहजरीत्या म्हणता येतील आणि स्वत: देखील करू शकतील अशीच आहेत. त्यांतून नव्या कलानिर्मितीला, आविष्काराला निश्चितच वाट मोकळी करून दिली जाते. कलेचे शिक्षण, कलेतून शिक्षण, कला हेच शिक्षण या कलेच्या त्रिसूत्रीची जपणूकही होईल. हसत–खेळत, सहजरीत्या स्वत:च्या भावना व्यक्त करून आणि स्वत:च्या आवडीप्रमाणे आनंददायी शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांचा विकास होईल हा कला समितीचा उद्देश आहे.

**मुक्त अभिव्यक्तीची** वेगळी मांडणी केली आहे. यामध्ये मुले कृतीतून शिकतील व त्याचा इतर विषयांशी समवाय असेल. मुले आनंदाने शिकतील. अनेक माध्यमांची ओळख होईल. मुले चित्र बघून काढणार नाहीत. नेहमी नवनिर्मिती करतील. नावीन्यपूर्ण गोष्टी सातत्याने करतील. नित्यक्रमास फाटा देऊन आवडीच्या गोष्टीत मुले नक्की रमतील. मुलांना मुक्त व व्यक्त होण्यास काहीच अडथळा राहणार नाही आणि ती वेगाने शिकतील. ती आश्चर्यचकित करणाऱ्या गोष्टी करतील. ती आत्मीयतेने निरीक्षण करतील व नोंदीही ठेवतील. शिक्षकाची कमीतकमी मदत घेतील. मुलांना ग्रुपमध्ये खेळायला, गप्पा मारायला आवडते. तसेच आपल्याच वयाच्या मुलांबरोबर काम करायला आवडते.

साध्या, सोप्या गोष्टीतून आनंददायी शिक्षण कसे देता येईल हा विचार इथे केंद्रित होतो. अचूकता, काटेकोरपणा, सुबकता, एकाग्रता, नीटनेटकेपणा, चिकाटी, सौंदर्यदृष्टी, नवनिर्मिती, सर्जनशीलता, कल्पकविचार, कौशल्यपूर्णता, निरीक्षणशक्ती, अभिव्यक्ती, अभिरुची, संवेदनशीलता, कार्यानंद, तन्मयता आणि प्रयोगशीलता ही सर्व जीवनकौशल्ये कलेबरोबर असतात. याचा फायदा इतर विषयांसाठीही होईल.

■■■

# कलाशिक्षण अभ्यासक्रमाचे ध्येय व उद्दिष्टे

**कलाशिक्षण ध्येय :**

कलांच्या आविष्कारातून विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व भावनिक विकास घडवणे.

**कलाशिक्षण उद्दिष्टे :**

- मनातील अव्यक्त कल्पना, भावभावना व्यक्त करण्याची संधी देणे.
- कल्पना निर्मितीसाठी पोषक वातावरण निर्मिती करणे.
- निसर्गातील निरनिराळे आकार व रंग यांचे निरीक्षण करण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- कलाविषयक माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला संधी देणे.
- निरीक्षणशक्तीचा, स्मरणशक्तीचा विकास करण्यास मदत करणे.
- स्वनिर्मित कलाकृतीचा आस्वाद/आनंद घेता येणे.
- विद्यार्थ्यांना कला निर्मितीसाठी स्वतंत्र विचार करण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- स्वतंत्र विचार करण्यास प्रवृत्त करणे.
- श्रवण, निरीक्षण यांची आवड निर्माण करणे.
- नादातून लयीचा आणि स्वरांचा आनंद घेणे.
- कृती गीतांना अनुसरून मुद्राभिनय करणे.
- हालचालींत डौल आणि लय यांचा समन्वय साधणे.
- अनुकरणातून समूह गीतांचा आनंद मिळवणे.
- सादरीकरणात स्थानिक लोककलांचा अंतर्भाव करणे.
- देशभक्तीपर गीतातून राष्ट्रभक्तीची जागृती निर्माण करणे.
- परिसरातील विविध घटकांचे आवाज ओळखणे आणि त्यांच्या अनुकरणातून पार्श्वसंगीत तयार करणे.
- नाट्याच्या माध्यमातून सभाधीटपणा, आत्मविश्वास निर्माण करणे.
- शब्दोच्चारांतून आनंद निर्मिती करणे.
- निरीक्षण व कल्पकता यांना वाव देणे.
- सोप्या पद्धतीने देहबोलीची जाणीव करून देणे.

■■■

## पाठ्यक्रमाचे घटक व अध्ययन निष्पत्ती, अध्ययन अनुभव, मुक्त अभिव्यक्ती व इतर विषयांशी समवाय

**विषय :** चित्र **घटक :** रेखाटन **उपघटक :** गिरगिटणे.

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • गिरगिटण्यातून पुढे जाऊन सुंदर रेषा काढतात.<br>• गिरगिटताना बोटांची, मनगटाची व हाताची लयबद्ध हालचाल करतात.<br>• स्वतंत्र अभिव्यक्ती (प्रत्येक मूल वेगळी चित्र निर्मिती करते.)<br>• मुले मुक्त आणि व्यक्त होतात.<br>• नवनिर्मितीतून आनंद घेतात. | मुलांना गिरगिटणे खूप आवडते. प्रत्येकाचे गिरगिटणे वेगवेगळे असते गिरगिटताना होणाऱ्या बोटांच्या, मनगटांच्या, हातांच्या आणि डोळ्यांच्या हालचाली, चेहऱ्यावरील हावभाव, तोंडाने गुणगुणणे या सर्व गोष्टी सुंदर लयनिर्मिती करण्यास मदत करतात. याचा सतत सराव केल्याने सुंदर रेषा तयार होते. प्रत्येक रेषा चित्रात भाव निर्माण करते. त्यामुळे रेषा ही बोलकी असते. याकडे आपण लक्ष केंद्रित करून मुलांना त्यांच्या मनाप्रमाणे पेन्सिलने गिरगिटण्यास सांगावे व त्यामधील काही भागांमध्ये रंग देण्यास सांगावे. (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग १ पृष्ठ क्र. ११२ व ११३ प्रमाणे) | • गिरगिटताना माध्यम बदलले तर गिरगिटणेही बदलते. उदा. स्केच पेन, रंगीत पेन्सिल, रंगीत पेन, रंगीत खडू, पेस्टल किंवा क्रेऑन खडू इत्यादी माध्यमात गिरगिटण्यास सांगावे.<br>• ओपन आर्ट गॅलरी : मुलांना वर्गाबाहेर भिंतीवर खूप मोठा कागद लावून द्यावा व सर्व मुलांना मनाप्रमाणे वेगवेगळ्या माध्यमात गिरगिटण्यास संधी उपलब्ध करून द्यावी म्हणजे गटकार्य आणि प्रदर्शन एकावेळी होईल व मुलांना खूप आनंद होईल. गिरगिटणे झाल्यावर मुलांना निरीक्षण करून नवनवीन आकार शोधायला सांगावे. (शोधक वृत्ती) | • भाषा व गणित : रेषा (गंमत रेषेंची : इ. दुसरी)<br>• शारीरिक शिक्षण : गिरगिटताना होणाऱ्या बोटांच्या, मनगटांच्या, हातांच्या आणि डोळ्यांच्या हालचाली.<br>• संगीत : चेहऱ्यावरील हावभाव, तोंडाने गुणगुणणे. |

**विषय :** चित्र **घटक :** रेखाटन **उपघटक :** ठिपक्यांची मजा (ठिपक्यांतून आकार व ठिपक्यांतून चित्र)

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • ठिपके जोडून नवीन आकाराची निर्मिती करतात. | • ठिपक्यांतून आकार : कागदावर काही अंतरावर दोन ठिपके घेऊन ते एक किंवा दोन रेषांनी जोडल्यास नवीन आकार तयार होतो असे– आकार विद्यार्थ्याला मित्रांसोबत, गटात करता येतील. तयार होणाऱ्या | • मुलांना बिंदू अथवा ठिपका कशा कशामध्ये शोधता येईल याची चर्चा करा व यादी करा.<br>• ठिपके असलेला कागद झेरॉक्स करून द्यावा. मुलांकडून ठिपके किंवा बिंदू स्केच पेनने जोडून अनेक | • गणित : एक ठिपका, अनेक ठिपके, एकसारखे, समान अंतरावर, पोकळ, भरीव, संख्याज्ञान.<br>• भाषा : अक्षराची वळणे, ठिपक्यांतून शिकविणे. |

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| | आकारात आवडीच्या रंगाने रंगविण्यास सांगावे. (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग १ पृष्ठ क्र. ११४ प्रमाणे)<br>• ठिपक्यांतून चित्र : कागदावर हवे तेवढे ठिपके काढून घ्या. काढलेल्या ठिपक्यांचे निरीक्षण करावयास सांगा. ठिपके जोडून कोणकोणते आकार तयार करता येतील ते शोधून काढण्यास सांगा. तयार होणाऱ्या आकारात आवडीच्या रंगाने रंगविण्यास सांगावे. | कलात्मक आकार तयार करून घ्यावेत. | |
| **विषय :** चित्र | **घटक :** रेखाटन | | **उपघटक :** गंमत रेषेंची |
| • सुंदर रेषा काढता येते.<br>• वेगवेगळ्या माध्यमांची ओळख होते. | रेषांचा सराव केल्याने सुंदर रेषा काढता येते व त्यामुळे सुंदर चित्र काढण्यास मदत होते. वरीलप्रमाणे रेषांच्या सरावा–साठी वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करून रेषेमध्ये विविधता आणता येईल. उदा. पेन्सिल, वॅक्स क्रेयॉन्स किंवा ऑईल पेस्टल्स खडू, स्केच पेन, मार्कर पेन, इत्यादी. (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग १ पृष्ठ क्र. ११५ प्रमाणे) | • चपटा मार्कर पेन, पेन्सिलचे किंवा पेस्टलचे चपटे टोक करून वेगवेगळ्या रेषा काढून घ्याव्यात. | • मराठी : रेषा लहान झाली.<br>• गणित : रेषेचा सराव |

| **विषय :** चित्र | **घटक :** स्मरण चित्र | | **उपघटक :** फळे, पक्षी, वस्तू व प्राणी यांचे सोपे आकार |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • फळे, पक्षी, प्राणी व वस्तूंचे सोपे आकार काढतात.<br>• चित्र आठवून काढल्यामुळे स्मरणशक्तीचा विकास होतो.<br>• निरीक्षण करण्याची सवय वाढते. | पुस्तकामध्ये (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग १ पृष्ठ क्र. ११६ प्रमाणे) वर काही सोपी चित्रे दिलेली आहेत. अशाच पद्धतीने आणखी काही वेगळी चित्रे काढण्यास सांगावे. पक्षी, प्राणी, फळे व वस्तूंची ओळख मुलांना फार लहानपणी होते. साधी, सोपी चित्रे काढून घ्यावीत. चित्रात चुका काढू नयेत कारण ते चित्र त्याचे स्वत:चे असते. चित्रातील भावना ओळखून त्यावर चर्चा करावी. मुले चित्र बघून काढणार नाहीत असे पहावे. | • मुलांना मनाप्रमाणे पक्षी, प्राणी, फळे व वस्तूंचे रेखाटन करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. सर्व मुलांचा सहभाग असावा. | • परिसर अभ्यास – भाग १ : पक्षी, प्राणी, फळे, वस्तूंची ओळख व निरीक्षण करण्याची सवय.<br>• शारीरिक शिक्षण : हाताच्या बोटांवर नियंत्रण येणे.<br>• भाषा : संवाद निर्मिती |
| **विषय :** चित्र | **घटक :** नक्षीकाम | | **उपघटक :** सोप्या आकारांपासून नक्षीकाम |
| • विविध आकारांपासून नक्षीकाम करतात.<br>• नक्षीकामात आवडीप्रमाणे रंग भरतात. | वर्तुळ, त्रिकोण, पाने, फुले व नागमोडी रेषांपासून नक्षीकाम करून घ्यावे (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग १ पृष्ठ क्र. ११८ प्रमाणे) आकार पुढे पुढे काढत जाणे हा सराव करून घ्यावा आणि यापेक्षा वेगळे आकार मुलांकडून काढून घ्यावे. कोणताही आकार पुन्हा पुन्हा समान अंतरावर एकसारखा काढत गेल्यावर नक्षीकाम सहज तयार होते हे मुलांना समजावून सांगावे. या आकारात आवडीप्रमाणे रंग भरून घ्यावे म्हणजे नक्षीकाम सुंदर दिसेल. | • फळ्यावर एक सरळ रेषा काढावी व प्रत्येक मुलाकडून पताक्याचा आकार (त्रिकोण) काढून घ्यावा. असे गटकार्य करून घ्यावे.<br>• जमिनीवर एक धागा सरळ ठेवणे. एकसारखी पाने समान अंतरावर मुले ठेवतील. पानांचे तोरण दिसू लागेल.<br>• बिया, पाने, काड्या, इअरबड इत्यादींपैकी कोणत्याही वस्तू वापरून स्वत:च्या नावाची रचना करून घ्यावी. | • गणित : मूलभूत आकारांचा सराव होणे. उदा. वर्तुळ, त्रिकोण हे आकार पुन्हा पुन्हा समान अंतरावर एकसारखे काढणे.<br>• पर्यावरण : निसर्गातील घटक, पाने व फुले. |

**विषय :** चित्र — **घटक :** ठसेकाम — **उपघटक :** हाताच्या बोटांच्या साहाय्याने ठसेकाम (थम्ब प्रिंट/फिंगर प्रिंट)

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • कागदावर ठसे उमटवता येतात.<br>• ठसेकामातील वेगळ्या माध्यमाची ओळख होते.<br>• बोटांच्या ठशांचा वापर चित्र निर्मितीसाठी करतात.<br>• चित्रनिर्मिती करण्यासाठी आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करतात. | बोटाला रंग अथवा शाई लावून मुलांकडून बोटांचे ठसे उमटवून घ्यावेत. बोटांच्या रचनेचे आणि ठशांचे निरीक्षण करण्यास सांगावे. यानंतर ठशांच्या आकारातून विशिष्ट चित्राचा आकार कसा शोधून काढावा हे समजावून सांगावे. उदा. चिमणी, मासा, फूल, सूर्य इत्यादी. विविध आकारांबद्दल चर्चा करून मुलांना स्वत:च्या कल्पनेने चित्रनिर्मिती करण्यास सांगावे. (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग १ पृष्ठ क्र. ११७ प्रमाणे) | • ठशांचा वापर करून शुभेच्छा पत्र बनविणे.<br>• ठशांचा वापर करून चित्रनिर्मिती करणे. उदा. द्राक्षे, विविध पक्षी, प्राणी, मोर, फुले हे गटकार्य करून घ्यावे.<br>• मुलांना रंग हाताळण्यास द्यावेत व रंगांची ओळख करून द्यावी. | • भाषा : शब्दांची ओळख होण्यास मदत<br>• परिसर अभ्यास भाग १ : निसर्गातील विविध आकारांकडे चौकसपणे पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण होणे. हाताच्या बोटांची रचना अभ्यासणे.<br>• गणित : छोट्या छोट्या मूलभूत आकारांची माहिती होणे. |

**विषय :** चित्र — **घटक :** कोलाज काम — **उपघटक :** कोलाज कामातील मूलभूत संकल्पना

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • कोलाज कामातील मूलभूत संकल्पना शिकतात.<br>• कौशल्यपूर्ण कृती करतात.<br>• बैठक क्षमता वाढीस लागते.<br>• स्व–अभिव्यक्ती, कल्पनाशक्ती, आवड, रुची यांमध्ये वाढ होते. | त्रिकोण, गोल, चौकोन हे आकार रंगीत कागदातून फाडून किंवा कापून पांढऱ्या कागदावर चिकटवून घ्यावेत. त्रिकोण हा टोपीसारखा, गोल हा चेंडूसारखा आणि चौकोन हा रुमालासारखा दिसतो हे लक्षात आणून द्यावे. मुलांना कागद फाडणे, कागद कापणे, चिकटवणे या कोलाज कामातील मूलभूत क्रिया माहिती करून द्याव्यात. यांसारखे अजून कोणकोणते सोपे आकार बनवता येतील याबद्दल मुलांच्यात चर्चा घडवून आणावी. | • वेगवेगळ्या पद्धती वापरून कागद फाडून घ्यावेत.<br>• विविध आकार तयार करून व चिकटवून घ्यावेत. | • गणित : विविध मूलभूत आकार शिकण्यास व अभ्यासण्यास मदत करतात.<br>• परिसर अभ्यास भाग १ : निरीक्षण कौशल्य आणि कल्पकता वृद्धिंगत होणे. |

| विषय : चित्र | घटक : रंगकाम | | उपघटक : दिलेले चित्र रंगविणे. |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • चित्रात आवडीनुसार रंग भरतात.<br>• चित्रात वापरलेले रंग ओळखतात. | मुलांना अगदी लहानपणापासूनच रंगांचे आकर्षण असते. पुस्तकातील (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग १ पृष्ठ क्र. ११९ प्रमाणे) मुलांच्या आवडीप्रमाणे चित्र रंगवून घ्यावे. त्यांच्यावर रंग माध्यमांचे किंवा इतर कोणतेही बंधन लादू नये. | • गटकार्य : मुलांचे दोन गट करून एकमेकांनी रंगवलेल्या चित्रातील रंग ओळखण्यास सांगावे. | • भाषा : रंगज्ञान व रंग ओळख होणे हे सर्व विषयांशी समवाय साधते. |
| **विषय :** चित्र | **घटक :** सुलेखन | | **उपघटक :** रेषा परिचय |
| • सुलेखनाचा पाया तयार होतो.<br>• रेषांचा परिचय होतो.<br>• विविध रेषांचा सराव करतात.<br>• अक्षर सुंदर होण्यास मदत होते. | अक्षर लेखनासाठी लहानपणापासूनच सराव होणे आवश्यक आहे. शब्दांचे चित्र म्हणजेच अक्षर होय. चित्र रेषेने तयार होते तसेच अक्षर देखील रेषेने तयार होते. रेषा सुंदर आली की, अक्षर देखील सुंदर होते. मुलांना या गोष्टीबद्दल पुरेशी माहिती देऊन (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग १ पृष्ठ क्र. १२० प्रमाणे) सरळ आडवी, सरळ उभी, सरळ तिरपी, गोलाकार, अर्धवर्तुळाकार इत्यादी रेषांचा जास्तीत जास्त सराव करून घ्यावा. | • विविध माध्यमांचा वापर करून रेषांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा. उदा. स्केच पेन, रंगीत खडू, पेन, रंगीत पेन, रंगीत पेन्सिल इत्यादी. | • भाषा व इतर विषय : अक्षरलेखनाचा पाया तयार होणे. सरावाने अक्षर सुंदर होण्यास मदत होते. |

| **विषय :** शिल्प | **घटक :** कागदकाम | **उपघटक :** कागद फाडणे, कागद कापणे, कागद चुरगाळणे, कागदाला घडी घालणे, कागद चिकटवणे. | |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • कागद फाडतात, कागद कापतात, कागद चुरगाळतात, कागदाला घडी घालतात, कागद चिकटवतात.<br>• हातांची, डोळ्यांची लयबद्ध हालचाल करतात.<br>• मुले स्व–निर्मिती करतात व नवनिर्मितीचा आनंद घेतात.<br>• निरीक्षणशक्ती व एकाग्रता वाढीस लागते. | • विद्यार्थ्यांना कागद हाताळण्यास द्यावेत. कागद फाडताना होणारा आवाज त्यांना ऐकण्यास सांगावा. कागदाचे रंगीत एकसारखे तुकडे घेऊन ते फाडून चुरगाळून त्याचे छोटे छोटे गोळे करून पृष्ठभागा–वरील आवडीच्या आकारात चिकटवण्यासाठी सांगावेत.<br>• घडी घालणे ही क्रिया (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग २ पृष्ठ क्र. १०१ प्रमाणे) विद्यार्थ्यांकडून कृती करून घ्यावी. स्वत: प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांसोबत आपण पुन्हा कृती करावी. | • स्वत:च्या रुमालाची, वर्तमानपत्र किंवा ड्रेसची घडी घालण्यास शिकवणे. घडी घालणे याचा दैनंदिन जीवनात उपयोग होतो. | • गणित : दोन समान आकार यातून समभाग, अर्धा भाग<br>• भाषा : शब्द ओळख |
| **विषय :** शिल्प | **घटक :** मातीकाम | **उपघटक :** मातीपासून सोपे आकार | |
| • मातीपासून विविध आकारांची निर्मिती करतात.<br>• हातांची व डोळ्यांची लयबद्ध हालचाल करतात.<br>• स्व–निर्मितीचा आनंद अनुभवतात. | परिसरातील उपलब्ध माती घेऊन त्यापासून विविध सोपे आकार तयार करावयास सांगावेत. मुळातच मुलांना मातीत खेळायला मनापासून आवडते. त्यामुळे त्यांना स्वनिर्मितीचा आनंद घेऊ द्यावा. (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग २ पृष्ठ क्र. १०२ प्रमाणे) विद्यार्थ्यांकडून कृती करून घ्यावी. त्यांच्या कल्पनेतून तयार होणाऱ्या कृतींचे वेळोवेळी कौतुक करावे व त्यांना प्रोत्साहन द्यावे. | • मातीचे गोळे तयार करून त्यापासून आवडीच्या वस्तू व आकार करून घ्यावेत. | • शारीरिक शिक्षण : बोटांची, हातांची हालचाल.<br>• गणित : भौमितिक आकारांची ओळख सहजरित्या होते.<br>• भाषा : रोजच्या वापरातील शब्द व नवीन शब्दांची माहिती<br>• पर्यावरण : मातीची खेळणी तयार करून नवनिर्मितीचा आनंद घेतात. |

**विषय :** शिल्प — **घटक :** अन्य माध्यमांचे शिल्प — **उपघटक :** काडेपेटीतील काड्यांपासून शिल्प निर्मिती

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • काडेपेटीतील काड्यांपासून शिल्प निर्मिती करता येते.<br>• कल्पनाशक्ती व आत्मविश्वास वाढतो. | काडेपेटीतील वापरलेल्या काड्या वापरून शिल्प तयार करून घ्यावे. कागदावर मुलांना त्यांच्या आवडीचे चित्र पेन्सिलने काढण्यास सांगावे. शक्यतो भौमितिक आकारातील सोपी चित्रे काढण्यास सांगावीत. उदा. पतंग, होडी, घर इत्यादींसारख्या चित्रांवर काडेपेटीतील काड्या चिकटवण्यास सांगून चित्र पूर्ण करण्यास सांगावे. प्रत्येकाचे चित्र वेगळे होईल. मुलांच्या चित्रांचे कौतुक करावे. | • वरीलप्रमाणे पृष्ठभागापासून वर येणाऱ्या कोणत्याही माध्यमात उदा. इयरबडच्या साहाय्याने मुलांकडून कृती करून घ्यावी. | • गणित : भौमितिक आकारांची ओळख<br>• शारीरिक शिक्षण : एकाग्रता, बैठक वाढते. |

**विषय :** संगीत–गायन — **घटक :** गायन

**उपघटक :** बडबडगीत, अंकगीत : पृष्ठ क्र. १०३, अक्षरगीत : पृष्ठ क्र. १०४, गोष्टीरूप गीत : पृष्ठ क्र. १०५ (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग २)

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • स्वर व लयीची जाण वाढते.<br>• साभिनय गायन करतात.<br>• गीतातील स्वर, लय व नादाचा आनंद घेतात.<br>• अक्षरांचा आणि संख्यांचा योग्य शब्दोच्चार करू लागतात.<br>• गीताची संकल्पना समजून घेतात. | गीताची संकल्पना समजावून सांगावी. अंकांचा आणि अक्षरांचा योग्य शब्दोच्चार करून घ्यावा. गीतातील आशयानुसार हालचाली करून घ्याव्यात. प्रत्येक गीत तालासुरात म्हणून घ्यावे. जेणेकरून गीतातील स्वर, लय व नादाचा आनंद विद्यार्थी मनसोक्त घेतील. | • घरातील व्यक्तींनी शिकवलेली इतर बडबडगीते साभिनय सादर करणे.<br>• अंकासोबत टाळ्या वाजवून गीत म्हणणे.<br>• शब्दांसोबत हावभाव करून गोष्टीरूप गीत सादर करणे. | • गणित : अंकांची ओळख<br>• मराठी : योग्य शब्दोच्चार<br>• परिसर अभ्यास भाग १ : निरीक्षण अनुभव<br>• नाट्य : मुक्त अभिनय |

**विषय :** संगीत–गायन **घटक :** गायन **उपघटक :** समूहगीत, राष्ट्रगीत (जन गण मन)

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • सामूहिकता, देशभक्ती, सामूहिक शिस्त राखतात.<br>• सर्वांबरोबर एकत्र गायन करतात. | मुलांना गीत ऐकवा. त्यातील शब्दांचे उच्चार सांगावेत. योग्य शब्दोच्चार करून घ्यावेत. स्पष्ट उच्चारात एक एक ओळ म्हणून घ्यावी. सर्वांबरोबर एकत्र तालासुरात गीत म्हणून घ्यावे. समूहाबरोबर गाताना एक सूर, एक ताल याकडे लक्ष द्यावे. सामूहिक गायनातील शिस्तीचे महत्त्व सांगावे. | • आत्मविश्वासाने समूहगीत सादर करणे. | • परिसर अभ्यास भाग २ : राष्ट्राविषयी प्रेम, आदर निर्माण होतो.<br>• शारीरिक शिक्षण : शिस्तीचे पालन<br>• भाषा : योग्य शब्दोच्चार |

**विषय :** संगीत–गायन **घटक :** गायन **उपघटक :** लोकगीत

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • लोकसंस्कृतीची ओळख होते.<br>• सणाची व परंपरांची माहिती घेतात. | पारंपरिक स्थानिक लोकगीते ऐकवणे. लोकगीतांची ओळख व परिचय करून द्यावा. विविध प्रसंगावर आधारित छोटी लोकगीते म्हणून घ्यावीत. त्यातील ठेका व चालीचा मुक्तपणे आनंद लुटू द्यावा. | • छोट्या छोट्या लोकगीतांचे सादरीकरण करणे. | • परिसर अभ्यास भाग २ : लोकसंस्कृती व परंपरांची माहिती<br>• मराठी : गीतातील भाषेचा वापर व नवीन शब्द<br>• परिसर अभ्यास भाग १ : सणांचे महत्त्व समजते. |

**विषय :** संगीत–गायन **घटक :** गायन **उपघटक :** स्वरालंकार

| काय साध्य होईल? | अध्ययन अनुभव | मुक्त अभिव्यक्ती | विषय समवाय |
|---|---|---|---|
| • गळ्याला सुराचे वळण लागेल.<br>• स्वरातून आनंद मिळेल. | **आरोह :** सा रे ग म प ध नि सां<br>**अवरोह :** सां नि ध प म ग रे सा<br>हा स्वरालंकार म्हणून घ्यावा. स्वरांची उंची हाताने दर्शवत प्रत्येक स्वर म्हणून घ्यावा. शक्यतो हार्मोनियम वाजवून अलंकाराचा सराव घ्यावा. | • खुल्या व मोकळ्या आवाजात स्वरालंकार सादर करणे. | • गणित : मोजण्याची क्रिया होते.<br>• भाषा : अक्षरांचे उच्चार सुधारतात. आवाजात गोडवा येतो. |

| **विषय :** संगीत–वादन | **घटक :** वादन | | **उपघटक :** वादन परिचय |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • हाताच्या टाळ्या लयबद्ध वाजवतात.<br>• विविध आवाजांची ओळख होते. | एकत्रितपणे कार्य करण्यास उद्युक्त करावे. १ ते ४ अंकांच्या विविध रचना करून टाळ्यांचा सराव घ्यावा. दैनंदिन वापरातील उपलब्ध साधने वापरून त्यांच्यावर आघात करून आवाजाची निर्मिती करावयास प्रोत्साहन द्यावे. (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग २ पृष्ठ क्र. १०७ प्रमाणे) | • चित्रातील वाद्यांची नावे विचारावीत.<br>• विविध प्रकारे टाळ्या वाजवणे. | • भाषा : शब्दांची ओळख व उच्चार<br>• गणित : अंकमापन |
| **विषय :** संगीत–वादन | **घटक :** वादन | | **उपघटक :** पार्श्वसंगीत |
| • आवाजाचे अनुकरण करतात.<br>• नैसर्गिक गोष्टींचे निरीक्षण करतात. | विविध नैसर्गिक आवाजांचा परिचय करून द्यावा. आपल्या परिसरात निर्माण होणाऱ्या आवाजांकडे लक्ष केंद्रित करावे. (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग २ पृष्ठ क्र. १०८ प्रमाणे) | • प्राणी, पक्षी, ढगांचा गडगडाट, वारा यांचे आवाज काढण्यास सांगणे. | • भाषा : नवीन शब्दांची ओळख होते.<br>• शारीरिक शिक्षण : एकाग्रता वाढते.<br>• परिसर अभ्यास : निसर्गातील आवाज ऐकतात. |
| **विषय :** संगीत–नृत्य **घटक :** नृत्य | **उपघटक :** हालचाली (डोके, मान, हात, पाय, शरीर) (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग ३ पृष्ठ क्र. ९८ ते १०२ प्रमाणे) | | |
| • लवचिकपणा, चपळाई येते व तोल सांभाळतात.<br>• निसर्गाशी जवळीक निर्माण होते व डौलदार हालचाली करतात. | प्राणी, पक्षी, झाडे यांच्या हालचालींचे निरीक्षण करावयास सांगावे. त्याप्रमाणे प्रश्न विचारून मुक्त हालचाली करून घ्याव्यात. विविध डौलदार हालचालींतून चपळाई, लवचिकपणा, तोल सांभाळणे यांचा मुक्त आनंद घेऊ द्यावा. | • ध्वनिमुद्रिकेवर एखादे बालगीत लावून मुक्तपणे हालचाली करणे. | • परिसर अभ्यास भाग १ : प्राणी, पक्षी, झाडे यांच्या हालचालींचे निरीक्षण. निसर्गाशी जवळीक.<br>• अंकानुसार हालचाली |

| **विषय :** संगीत | **घटक :** नृत्य | | **उपघटक :** नृत्य परिचय |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • लयीची जाण होते.<br>• कल्पकता वाढते.<br>• सांघिक प्रयत्न करतात. | बडबडगीत, अंकगीत, अक्षरगीत, निसर्गगीते, लोकगीते इत्यादी गीतांच्या आशयानुसार डौलदार हालचाली करून घ्याव्यात. तालाच्या ठेक्यावर मुक्तपणे नृत्य करण्यास प्रवृत्त करावे. नृत्यातून आनंद देणारे उपक्रम घ्यावेत. | • कोणत्याही बडबड गीतावर आनंददायी हालचालीतून नृत्य सादर करणे.<br>• ध्वनिमुद्रिकेवर गीत लावून मुक्तपणे हालचाली करणे. | • शारीरिक शिक्षण : शारीरिक हालचाली<br>• गणित : अंकांची उजळणी<br>• मराठी : अक्षरांची उजळणी, नवीन शब्दसंग्रह |
| **विषय :** संगीत | **घटक :** नृत्य परिचय (मुक्त हालचाली) | | **उपघटक :** अभिनय गीत |
| • आत्मविश्वास वाढतो.<br>• अनुकरण व निरीक्षण करतात. | झाडे, प्राणी, पक्षी यांच्या हालचालींचे निरीक्षण करण्यास व अनुकरण करण्यास सांगावे. गीताची चाल व ठेका यांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करून घ्यावे. बडबड गीतावर किंवा बालगीतावर मुक्त हालचाली करण्यास प्रोत्साहन द्यावे. | • बडबड गीतावर मुक्त हालचालींतून अभिनय करणे. | • परिसर अभ्यास भाग १ : झाडे, प्राणी, पक्षी यांच्या हालचालींचे निरीक्षण. |
| **विषय :** नाट्य | **घटक :** नाट्य | | **उपघटक :** पायाभूत हालचाली |
| • निरीक्षण व अनुकरण करतात.<br>• शरीराचे अवयव जाणून घेतात.<br>• सूचनेनुसार हालचाली करतात. | शरीराच्या अवयवांची नावे सांगावीत. डोके, मान, हात व पाय यांच्या मुक्त हालचाली करून घ्याव्यात. प्राणी, पक्षी व झाडे यांच्या हालचालींचे निरीक्षण करण्यास सांगावे. त्याप्रमाणे विविध हालचाली करण्यास प्रवृत्त करावे. | • विविध हालचाली करणे व त्यांतून आनंद मिळवणे. | • परिसर अभ्यास : शरीराच्या अवयवांची नावे सांगतात.<br>• शारीरिक शिक्षण : सूचनेनुसार हालचाली<br>• भाषा : नवीन शब्दांची माहिती होते. |

| **विषय :** नाट्य | **घटक :** नाट्य | **उपघटक :** वाचिक अभिनय/अनुभव कथन | |
|---|---|---|---|
| **काय साध्य होईल?** | **अध्ययन अनुभव** | **मुक्त अभिव्यक्ती** | **विषय समवाय** |
| • स्वत:ची ओळख सांगतात.<br>• कुटुंबातील व्यक्तींची माहिती सांगतात. | स्वत:चा परिचय कसा द्यावा याबद्दल माहिती द्यावी. अर्थानुसार शब्दांचे उच्चार कसे करावेत याबद्दल माहिती सांगावी. कुटुंबातील व्यक्तींची माहिती सांगण्यास प्रोत्साहन द्यावे. विविध प्रसंगाविषयी प्रश्न विचारून बोलण्यास प्रवृत्त करावे. | • वर्गात सर्वांसमोर उभे राहून स्वत:चे नाव, शाळेचे नाव व पत्ता सांगणे.<br>• स्वत:चा एखादा अनुभव सांगणे. उदा. वाढदिवस, प्रवासातील गमतीजमती, नवीन खेळ इत्यादी. | • भाषा : शब्दांचे योग्य उच्चार करतात, शब्दसंग्रह वाढतो.<br>• परिसर अभ्यास : श्रवण व निरीक्षण तसेच अनुकरण करतात. |
| **विषय :** नाट्य | **घटक :** नाट्य | **उपघटक :** एकात्मिक सादरीकरण | |
| • अभिनयासह गोष्टी, गाणी, कविता सादर करतात. | नाट्य संवादाविषयी माहिती द्यावी. अभिनयासह संवाद सादर करण्याविषयी चर्चा करावी. दोन मित्रांचा संवाद, कुटुंबातील एखादा प्रसंग अभिनयासह सादर करून घ्यावा. | • एखादी गोष्ट किंवा गाणे अभिनया–सह सादर करणे. | • परिसर अभ्यास : परिसरातील घटनांची माहिती.<br>• भाषा : नवीन शब्दांचे ज्ञान होते. |

■■■

## मूल्यमापन निर्देश

- निरीक्षण, तोंडीकाम, प्रात्यक्षिक, कृती, उपक्रम इत्यादी.

**संदर्भ सूची :**

- खेळू करू शिकू (इ. पहिली ते तिसरी)
- कला शिक्षण शिक्षक–पालक हस्तपुस्तिका (इ. पहिली ते आठवी)
- कलानिर्मिती व इतिहास (इ. आठवी)
- कला समेकित (Integrated) अधिगम (एनसीईआरटी)
- चित्रकला व रंगकाम कार्यशिक्षण हस्तपुस्तिका (इ. नववी)
- चित्रकला व रंगकाम कार्यशिक्षण हस्तपुस्तिका (इ. दहावी)
- स्व–विकास व कला रसास्वाद (इ. नववी व दहावी)
- Alternative Academic Calender for Students April-2020 (NCERT)

**महत्त्वाच्या सूचना :**

- अध्ययन अनुभव रकान्यामध्ये सूचित करण्यात आलेले 'पृष्ठ क्र. ....' हे संदर्भ (एकात्मिक पाठ्यपुस्तक इयत्ता पहिली : भाग १ ते ३) या पुस्तिकेमधील आहेत.
- मुलांच्या चित्रात चुका काढू नये. ती त्यांची स्वत:ची चित्रनिर्मिती असते. त्यातील भावना समजून घ्याव्यात. अधिक आवश्यकता वाटल्यास आवश्यक तेथे माहिती सांगावी.
- कोणतेही चित्र हे कमी दर्जाचे अथवा चुकीचे नसते. प्रत्येक कलाकृती ही उत्तमच असते हे मुलांमध्ये आपल्या कृतींतून व विचारांतून समजायला हवे.
- मुलांच्या कलाकृतींचे योग्य ते कौतुक व्हावे याकरिता **ओपन आर्ट गॅलरी व मुक्त भिंत** हा उपक्रम आपल्या वर्गाबाहेरील रिकाम्या जागेत राबवावा. जेथे मुले उत्स्फूर्तपणे कलानिर्मिती करू शकतील.
- मुलांसाठी त्यांच्या कलाकृतींच्या प्रदर्शनासाठी स्वतंत्र असा प्रदर्शन फलक (भित्तीफलक) असावा. जेथे मुलांच्या कलाकृतींचे नियमित प्रदर्शन होईल.
- मुलांना कलाकृती निर्माण करताना माध्यमांचे अथवा इतर कोणतेही बंधन घालू नये. त्यांच्या आवडीनुसार मुक्तपणे निर्मिती करण्यास त्यांना प्रोत्साहन द्यावे.
- कला ही मुलांमधील गुण विकसित करण्याचे प्रभावी माध्यम आहे. त्यांना कलाकृती ही स्वयंप्रेरणेने व स्व–कल्पकतेने करू द्यावी. अति मार्गदर्शन, सूचना व बंधनामुळे कलाकृतीमधील व निर्मिती प्रक्रियेतील नैसर्गिकता व सहजता निघून जाण्याचा संभव असतो.

- काही वेळा कलाकृती निर्माण करताना आपणांस विविध टोकदार, धारदार साहित्याचा वापर करावा लागतो. अशा वेळी शिक्षकांनी आवश्यक ती काळजी घेण्यासंबंधीच्या सर्व सूचना मुलांना द्याव्यात.
- टोकदार, धारदार वस्तू वापरत असताना कामाव्यतिरिक्त त्या हातात घेऊ अथवा उगीच इतरत्र फिरवू नये. या वस्तूंशी खेळू नये. अशा सूचना मुलांना द्याव्यात.
- चित्रणाच्या बाबतीत बघून काढणे येथे अपेक्षित नाही, तरी चित्रण करताना स्व–कल्पना, स्वयंप्रेरणा, स्वनिर्मितीस वाव द्यावा.
- एखादी चांगली कृती केल्यावर मुलांचे कौतुक झाले नाही, तर कृती चांगली असूनही कदाचित शेवटची असू शकते. याउलट भरभरून कौतुक झाले तर त्यांच्या मनी ती पुन:पुन्हा करण्याची उर्मी तयार होईल, चांगल्या गोष्टींची जाणीव होईल. एखादी चूक झाली, तर आपण लगेचच आक्रमक होतो. चांगले काम केले तर मुलांचे कौतुक करतोच असे नाही. सतत चांगल्या गोष्टींच्या कौतुकातून सकारात्मक विचारांची बीजे पेरली जातात. कौतुक करणे म्हणजे जीवन संजीवनीच असते.

■■■

# पूरक साहित्य विकसन निर्मिती गट : यादी

**मराठी : अभ्यासगट सदस्य**

- डॉ. जगराम भटकर, प्र. प्राचार्य, भाषा विभाग प्रमुख, सदस्य सचिव
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- सविता वायाळ, विशेषाधिकारी, मराठी विभाग, सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे.
- अजित राक्षे अभ्यासगट समन्वयक
- संदीप वाक्चौरे सदस्य
- सचिन लोखंडे सदस्य
- डॉ. नंदा भोर सदस्य
- अभय गावडे सदस्य
- चैताली भोसले सदस्य

**इंग्रजी : अभ्यासगट सदस्य**

- डॉ. उज्ज्वल करवंदे, वरिष्ठ अधिव्याख्याता, सदस्य सचिव
  प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद.
- संतोष पवार, विशेषाधिकारी, इंग्रजी विभाग, सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.
- संजीवनी नंदमित्र पवार अभ्यासगट समन्वयक
- डॉ. श्रुती प्रकाश चौधरी सदस्य
- राहुल काशिनाथ सुरवसे सदस्य
- मानसी मिलिंद भोसले सदस्य
- हर्षा विजय चव्हाण सदस्य
- मंजुषा सिद्धार्थ नंदेश्वर सदस्य
- प्रदीप मनोहर पाटील सदस्य
- ऊर्मिला साहेबराव शेळके सदस्य
- गजानन बबन बोढे सदस्य

**गणित : अभ्यासगट सदस्य**

- वृषाली गायकवाड, अधिव्याख्याता, गणित विभाग, सदस्य सचिव
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- उज्ज्वला गोडबोले, विशेषाधिकारी, गणित विभाग, सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.

- आण्णापा रावसाहेब परीट — अभ्यासगट समन्वयक
- रवींद्र महादेव येवले — सदस्य
- रामा विठोबा व्हन्याळकर — सदस्य
- संदीप पंचभाई — सदस्य
- सुवर्णा विश्वास देशपांडे — सदस्य
- सागर कृष्णराव काळे — सदस्य
- विशाल प्रकाश शेटे — सदस्य
- मायावती महादेव पाटील — सदस्य
- सज्जन श्रीधर मागाडे — सदस्य

**खेळू, करू, शिकू : अभ्यासगट सदस्य**

- डॉ. शोभा खंदारे, उपसंचालक, — सदस्य सचिव
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- डॉ. अजयकुमार लोळगे, विशेषाधिकारी, कार्यानुभव विभाग, — सदस्य
  महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.
- विद्याधर सदानंद म्हात्रे — अभ्यासगट समन्वयक
- मुकुल माधवराव देशपांडे (गटप्रमुख : खेळू) — सदस्य
- प्रकाश कारभारी पारखे (गटप्रमुख : करू) — सदस्य
- सुनिल हिंदुराव देसाई (गटप्रमुख : शिकू) — सदस्य
- डॉ. अश्विन सुधाकरराव किनारकर — सदस्य
- अमोल अंबादास बोधे — सदस्य
- प्रकाश भाऊसाहेब नेटके — सदस्य
- निताली संभाजी हरगुडे — सदस्य
- प्रवीण शांताराम माळी — सदस्य
- नागसेन नरहरी भालेराव — सदस्य
- रश्मी मिलिंद राजपूरकर — सदस्य
- प्राजक्ता प्रकाश ढवळे — सदस्य
- प्रणिता कुमावत

■■■